दादा भगवान कथित

# कर्माचे विज्ञान



Marathi

दादा भगवान कथित

# कर्माचे विज्ञान

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन
मराठी अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : **अजीत सी. पटेल**
**दादा भगवान विज्ञान फाउन्डेशन,**
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर, नवरंगपुरा,
अहमदाबाद - 380009, Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100, +91 9328661166/77



**प्रथम आवृत्ति** : 3000 प्रती ऑक्टोबर, 2015
**नवीन रीप्रिंट** : 2000 प्रती जानेवारी, 2025

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 40 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
एच.बी.कापडिया न्यू हाइस्कूलच्या समोर,
छत्राल-प्रतापपुरा रोड, छत्राल,
ता. कलोल, जि. गांधीनगर-382729, गुजरात
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN :** 978-93-86289-84-1

**Printed in India**

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो ऊवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नम: शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण ?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात त्यांना विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवित आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे! त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! मी स्वत: भगवान नाही. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

# आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

परम पूज्य दादा भगवान (दादाश्री) यांना 1958 मध्ये आत्मज्ञान प्रकट झाले. त्यानंतर 1962 ते 1988 पर्यंत देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत.

दादाश्रींनी आपल्या हयातीतच आत्मज्ञानी पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत.

आत्मज्ञानी पूज्य दीपकभाई देसाई यांना सुद्धा दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. वर्तमानात पूज्य नीरूमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात निमित्तभावाने आत्मज्ञान प्राप्ती करवित आहेत.

या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा आतून मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञाना संबंधीत जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषायांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये विशेष लक्ष ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रूटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानार्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण लिहिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

❖❖❖❖❖

# संपादकीय

अकल्पित, अनिर्धारित घटना सहसा टी.व्ही. किंवा वर्तमान पत्रातून वाचायला मिळतात जसे की, विमान कोसळून ४०० लोक ठार झाले, मोठा बॉम्बस्फोट झाला, आग लागली, भूकंप झाला, वादळ आले, हजारो लोक मारले गेले! कितीतरी अपघातात मारले गेले, काही आजाराने गेले, काही जन्मतः मृत्यू पावले! कित्येकांनी उपासमारीमुळे आत्महत्या केली, काही धर्मात्मा गलिच्छ वर्तन करताना पकडले गेले, कितीतरी भिकारी उपाशी मेले! परंतु संत, भक्त, ज्ञानींसारखे उच्च महात्मा मात्र निजानंदात आयुष्य जगत आहेत! दररोज दिल्लीतील घोटाळे उघडकीस येतात. अशा बातम्यांनी प्रत्येक माणसाच्या हृदयात एक मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते की, याचे रहस्य काय आहे? याच्या मागे काही गुह्य कारण असेल का? निर्दोष बालक जन्मतः का अपंग झाले? हृदय द्रवित होऊन जाते, खूप विचारमंथन करूनही मनाचे समाधान होत नाही आणि शेवटी आपापली कर्म आहेत असे मानून, असमाधानाने सुन्न झालेल्या मनाने गप्प होतो. कर्म आहे असे म्हणतो, परंतु कर्म म्हणजे नेमके काय आहे? कशाप्रकारे कर्म बांधले जाते? त्याची सुरुवात कशी होते? पहिले कर्म कुठून सुरू झाले? कर्मातून मुक्ती मिळू शकते का? कर्माचे भोग टाळले जाऊ शकतात का? देव करत असेल की कर्म करवून घेत असेल? मृत्यू नंतर काय? कर्म कोण बांधत असेल? भोगतो कोण? आत्मा की देह?

लोक कर्म कशाला म्हणतात? काम-धंदा करतो, सत्कार्य करतो, दान-धर्म करतो, या सर्वांना 'कर्म केले' असे म्हणतात, ज्ञानी याला कर्म म्हणत नाहीत तर कर्मफळ म्हणतात. जे पाच इंद्रियांनी पाहू शकतो, अनुभवू शकतो ते सर्व स्थूल आहे. त्याला कर्मफळ म्हणजे डिस्चार्ज कर्म म्हटले जाते. मागच्या जन्मी जे चार्ज केले होते ते आज डिस्चार्जमध्ये आले, रूपकात आले आणि आता जे नवीन कर्म चार्ज करीत आहोत ते तर सूक्ष्मात होत असते आणि ते चार्जिंग पॉइंट कुणालाही कळू शकेल असे नाही.

समजा एखाद्या शेठवर एका संस्थेचे ट्रस्टी धर्मार्थ दान देण्यासाठी

दडपण आणतात व शेठ पाच लाख रुपये दान म्हणून देतात. त्यानंतर त्या शेठचा मित्र शेठला विचारतो, 'अरे, ह्या लोकांना तू का दिलेस? हे सर्व तर चोर आहेत, तुझे पैसे खाऊन टाकतील.' त्यावर शेठ म्हणतो, 'या सर्वांनाच, एका एकाला मी चांगल्या प्रकारे ओळखून आहे. पण काय करू? त्या संस्थेचे चेअरमन माझे व्याही आहेत म्हणून त्यांच्या दडपणामुळे मला द्यावे लागले, नाहीतर मी पाच रुपयेसुद्धा देईन असा नाही. आता पाच लाख रुपये दान दिले म्हणून लोकांना शेठजींप्रती धन्य धन्य वाटले, पण ते शेठजींचे डिस्चार्ज कर्म होते आणि चार्ज काय केले शेठजींनी? पाच रुपये पण देणार नाही! म्हणजे तो सूक्ष्मात उलटे चार्ज करतो. त्यामुळे शेठ पुढच्या जन्मात कुणाला पाच रुपये देखील देऊ शकणार नाही! आणि दुसरा एखादा गरीब माणूस त्याच संस्थेच्या लोकांना पाच रुपयेच देतो आणि म्हणतो की, माझ्याजवळ पाच लाख असते तर ते सर्वच दिले असते! जो मनापासून देतो, तो पुढच्या जन्मी पाच लाख रुपये देऊ शकतो. अर्थात बाहेर जे दिसते ते फळ आहे आणि आत सूक्ष्मात बीज टाकले जाते, ते कुणालाही समजेल असे नाही. ते तर अंतर्मुख दृष्टी झाल्यानंतरच दिसते. आता जर हे समजले तर भाव बिघडतील का?

मागच्या जन्मात, 'खाऊन पिऊन मजा करायची आहे' असे कर्म बांधून आणले ते संचित कर्म. ते संचित कर्म सूक्ष्मात स्टॉकमध्ये असते, ते फळ देण्यासाठी सन्मुख होते तेव्हा मनुष्य जंकफूड खाण्यास प्रेरित होतो आणि खातो सुद्धा. ते प्रारब्ध कर्म आणि मग जेव्हा त्याचे फळ येते म्हणजे इफेक्टचा इफेक्ट येतो तेव्हा त्याच्या पोटात मुरडा येतो, आजारी पडतो, हे क्रियमाण कर्म.

परम पूज्य दादाश्रींनी कर्माच्या सिद्धांताच्याही पुढे 'व्यवस्थित' शक्तीला 'जगतनियंता' म्हटले आहे, कर्म तर 'व्यवस्थित शक्ती'चा अंश मात्र म्हटले जाईल. 'व्यवस्थित'मध्ये कर्म सामावले जाते परंतु कर्मात 'व्यवस्थित' सामावले जात नाही. कर्म म्हणजे तर बीज स्वरुपात आपण सूक्ष्मात पूर्वजन्मातून बांधून आणतो ते. आता तेवढ्याने काही पूर्ण होत नाही. जेव्हा त्या कर्माचे फळ येते, म्हणजे त्या बीजातून झाड तयार होते आणि फळ येईपर्यंत त्यात कित्येक संयोगांची गरज पडते.

बीजासाठी जमीन, पाणी, खत, गारवा, उष्णता, वेळ हे सर्व संयोग एकत्र आल्यावर कैरी पिकते व आंबा मिळतो. दादाश्रींनी खूपच सुंदर स्पष्टीकरण केले आहे की ही सर्व तर फळे आहेत. कर्मबीज तर आत सूक्ष्मात काम करत असते.

अनेकांना हा प्रश्न पडतो की पहिले कर्म कशाप्रकारे बांधले गेले असेल? पहिला देह की पहिले कर्म? ही तर अशी गोष्ट झाली की पहिले अंडे की पहिली कोंबडी? खरे तर, वास्तवात पहिले कर्म असे काही नाहीच या जगात! कर्म आणि आत्मा अनादीकाळापासून आहेत. ज्याला आपण कर्म म्हणत असतो ते जड तत्त्व आहे आणि आत्मा चेतन तत्त्व आहे. दोन्ही तत्त्वे वेगळीच आहेत. आणि तत्त्व ही सनातन वस्तू म्हटली जाते. जे सनातन आहे त्याचा आदि (प्रारंभ) कसा असू शकतो? हे तर आत्मा आणि जड तत्त्वाचा संयोग झाला आणि त्यात आरोपित भावांचे आरोपण होतच गेले. त्याचे हे फळ येऊन उभे राहिले. संयोग वियोगी स्वभावाचे आहेत. म्हणून संयोग येतात आणि जातात. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या अवस्था उत्पन्न होतात आणि नष्ट होतात. त्यात रॉंग बिलीफ (चुकीची मान्यता) उभी राहते की 'हे मी आहे आणि हे माझे आहे.' त्यामुळे हे रुपी जग भास्यमान होते. हे रहस्य जर समजले तर शुद्धात्मा आणि संयोग या दोनच वस्तू आहेत जगात. पण हे न समजल्यामुळे वेगवेगळ्या स्थूल भाषेत कर्म, नशीब, प्रारब्ध हे सर्व म्हणावे लागले. आणि विज्ञान तर इतकेच म्हणते, की फक्त सर्व संयोगांपासून पर (वेगळा) झाला तर आत्म्यातच राहू शकतो! मग कर्मासारखे काही उरणारच नाही.

कर्मे कशाप्रकारे बांधली जातात?
कर्ताभावाने कर्मे बांधली जातात.
कर्ताभाव कशाला म्हणतात?
करतो कोणी दुसरा आणि मानतो की 'मी करतो', तोच कर्ताभाव.
कर्ताभाव कशाने होतो?
अहंकाराने.
अहंकार कशाला म्हणतात?

जो स्वत: नाही तिथे 'मी' पणाचे आरोपण करतो, तो आहे अहंकार. आरोपित भावाला अहंकार म्हटले जाते. 'मी चंदुलाल आहे' असे मानतो तोच अहंकार आहे. खरोखर स्वत: चंदुलाल आहे का? की चंदुलाल हे नाव आहे? नावाला 'मी' मानतो, शरीराला 'मी' मानतो, मी पती आहे, या सर्व रॉंग बिलीफस् (चुकीच्या मान्यता) आहेत. खरोखर तर स्वत: आत्माच आहे, शुद्धात्मा आहे पण त्याचे भान नाही, ज्ञान नाही, म्हणून मी चंदुलाल, मीच देह आहे असे मानतो. हीच अज्ञानता आहे! आणि यामुळेच कर्म बांधले जाते.

"छूटे देहाध्यास तो नही कर्ता तू कर्म,
नही भोक्ता तू तेहनो ए छे धर्मनो मर्म."

– श्रीमद राजचंद्र

"जर तू जीव तर कर्ता हरी,
जर तू शिव तर वस्तू खरी."

– अखा भगत

'मी चंदुलाल आहे' असे भान आहे त्याला जीवदशा म्हणतात, आणि मी चंदुलाल नाही पण मी तर खरोखर शुद्धात्मा आहे याचे भान, ज्ञान वर्तते त्याला शिवपद म्हणतात. स्वत:च शिव आहे. आत्मा हाच परमात्मा आहे. कोणतीही संसारी क्रिया करण्याचा त्याचा स्वभाव नाही. स्वभावत: आत्मा अक्रिय आहे, असंग आहे. 'मी आत्मा आहे' आणि मी काहीच करत नाही असे ज्यांना निरंतर लक्षात राहते त्यांना ज्ञानी म्हटले आहे. आणि_त्यानंतर एकही नवीन कर्म बांधले जात नाही. जुनी डिस्चार्ज कर्मे फळ देऊन संपत जातात.

मागच्या जन्मी कर्मबीज पेरतो, त्या कर्माची फळे या जन्मात येतात. तेव्हा हे फळ कोण देतो? देव? नाही. निसर्ग देतो. ज्याला परम पूज्य दादाश्री सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स 'व्यवस्थित शक्ती' म्हणतात. त्या चार्जचे डिस्चार्ज नॅचरली आणि ऑटोमॅटिकली होते. परंतु ते फळ भोगते वेळी अज्ञानतेमुळे पुन्हा आवड–नावड, राग–द्वेष केल्याशिवाय तो राहत नाही. त्यामुळे तो नवीन बीजे टाकतो.

आणि त्याचे फळ त्याला पुढच्या जन्मी भोगावे लागते. ज्ञानी नवीन बीज टाकणे थांबवतात, त्यामुळे मागचे फळ पूर्ण होऊन त्यांना मोक्षपदाची प्राप्ती होते!

कोणी आपला अपमान करतो, नुकसान करतो तो तर निमित्त आहे, निर्दोष आहे. कारणाशिवाय कार्य कसे होईल? स्वत: अपमानित होण्याची कारणे बांधून आणली आहेत त्याचेच फळ, त्याचाच इफेक्ट येऊन उभा राहतो, तेव्हा त्यासाठी दिसणारी बरीच निमित्तेसुद्धा एकत्र यावी लागतात. फक्त 'बीजामुळे' फळ पिकत नाही. पण सर्वच निमित्ते एकत्र येतात तेव्हाच बीजामधून झाड तयार होते व फळ खायला मिळते. म्हणजे हे जे फळ येते त्यात इतर निमित्तांशिवाय फळ कसे काय येईल? अपमान मिळण्याचे बीज आपणच पेरले होते, त्याचे फळ येते. अपमान मिळण्यासाठी इतर निमित्ते एकत्र यावी लागतात. आता अज्ञानतेमुळे या निमित्तांना दोषी पाहून कषाय करून मनुष्य नवीन कर्मे बांधतो. परंतु जर हे ज्ञान हजर राहिले की समोरची व्यक्ती तर निमित्तच आहे, निर्दोष आहे आणि जो अपमान मिळतो ते माझ्याच कर्माचे फळ आहे, तर नवीन कर्म बांधले जात नाही आणि त्यामुळे मुक्त राहता येते. समोरची व्यक्ती दोषी दिसली की लगेच त्याला निर्दोष पाहावे आणि त्याला दोषी पाहिल्याबद्दल लगेच शूट एट साइट प्रतिक्रमण करावे. त्यामुळे बीज शेकले जाईल आणि परत उगवणारच नाही.

दुसरी सर्व निमित्ते एकत्र येऊन स्वत: टाकलेल्या बीजाचे फळ येणे आणि स्वत:ला भोगावे लागणे, ही सर्व प्रोसेस (प्रक्रिया) फक्त सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे आणि त्यालाच दादाश्रींनी 'व्यवस्थित शक्ती' फळ देते, असे म्हटले आहे.

'ज्ञानी पुरुष' परम पूज्य श्री दादा भगवान यांनी स्वत:च्या ज्ञानात अवलोकन करून जगाला 'कर्माचे विज्ञान' दिले आहे, त्याला दादाश्रींच्या वाणीत येथे संक्षिप्तमध्ये पुस्तक रूपात ठेवले आहे, आणि ते वाचकांना जीवनात गोंधळून टाकणाऱ्या कोड्यांची समाधानकारक उत्तरे देईल.

– **डॉ. नीरूबहन अमीन**

# कर्माचे विज्ञान

## करत आहोत की करावे लागते?

**दादाश्री :** तुझ्यासोबत असे कधी घडते का की तुझी इच्छा नसते तरीही तुला तसे काही करावे लागते? असे होत असते का कधी? असे होते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो. असे होत असते.

**दादाश्री :** लोकांच्या बाबतीतही असे होत असेल ना? त्याचे कारण काय? इच्छा नसतानाही करावे लागते. त्याचे कारण काय? तर जे पूर्वकर्म केले होते त्याचा हा इफेक्ट (परिणाम) आला आहे. नाईलाजास्तव करावे लागते, तर याचे कारण काय असेल?

जगातील लोक या इफेक्टलाच कॉज (परिणामालाच कारण) म्हणतात आणि हा इफेक्ट तर त्यांना समजतच नाही ना! लोक याला कॉज (कारण) म्हणतात, तर आपण त्यांना विचारायचे की, यात माझी इच्छा तर नव्हती, मग मी हे कार्य केले असे कसे म्हणता येईल? ज्या कर्माची इच्छा नाही ते कर्म 'मी केले', असे तुम्ही कसे म्हणता? लोक असे का म्हणतात की 'तुम्ही कर्म केले?' कारण दिसणाऱ्या क्रियेलाच लोक 'कर्म केले' असे म्हणतात. लोक म्हणतात यानेच हे कर्म केले. परंतु ज्ञानी असे समजतात की हा तर परिणाम घडला आहे.

## कोणी पाठविले पृथ्वीवर?

**प्रश्नकर्ता :** आपण स्वतःच जन्माला आलो आहोत की आपल्याला कोणी पाठविणारा आहे?

**दादाश्री :** कोणीही पाठविणारा नाही. तुमची कर्मेच तुम्हाला घेऊन जातात आणि लगेचच तेथे जन्म मिळतो. चांगली कर्मे असतील तर चांगल्या ठिकाणीच जन्म मिळतो, वाईट कर्मे असतील तर वाईट ठिकाणी जन्म मिळतो.

## कर्माचा सिद्धांत काय?

**प्रश्नकर्ता :** कर्माची व्याख्या काय?

**दादाश्री :** कोणतेही कार्य करताना, ते कार्य 'मी करतो' असा आधार देणे, हीच कर्माची व्याख्या आहे. 'मी करतो' असा आधार देणे, यालाच कर्म बांधणे असे म्हणतात. 'मी करत नाही' आणि 'कोण करत आहे' हे जाणून घेतल्यावर तुम्ही त्या कर्माला निराधार करता, तेव्हा ते कर्म संपते.

**प्रश्नकर्ता :** कर्माचा सिद्धांत काय आहे?

**दादाश्री :** तू विहिरीत उतरून म्हणालास की 'तू चोर आहेस' तर विहीर काय म्हणेल?

**प्रश्नकर्ता :** 'तू चोर आहेस' असे आपण बोललो की तसाच प्रतिध्वनी ऐकू येतो.

**दादाश्री :** बस, बस. हे जर तुला आवडत नसेल तर तू म्हणायचे की 'तू बादशाह आहेस', तर ती तुला 'बादशाह' म्हणेल. तुला जे आवडत असेल ते बोल, हा कर्माचा सिद्धांत आहे! तुला वकिली आवडत असेल तर वकिली कर. डॉक्टरकी आवडत असेल तर डॉक्टरकी कर. कर्म म्हणजे ॲक्शन. आणि रिॲक्शन म्हणजे काय? तर तो प्रतिध्वनी आहे. रिॲक्शन प्रतिध्वनीवाले असते. त्याचे फळ आल्याशिवाय राहत नाही.

ती विहीर काय म्हणते? हे जग आपलेच प्रोजेक्ट (योजना, प्रकल्प) आहे. तुम्ही ज्याला कर्म म्हणत होता ना, ते सर्व तर आपलेच प्रोजेक्ट आहे.

**प्रश्नकर्ता :** कर्माचा काही सिद्धांत आहे की नाही?

**दादाश्री :** संपूर्ण जग कर्माचा सिद्धांतच आहे, दुसरे काहीच नाही. आणि तुमच्याच जोखीमदारीमुळे बंधन आहे. हे सर्व प्रोजेक्शन तुमचेच आहे. हा देहसुद्धा तुम्हीच घडविला आहे. तुम्हाला जे जे मिळाले ते सर्व तुम्हीच घडविलेले आहे. यात दुसऱ्या कुणाचाही हात नाही. होल अॅन्ड सोल रिस्पॉन्सिबिलिटी तुमचीच आहे, अनंत जन्मांपासून.

## आपलेच 'प्रोजेक्शन'

विहिरीत जाऊन प्रोजेक्ट केले, यावरून लोक असे म्हणतील की बस, फक्त प्रोजेक्ट करण्याचीच गरज आहे. आपण जर त्यांना विचारले की तुम्ही असे कशावरून म्हणता? तेव्हा ते म्हणतील की विहिरीत जाऊन मी आधी असे बोललो होतो 'तू चोर आहेस.' तेव्हा विहीर मला म्हणाली की 'तू चोर आहेस.' मग मी प्रोजेक्ट असे बदलले की, तू 'राजा आहेस' तर तिने पण म्हटले 'तू राजा आहेस.' अरे, पण हा प्रोजेक्ट तुझ्या हातात आहेच कुठे? प्रोजेक्ट बदलणे ही गोष्ट खरी आहे, परंतु तेही तुझ्या हातात नाही. हो, ते स्वतंत्र आहे सुद्धा आणि नाही सुद्धा. 'नाही' हे जास्त प्रमाणात आहे आणि 'आहे' हे कमी प्रमाणात आहे. असे परसत्तावाले हे जग आहे. खरे ज्ञान समजल्यानंतर स्वतंत्र आहे, तोपर्यंत स्वतंत्र नाही.

पण आता हे प्रोजेक्ट बंद कसे होईल? तर जोपर्यंत यातून स्वत:चे स्वरूप सापडत नाही, या सर्वांत 'मी हे आहे की ते आहे?' हे समजत नाही तोपर्यंत भटकणे आहे. हा देह तो मी नाही. हे डोळेसुद्धा मी नाही. आत तर खूप सारे स्पेअरपार्टस् (अवयव) आहेत. आतापर्यंत अशीच भ्रांती आहे की, या सगळ्यात 'मी चंदुभाऊ आहे'

(चंदुभाऊच्या जागी वाचकांनी स्वतःचे नाव समजावे) भ्रांतीमुळे ते सार काढू शकत नाहीत, म्हणून ते काय समजतात? तर जो त्याग करतो तो 'मी'च आहे. म्हणजे त्यांच्याबाबतीत 'मी' योग्य स्थानावर नाही. त्याला वाटते की हे तप करतो तोच 'मी' आहे, सामायिक करतो तोच 'मी' आहे, प्रवचन देतो तोच 'मी' आहे. जोपर्यंत 'मी करत आहे' अशीच भ्रांती आहे तोपर्यंत नवीन प्रोजेक्ट करत राहतो, आणि जुन्या प्रोजेक्ट अनुसार भोगत राहतो. कर्माचा सिद्धांत जर समजला तरच मोक्षाचा सिद्धांत समजेल.

## रॉंग बिलीफमुळे कर्मबंधन

तुमचे नाव काय आहे?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाऊ.

**दादाश्री :** खरोखर तुम्ही चंदुभाऊ आहात का?

**प्रश्नकर्ता :** असे कसे म्हणू शकतो? सर्वांना जे वाटते तेच खरे.

**दादाश्री :** तर मग खरोखर तुम्ही चंदुभाऊच आहात, नाही का? तुम्हाला तशी खात्री नाही? 'माय नेम इज (माझे नाव) चंदुभाऊ असे बोलता ना तुम्ही?'

**प्रश्नकर्ता :** मला तर तशीच खात्री आहे.

**दादाश्री :** माय नेम इज चंदुभाऊ, नॉट आय. तर खरोखर तुम्ही चंदुभाऊ आहात की दुसरे कोणी आहात?

**प्रश्नकर्ता :** हे खरे आहे, मी कोणी वेगळाच आहे. ही तर वास्तविकता आहे.

**दादाश्री :** नाही. हे 'चंदुभाऊ' तर ओळखण्याचे साधन आहे की असे शरीरवाले, हे भाऊ, ते चंदुभाऊ आहेत. तुम्ही सुद्धा असेच समजता की या शरीराचे नाव चंदुभाऊ आहे. परंतु खरोखर तुम्ही कोण आहात? हे जाणून घ्यायला नको का?

**प्रश्नकर्ता :** हो, ते जाणून घ्यायला हवे. जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**दादाश्री :** म्हणजे हे तर असे झाले की तुम्ही चंदुभाऊ नाहीत तरीही तुम्ही आरोपण करता, चंदुभाऊच्या नावाने सगळे फायदे घेता. या स्त्रीचा पती आहे, याचा मामा आहे, याचा काका आहे, असे फायदे घेता. त्यामुळे निरंतर कर्मे बांधत राहता. जोपर्यंत तुम्ही आरोपित भावात आहात तोपर्यंत कर्मे बांधली जातात. 'मी कोण आहे?' हे निश्चित झाल्यानंतर तुम्हाला कर्मबंधन होत नाही.

म्हणजे आताही कर्मे बांधली जात आहेत आणि रात्री झोपेतही कर्मे बांधली जातात. कारण 'मी चंदुभाऊ आहे' असे मानून तुम्ही झोपता. 'मी चंदुभाऊ आहे' ही तुमची रॉंग बिलीफ (चुकीची मान्यता) आहे, त्याने कर्मे बांधली जातात.

भगवंताने सर्वात मोठे कर्म कशास म्हटले? रात्री 'मी चंदुभाऊ आहे'असे मानून झोपलात आणि आत्म्याला पोत्यात टाकले, तेच सर्वात मोठे कर्म!

## कर्तापदामुळे कर्मबंधन

**प्रश्नकर्ता :** कर्मे कशाने बांधली जातात? हे जरा आणखी थोडे सविस्तर समजावून सांगा.

**दादाश्री :** कर्मे कशाने बांधली जातात, ते मी तुम्हाला सांगतो. तुम्ही करत नाही तरीही मानता की 'मी करतो', म्हणून तुमचे बंधन जात नाही. ईश्वर सुद्धा कर्ता नाही. ईश्वर जर कर्ता असता, तर त्याला बंधन झाले असते. म्हणजे ईश्वर कर्ता नाही आणि तुम्ही सुद्धा कर्ता नाही. पण तुम्ही मानता की 'मी करतो' त्यामुळे कर्मे बांधली जातात.

कॉलेजात पास झालात, ते दुसऱ्या शक्तीमुळे आणि तुम्ही म्हणता की मी पास झालो. हा आरोपित भाव आहे. त्यामुळे कर्मे बांधली जातात.

## वेदांताने सुद्धा स्वीकारला निरीश्वरवाद

**प्रश्नकर्ता :** जर हे दुसऱ्या कोणत्या शक्तीने होत असेल तर मग कोणी चोरी केली तरी गुन्हा नाही. आणि कोणी दान दिले तोसुद्धा गुन्हा नाही. म्हणजे ह्या दोनही गोष्टी सारख्याच म्हटल्या जातील ना!

**दादाश्री :** हो, सारख्याच म्हटल्या जातील. पण लोक सारख्या मानत नाहीत ना! दान देणारा अशी छाती काढून फिरतो, म्हणून तर बंधनात येतो आणि चोरी करणारा म्हणतो की मी भल्याभल्यांकडे चोरी करतो पण 'मला कोणी पकडूच शकत नाही', म्हणून तो पण बंधनात अडकतो. 'मी केले' असे जर म्हटले नाही, तर काहीच स्पर्शणार नाही (कर्मबंधन होणार नाही).

**प्रश्नकर्ता :** अशी एक मान्यता आहे की, प्राथमिक कक्षेत आपण असे मानत असतो की, ईश्वर कर्ता आहे. पुढे जाऊन वेदांमध्येही निरीश्वरवादाशिवाय काहीच नाही. उपनिषदांमध्ये पण निरीश्वरवादच आहे. ईश्वर कर्ता नाही. कर्मांची फळे प्रत्येकाला भोगावी लागतात. तर मग ही कर्मांची फळे जन्मोजन्मी अशीच चालू राहतात का?

**दादाश्री :** हो तर, नक्कीच. कर्माचे असे आहे की, या कैरीमधून झाड आणि झाडातून कैरी, कैरीमधून झाड आणि झाडातून कैरी!

**प्रश्नकर्ता :** हा तर उत्क्रांतीचा नियम झाला, असे तर होतच राहील.

**दादाश्री :** नाही, हेच कर्मफळ आहे. ती कैरी फळ रूपात आली, त्या फळामधून बीज पडते आणि पुन्हा झाड होते आणि झाडामधून पुन्हा फळ येते ना! असे चालतच राहणार. कर्मातून कर्मबीजे पडतच राहतील.

**प्रश्नकर्ता :** तर मग अशी शुभ-अशुभ कर्मबंधने होतच राहणार, सुटणारच नाहीत.

**दादाश्री :** हो, वरचा गर खातो आणि कोय परत टाकली जाते.

**प्रश्नकर्ता :** मग तर तिथे पुन्हा आंब्याचे झाड उत्पन्न होईल.

**दादाश्री :** होणारच, गत्यंतरच नाही ना!

जर तुम्ही ईश्वराला कर्ता मानता तर मग स्वत:ला पण कर्ता का मानता? इथे तर तो स्वत:च कर्ता होऊन बसतो! फक्त मनुष्यच असा आहे की, त्याला 'मी कर्ता आहे' असे भान आहे, आणि कर्ता झाला की मग आश्रितता राहत नाही. त्याला भगवंत म्हणतात, 'भाऊ, तूच करत असशील तर तू वेगळा आणि मी वेगळा.' मग भगवंतांचे आणि तुमचे काय देणेघेणे?

स्वत:ला कर्ता मानतो म्हणून कर्मबंधन होते. स्वत:ला जर त्या कर्माचा कर्ता मानले नाही, तर त्या कर्माचा विलय होतो.

## हे आहे महाभजनाचे मर्म

म्हणून अखा भगत म्हणतात की,

जो तू जीव तो कर्ता हरी;
जो तू शिव तो वस्तू खरी!

अर्थात जर 'तू शुद्धात्मा आहेस' तर हे खरे आहे. आणि जर 'तू जीव आहेस,' तर वरती कर्ता हरी आहे. आणि जर तू शिव आहेस' तर हे खरे आहे. वरती हरी नावाचा कोणीच नाही. अर्थात जीव-शिव हा भेद गेला की मग परमात्मा होण्याची तयारी सुरू झाली. हे सगळे भगवंताला भजतात, तो जिवा-शिवाचा भेद आहे, आणि आपल्या येथे ज्ञान मिळाल्यानंतर जिवा-शिवाचा भेद मिटून जातो.

*कर्ता छूटे तो छूटे कर्म;*
*ए छे, महाभजननो मर्म!*

(कर्तापद सुटले तर कर्मे सुटतील; हेच आहे महाभजनाचे मर्म!)

चार्ज (नवीन कर्मबंधन) केव्हा होते की, 'मी चंदुभाऊ आहे आणि हे मी केले' असे मानता तेव्हा. म्हणजे जी चुकीची मान्यता

आहे त्यामुळे कर्म बांधले गेले. आता जर आत्म्याचे ज्ञान मिळाले तर 'तुम्ही' चंदुभाऊ नाहीत. चंदुभाऊ तर फक्त व्यवहाराने आहात, निश्चयाने नाही, खरोखर नाही, आणि हे 'मी केले' तेसुद्धा व्यवहाराने. अर्थात जर कर्तापण मिटले तर कर्मे सुटतात, कर्मबंधन होत नाही.

'मी कर्ता नाही' असे भान आले, अशी श्रद्धा बसली तेव्हापासून कर्मे सुटतात, कर्म बांधायचे बंद होते. म्हणजेच चार्ज होणे बंद होते. हे आहे महाभजनाचे मर्म. महाभजन कशाला म्हणतात? सर्व शास्त्रांचे सार त्याला महाभजन म्हणतात. आणि हे तर महाभजनाचेही सार आहे.

## जो करतो तोच भोगतो

**प्रश्नकर्ता :** आपली शास्त्रे असे सांगतात की प्रत्येकाला कर्माप्रमाणे फळ मिळते!

**दादाश्री :** प्रत्येक जण स्वतःच स्वतःसाठी जबाबदार आहे. भगवंताने यात हात घातलेलाच नाही. या जगात तुम्ही स्वतंत्रच आहात. *उपरी* (वरिष्ठ, मालक) कोण आहे? तुम्हाला अन्डरहॅन्ड (नोकर, हाताखालची माणसे)ची सवय आहे म्हणून तुम्हाला *उपरी* भेटतात, नाही तर तुमचा कोणी *उपरीही* नाही व अन्डरहॅन्डही नाही, असे हे जग आहे! हे सर्व समजून घेण्याचीच गरज आहे, दुसरे काही नाही.

मी संपूर्ण जगात सर्व ठिकाणी फिरून आलो, अशी कोणतीच जागा नाही की जिथे उपरीपणा असेल. ईश्वर तुमचा उपरी नाही. तुमचे जोखीमदार तुम्ही स्वतःच आहात. सर्व जगातील लोक मानतात की जग ईश्वराने बनविले. परंतु जे पुनर्जन्माचा सिद्धांत समजतात ते असे मानू शकत नाहीत, की जग ईश्वराने बनविले आहे. पुनर्जन्म म्हणजे काय की 'मी करतो' आणि 'मीच भोगतो.' आणि माझ्याच कर्माचे फळ मी भोगतो. यात ईश्वराचा हस्तक्षेप नाहीच. स्वतः जे काही करतो ते स्वतःच्या जबाबदारीवरच करतो. कोणाच्या जबाबदारीवर आहे हे? समजले ना तुम्हाला?

**प्रश्नकर्ता :** आजपर्यंत मी असे समजत होतो की ईश्वराची जबाबदारी आहे.

**दादाश्री :** नाही. स्वत:चीच जबाबदारी आहे! होल ॲन्ड सोल रिस्पॉन्सिबिलिटी (संपूर्ण जबाबदारी) स्वत:चीच आहे, पण मग त्या माणसाला गोळी का मारली? तो जबाबदार होता म्हणून त्याला त्याचे हे फळ मिळाले आणि हा मारणारा जेव्हा जबाबदार ठरेल तेव्हा त्याचे फळ त्याला मिळेल. त्याची वेळ येईल तेव्हा फळ मिळेल.

जसे, आजच झाडाला कैरी लागली तर आजच्या आज कैरी आणून तिचा रस काढू शकत नाही. ती तर जेव्हा वेळ येईल, मोठी होईल, पिकेल, तेव्हा तिचा रस निघेल. त्याचप्रमाणे ही जी गोळी लागली ना, तीसुद्धा आधी पिकून तयार होते, त्यानंतर ती लागते. अशीच काही लागत नाही. आणि मारणाऱ्याने गोळी मारली त्याची आज इतकी छोटीशी कैरी तयार झाली आहे, ती मग मोठी झाल्यावर पिकेल, त्यानंतरच तिचा रस निघेल.

## कर्मबंधन, आत्म्याला की देहाला?

**प्रश्नकर्ता :** तर मग कर्मबंधन कोणाला होत असते? आत्म्याला की देहाला?

**दादाश्री :** हा देह तर स्वत:च कर्म आहे. मग त्याला दुसरे बंधन कसे काय होणार? हे तर ज्याला बंधन वाटत असेल, जो जेलमध्ये बसलेला असेल त्याला बंधन आहे. जेलला बंधन असते की जो जेलमध्ये बसलेला असतो त्याला बंधन असते? म्हणजे हा देह जेल आहे आणि त्याच्या आत जो बसला आहे त्याला बंधन आहे. जो असे मानतो की, 'मी बांधलेला आहे, मी देह आहे, मी चंदुभाऊ आहे' त्याला बंधन आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आपल्याला असे म्हणायचे आहे की आत्मा देहाच्या माध्यमातून कर्मे बांधतो आणि देहाच्या माध्यमातून कर्मे सोडतो?

**दादाश्री :** नाही, असे नाही. आत्मा तर यात हात घालतच नाही. खरे तर, आत्मा भिन्नच आहे, स्वतंत्र आहे. विशेषभावामुळेच हा अहंकार उत्पन्न झाला आहे आणि तोच कर्मे बांधतो आणि तोच कर्मे भोगतो. 'तुम्ही शुद्धात्मा आहात' पण बोलता की मी 'चंदुभाऊ आहे.' स्वतः जो नाही, तोच 'मी आहे' असा भाव करणे यालाच अहंकार म्हणतात. परक्याच्या स्थानाला स्वतःचे स्थान मानता, हा इगोइजम (अहंकार) आहे. हा अहंकार सुटला तर स्वतःच्या स्थानावर येऊ शकता. तिथे बंधन नसतेच.

## कर्म अनादिपासून आत्म्यासोबत

**प्रश्नकर्ता :** आत्म्याची कर्मरहित अशी स्थिती होत असेल ना? ती केव्हा होते?

**दादाश्री :** ज्याला एकाही संयोगाची *वळगणां* (बंधन, वेढा) नसेल, त्याला कधी कर्मे चिकटतच नाहीत. ज्याला कोणत्याही प्रकारची *वळगणां* नसेल, त्याच्या कर्माचा असा कोणत्याही प्रकारचा हिशोब नसतो की जेणेकरून त्याला कर्मे चिकटतील. सध्या सिद्धगतीत जे सिद्ध भगवंत आहेत त्यांना कोणत्याही प्रकारचे कर्म चिकटत नाही. *वळगणां* संपली की कर्मे चिकटत नाही.

ही तर संसारात *वळगणां* निर्माण झाली आहे. आणि ती अनादी काळापासून आहे. आणि ते सर्व सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्समुळे आहे. सर्व तत्त्वे गतिमान होत असतात आणि तत्त्वे गतिमान झाल्यानेच हे सर्व निर्माण झाले आहे. ही सर्व भ्रांती उत्पन्न झाली आहे. त्यामुळे हे सर्व विशेषभाव उत्पन्न झाले आहेत. भ्रांती म्हणजेच विशेषभाव. त्याचा जो मूळ स्वभाव होता, त्याऐवजी विशेषभाव उत्पन्न झाला आणि त्यामुळे हा सर्व बदल घडला आहे. म्हणजे पूर्वी आत्मा कर्मरहित होता, असे तर कधीच झालेले नाही. तो जेव्हा ज्ञानी पुरुषाकडे येतो तेव्हा त्याचे कर्माचे ओझे बरेचसे हलके झालेले असते अर्थात तो हळुकर्मी (हलके कर्म असलेला) झालेला असतो. हळुकर्मी असल्यामुळेच तर

त्याला ज्ञानी पुरुष भेटतात. ज्ञानी भेटतात, तो सुद्धा सायंटिफीक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे. स्वतःच्या प्रयत्नाने जर करायला गेला तर असे शक्य होणारच नाही. सहज प्रयत्न, सहजासहजी भेटले तर काम होते.

कर्मे संयोग आहेत आणि त्यांचा स्वभाव वियोगी आहे.

## संबंध, आत्मा आणि कर्मांचा...

**प्रश्नकर्ता :** आत्मा आणि कर्म यांच्यात काय संबंध आहे?

**दादाश्री :** दोघांमध्ये कर्तारूपी कडी नसेल तर दोन्ही वेगळे होऊन जातात. आत्मा, आत्म्याच्या जागेवर आणि कर्म, कर्माच्या जागेवर, दोन्ही वेगळे होऊन जातात.

**प्रश्नकर्ता :** नीट समजले नाही.

**दादाश्री :** कर्ता झाला नाही तर कर्म नाहीच. कर्ता आहे म्हणून कर्म आहे. तुम्ही हे कार्य करत असाल परंतु जर तुम्ही त्याचे कर्ता झाला नाहीत तर तुम्हाला कर्मबंधन होणार नाही. इथे तर तुम्हाला 'मी केले' असे कर्तापद आहे, त्यामुळे कर्मबंधन आहे.

**प्रश्नकर्ता :** तर कर्मच कर्ता आहे का?

**दादाश्री :** कर्ता हा कर्ता आहे. 'कर्म' हा कर्ता नाही. तुम्ही 'मी केले' असे म्हणता की 'कर्माने केले' असे म्हणता?

**प्रश्नकर्ता :** 'मी करत आहे' असे तर आत वाटतच असते ना! 'मी केले' असेच म्हणतो.

**दादाश्री :** हो, तो 'कर्ता.' 'मी करत आहे' असे म्हणता म्हणून तुम्ही कर्ता बनता. बाकी, 'कर्म' कर्ता नाही. 'आत्मा' पण कर्ता नाही.

**प्रश्नकर्ता :** एकीकडे कर्म आहे आणि दुसरीकडे आत्मा आहे, तर या दोघांना वेगळे कसे करायचे?

**दादाश्री :** वेगळेच आहेत. ही कडी निघाली ना तर दोन्ही वेगळेच आहेत. पण ही फक्त कर्तापदाची कडीच आहे. या कडीमुळे बांधलेले आहोत असे वाटते. कर्तापद गेले, कर्तापद करणारा गेला. 'मी केले' असे म्हणणारा गेला तर झाले, संपले. मग दोन्ही वेगळेच आहेत.

## कर्मे बांधली जातात, ही तर अंत:क्रिया

**प्रश्नकर्ता :** मनुष्याला कर्मे लागू पडत असतील की नाही?

**दादाश्री :** तो निरंतर कर्मे बांधतच असतो. दुसरे काहीच करत नाही. मनुष्याचा अहंकार असा आहे की तो खात नाही, पीत नाही, संसार करत नाही, व्यापार करत नाही, तरीही फक्त अहम्कारच करत असतो की 'मी करतो.' त्यामुळेच सर्व कर्मे बांधत असतो. हे पण एक आश्चर्यच आहे ना? हे प्रूव्ह (सिद्ध) होऊ शकेल असे आहे! खात नाही, पीत नाही हे सिद्ध होऊ शकेल असे आहे. आणि तरीही कर्म करत असतो, हे सुद्धा सिद्ध होऊ शकते. आणि फक्त ही मनुष्येच कर्मे बांधत असतात.

**प्रश्नकर्ता :** शरीरासाठी खात-पीत असेल, पण तरी स्वत: कर्म बांधत नसेलही ना!

**दादाश्री :** त्याचे असे आहे, कोणतीही व्यक्ती कर्म करत असते तर ते डोळ्यांनी दिसत नाही. दिसते का तुम्हाला? हे जे डोळ्यांनी दिसते त्यालाच जगातील लोक कर्म म्हणतात. त्यांनी हे केले, यांनी हे केले, यांनी याला मारले, असे कर्म बांधले. जगातील लोक तर असेच म्हणतात ना?

**प्रश्नकर्ता :** हो, जसे दिसते तसेच म्हणतात.

**दादाश्री :** कर्म म्हणजे त्यांची कृती काय झाली, त्याने शिवी दिली तरीही कर्म बांधले, त्याने मारले तरीही कर्म बांधले, खाल्ले तरीही कर्म बांधले. झोपला तरीही कर्म बांधले, तो जी कृती करतो,

त्याला आपले लोक कर्म म्हणतात. पण वास्तविकतेत जे दिसते ते कर्मफळ आहे, ते कर्म नाही.

जेव्हा कर्मबंधन होते तेव्हा अंतरदाह होत राहतो. लहान मुलाला कडू औषध पाजले तेव्हा तो काय करतो? तोंड वाकडे करतो ना! आणि गोड खायला दिले तर? खुश होतो. या जगात सर्व जीव राग-द्वेष करतात, ती सर्व कॉजेस (कारणे) आहेत, आणि त्यातूनच ही कर्मे उत्पन्न झाली आहेत. जे स्वत:ला आवडते ते व जे स्वत:ला आवडत नाही ते, अशी दोन्ही प्रकारची कर्मे येतात. न आवडणारी कर्मे चावतात, म्हणजे दु:ख देऊन जातात. आणि आवडणारी कर्मे सुख देऊन जातात. म्हणजे कॉजेस मागच्या जन्मात झालेले आहेत, ते या जन्मात फळ देतात.

## कर्मबीजाचे नियम

**प्रश्नकर्ता :** कर्मबीज कधी पडते आणि कधी पडत नाही, हे जरा समजावून सांगता का?

**दादाश्री :** हो, जर तुम्ही म्हणाल की, 'हा नाश्ता किती छान झाला आहे, तो 'मी खाल्ला,' तर बीज पडले. 'मी खाल्ले' बोलण्यात अडचण नाही. परंतु 'कोण खातो', ते तुम्ही जाणले पाहिजे की मी खात नाही, खाणारा खात आहे. पण इथे तर स्वत:

कर्ता बनतो आणि कर्ता बनल्यामुळेच बीज पडते.

कोणी शिव्या दिल्या तरी त्याच्यावर द्वेष नाही, फुले वाहिली किंवा खांद्यावर उचलून फिरवले तरी त्याच्यावर राग (आसक्ती, मोह) नाही. तर त्याला कर्म बांधले जात नाही.

**प्रश्नकर्ता :** राग-द्वेष होतात पण समजत नाही, त्यावर काय उपाय?

**दादाश्री :** त्याचे त्याला असे बक्षीस मिळते की त्यामुळे पुढील जन्मात त्याचे भटकणे चालूच राहते.

## संबंध, देह आणि आत्म्याचा...

**प्रश्नकर्ता :** देह आणि आत्मा, यांच्यातील संबंधांविषयी अजून जरा विस्तारपूर्वक समजवा ना?

**दादाश्री :** हा जो देह आहे, तो आत्म्याच्या अज्ञानतेने उत्पन्न झालेला परिणाम आहे. जे जे 'कॉजेस' केले होते, त्याचा हा 'इफेक्ट' (परिणाम) आहे. कोणी तुम्हाला फुले वाहिली तर तुम्ही खुश होता आणि कोणी शिवी दिली तर तुम्ही चिडता. त्या चिडण्यात आणि खुश होण्यात बाह्य दर्शनाला किंमत नाही. अंतरभावाने कर्मे चार्ज होतात. ती मग पुढील जन्मात डिस्चार्ज होतात, त्यावेळी ती 'इफेक्टिव' आहेत. मन-वचन-काया तिन्ही गोष्टी 'इफेक्टिव' आहेत. 'इफेक्ट' भोगताना दुसरे नवीन कॉजेस उत्पन्न होतात. जे पुढील जन्मात परत 'इफेक्टिव' होतात. अशा प्रकारे 'कॉजेस आणि 'इफेक्ट', 'इफेक्ट' आणि 'कॉजेस' हे चक्र निरंतर चालूच राहते. फॉरेनच्या सायंटिस्टांनाही हे समजते की अशा प्रकारे पुनर्जन्म आहे. म्हणून ते खूप खुश होतात की इफेक्ट ॲन्ड कॉजेस आहेत हे!

म्हणजेच हे सर्व इफेक्ट आहेत. तुम्ही वकिली करता तो सर्व इफेक्ट आहे. इफेक्टमध्ये अहंकार करू नये की 'मी केले.' इफेक्ट तर आपोआपच येतो. हे पाणी खाली जाते तेव्हा ते असे म्हणत नाही की 'मी जात आहे', ते समुद्राकडे चारशे मैल असे-तसे वळून जातच असते ना! आणि मनुष्य तर एखाद्याची केस जिंकून दिली तर 'मी कशी जिंकून दिली' असे बोलतो. आता त्याने त्याचा अहंकार केला त्यामुळे त्याचे कर्म बांधले गेले, कॉज झाला. त्याचे फळ मग इफेक्टमध्ये येईल.

## कारण-कार्य, याचे रहस्य

इफेक्ट तुम्हाला समजला का? जो आपोआप होत असतो, तो इफेक्ट. आपण परीक्षा देतो त्याला कॉज म्हटले जाते. नंतर आपण परिणामाची चिंता करायची नसते. तो तर इफेक्ट आहे. पण सारे

जग परिणामाची चिंता करत असते. खरे तर, कॉजसाठी चिंता करायला हवी!

हे विज्ञान तुला समजले का? विज्ञान सैद्धांतिक असते. अविरोधाभास असते. तू बिझनेस केला व दोन लाख कमावले, ते कॉजेस आहेत की इफेक्ट?

**प्रश्नकर्ता :** कॉजेस आहेत.

**दादाश्री :** कशाप्रकारे कॉजेस आहेत ते मला समजावून सांग. मनासारखे करू शकतोस का तू?

**प्रश्नकर्ता :** आपण बिझनेस करतो तेव्हा जे व्हायचे असते ते होतेच, तो इफेक्ट आहे. परंतु बिझनेस करण्यासाठी कॉजेस तर करावे लागतात ना? तेव्हाच बिझनेस करू शकतो ना?

**दादाश्री :** नाही, कॉजेसमध्ये इतर कोणत्याही रिलेटिव्ह वस्तू वापरल्या जात नाहीत. बिझनेस तर, शरीर चांगले असेल, डोके चांगले चालत असेल, हे सर्व असेल तेव्हा होतो ना! सगळ्यांच्या आधारावर जो होत असेल तो इफेक्ट आणि जो माणूस बसल्याबसल्या 'याचे वाईट होईल, असे होईल.' असे करतो, ते सर्व कॉजेस आहेत. कारण यात आधार किंवा इतर कोणत्याही वस्तूची गरज नसते.

**प्रश्नकर्ता :** तर मग आम्ही जो बिझनेस करत असतो त्याला इफेक्ट म्हणतात का?

**दादाश्री :** इफेक्टच म्हणतात ना! बिझनेस हा इफेक्टच आहे. परीक्षेचा परिणाम येतो, त्यात काही करावे लागते का? परीक्षेत जे करावे लागते, त्याला कॉजेस म्हणतात. परीक्षेत काहीतरी करावे लागते. पण परिणामामध्ये काही करावे लागते का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** तसेच यात काही करावे लागत नाही. हे सर्व होतच

राहते. आपले शरीर वगैरे वापरले जाते आणि सर्व होतच राहते, कॉजमध्ये तर स्वत:ला करावे लागते. हा जो कर्ताभाव आहे तो कॉज आहे, बाकी सर्व इफेक्ट आहेत. भोक्ताभाव हा कॉज आहे.

**प्रश्नकर्ता :** जे भाव आहेत ते सर्व कॉजेस आहेत, बरोबर.

**दादाश्री :** हो, जिथे दुसऱ्या कोणाच्याही मदतीची गरज भासत नाही. तुम्ही फर्स्ट क्लास स्वयंपाक बनवता तो सर्व इफेक्टच आहे. आणि त्यात तुम्ही जो आत भाव करता की, 'मी किती छान स्वयंपाक केला, किती छान केला.' हा भाव तो तुमचा कॉज. जर भाव केला नाही तर सर्व इफेक्टच आहे. ऐकू शकतो, पाहू शकतो, हे सर्व इफेक्ट्स आहेत. कॉजेस पाहता येत नाहीत.

**प्रश्नकर्ता :** तर पाच इंद्रियांनी जे काही होते तो सर्व इफेक्ट आहे का?

**दादाश्री :** हो, तो सर्व इफेक्ट आहे. संपूर्ण आयुष्यच इफेक्ट आहे. आणि आत जे भाव होत असतात ते भाव कॉजेस आहेत, पण भावांचा कर्ता असला पाहिजे. आणि जगातील लोक, ते तर कर्ता आहेतच.

कर्म बांधण्याचे थांबले तर काम होईल. हे तुम्हाला समजते का? तुमची कर्मे बांधण्याची थांबतात का? असे कधी पाहिले आहे? शुभात पडाल तर शुभ कर्म बांधले जाईल अन्यथा अशुभ तर आहेच. कर्मे सोडतच नाहीत! आणि जर हे जाणून घेतले की 'स्वत: कोण आहे, हे सर्व कोण करतो?' तर मग कर्मबंधन होणारच नाही ना!

## पहिले कर्म कशाप्रकारे आले?

**प्रश्नकर्ता :** कर्माच्या थियरीनुसार कर्मे बांधली जातात आणि त्याचा परिणाम भोगावा लागतो. याप्रकारे तुम्ही कॉज आणि इफेक्टबद्दल सांगितले तर आधी कॉज व नंतर त्याचा इफेक्ट, तर आपण तर्कदृष्टीने विचार केला आणि मागे मागे जात राहिलो तर असा प्रश्न पडतो की, सर्वात प्रथम कॉज कशाप्रकारे झाले असेल?

**दादाश्री :** 'अनादि'मध्ये प्रथम असे काही नसतेच ना! ही गोलाकार माळ पाहिली आहे का तुम्ही? हे सूर्यनारायण फिरतात तर त्याची सुरुवात कुठून करत असतील?

**प्रश्नकर्ता :** त्याची सुरुवातच नसते.

**दादाश्री :** म्हणजे या जगाची बिगिनिंग (सुरुवात) कोणत्याही जागी झालेली नाही. पूर्ण गोलच आहे. राउंडच आहे. पण यातून सुटका होऊ शकते. याची बिगिनिंग नाही! आत्मा आहे म्हणून सुटका होऊ शकते. पण याची बिगिनिंग नाही. सर्वच गोल आहे, प्रत्येक गोष्ट गोल आहे. कोणतीही गोष्ट चौकोनी नाही. चौकोन असेल तर आपण म्हणू शकतो की या कोपऱ्यापासून सुरुवात झाली आहे आणि त्या कोपऱ्याला ती संपते. गोलाकारात तर कोपरा नसतोच ना? संपूर्ण जगच गोल आहे, यात बुद्धी काम करू शकेल अशी नाही. म्हणून बुद्धीला सांगा, चूपचाप बस एका कोपऱ्यात. बुद्धीने समजेल असे हे नाही. हे तर ज्ञानानेच समजेल.

अंडे आधी की कोंबडी? अरे बाबा सोड ना! ही गोष्ट बाजूला सारून पुढचे बोल की! नाही तर पुन्हा पुन्हा अंडे आणि कोंबडी व्हावे लागेल. पण हा तर सोडतच नाही. ज्याचे समाधान होत नाही ते सर्व गोल आहे. लोक म्हणतात ना की हा तर गोल-गोल बोलतो.

**प्रश्नकर्ता :** तरीसुद्धा हा प्रश्न उभाच राहतो की जन्माअगोदर कर्म कुठून आले? चौऱ्यांशी लाख फेरे सुरू झाले. हे पाप-पुण्य कुठून व केव्हापासून सुरू झाले?

**दादाश्री :** अनादि काळापासून.

**प्रश्नकर्ता :** पण त्याची काहीतरी सुरुवात तर असेलच ना?

**दादाश्री :** जेव्हापासून बुद्धी सुरू झाली तेव्हापासून सुरुवात आणि बुद्धी संपते तेव्हा पूर्ण होते, समजले ना? बाकी, आहे अनादी काळापासूनच!

**प्रश्नकर्ता :** ही जी बुद्धी आहे ती कोणी दिली?

**दादाश्री :** कोण देणारा आहे? *उपरी* कोणीच नाही ना! दुसरा कुणीच नाही. कोणी देणारा असेल तर मग तो *उपरी* झाला. *उपरी* ठरला म्हणजे तो कायम आपल्या माथी राहील. मग जगात मोक्ष नसणारच. जेथे *उपरी* असेल तेथे मोक्ष असेल का?

**प्रश्नकर्ता :** परंतु सर्वात पहिले कोणते कर्म झाले? ज्याच्यामुळे हे शरीर मिळाले?

**दादाश्री :** हे शरीर कोणीही दिलेले नाही. ही सर्व सहा तत्त्वे एकत्र आल्यामुळे, असे समोरासमोर जोडले गेल्यामुळे 'त्याच्या' या सर्व अवस्था उत्पन्न झाल्या आहेत. म्हणजे शरीर मिळालेलेही नाही. हे तर तुम्हाला तसे दिसते ती चूक आहे. भ्रांतीमुळे तसे दिसते. ही भ्रांती गेली तर काहीच उरणार नाही. हे जे तुम्ही 'मी चंदुभाऊ आहे' असे समजता, त्यामुळे हे सर्व उत्पन्न झाले आहे.

## कर्म एक जन्माचे की अनेक जन्मांचे?

**प्रश्नकर्ता :** ही जी सर्व कर्मे आहेत ती एकाच जन्मात भोगून पूर्ण होत नाहीत. म्हणूनच अनेक जन्म घ्यावे लागतात ना, ती भोगण्यासाठी. जोपर्यंत कर्मे भोगून पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मोक्ष कुठे आहे?

**दादाश्री :** मोक्षाची गोष्टच कुठे उरली? मागील जन्मांची कर्मे जेव्हा पूर्ण होतात तेव्हाच तर देह सुटतो. आणि तोपर्यंत आत नवीन कर्मे बांधलीच गेलेली असतात. म्हणजे मोक्षाची गोष्ट करण्यासारखी राहिलीच कुठे? जुनी, मागील इतर कर्मे काही येत नाहीत. तुम्ही आत्तासुद्धा कर्मेच बांधत आहात. आत्ता तुम्ही माझ्याशी बोलत आहात ना, त्याक्षणी देखील पुण्यकर्म बांधत आहात. पुण्यानुबंधी पुण्यकर्म बांधत आहात.

## करतो कोण आणि भोगतो कोण?

**प्रश्नकर्ता :** दादा, मागील जन्मात जी कर्मे केली ती या जन्मात

भोगावी लागतात, तर मागील जन्मात ज्या देहाने भोगले तो देह तर जळून गेला, आणि आत्मा तर निर्विकार आहे, तो आत्मा दुसरा देह घेऊन येतो, पण मग या देहाला मागील देहाने केलेली कर्म का भोगावी लागतात?

**दादाश्री :** त्या देहाने केलेली कर्मे तर तो देह भोगून झाल्यानंतरच संपतो.

**प्रश्नकर्ता :** तर?

**दादाश्री :** ही तर चित्रीत केलेली, मानसिक कर्मे आहेत. सूक्ष्म कर्मे. ज्याला आपण कॉजल बॉडी म्हणतो ना, कॉजेस.

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे, पण त्या देहाने भाव तर केले होते ना?

**दादाश्री :** देहाने भाव केलेले नव्हते.

**प्रश्नकर्ता :** मग कोणी केले?

**दादाश्री :** देहाने तर स्वत:चे फळ भोगले ना! दोन थोबाडीत मारल्या म्हणजे देहाला फळ मिळूनच जाते. पण जे त्याच्या योजनेत होते तेच आता रूपकामध्ये आले.

**प्रश्नकर्ता :** हो, पण ती योजना कोणी केली? त्या देहानेच योजना केली होती ना?

**दादाश्री :** देहाचे तर काही देणेघेणे नाही! बस, अहंकारच हे सर्व करतो.

## या जन्माचे याच जन्मात?

**प्रश्नकर्ता :** या सर्व कर्मांची फळे आपल्याला याच जन्मात भोगायची की मग पुढील जन्मातही भोगावी लागतात?

**दादाश्री :** मागच्या जन्मी जे कर्म केले होते, ते योजनेत होते, म्हणजे कागदावर लिहिलेली योजना. ते आता रूपकरूपाने (प्रत्यक्षात)

येते, फळ देण्यासाठी सन्मुख होते, तेव्हा त्याला प्रारब्ध म्हणतात. किती काळाने परिपक्व होते? तर पन्नास, पंचाहत्तर, शंभर वर्षांनी परिपक्व होत असते, तेव्हा फळ देण्यासाठी सन्मुख होते.

मागील जन्मी कर्मे बांधली, ती कित्येक वर्षांनी परिपक्व होतात, तेव्हा या जन्मात फळ देतात आणि ते फळ देतेवेळी जगातील लोक काय म्हणतात की यांनी कर्मे बांधली. ह्या माणसाने त्या माणसाला दोन थोबाडीत मारल्या, त्यावर जगातील लोक काय म्हणतात, की याने कर्म बांधले. कोणते कर्म बांधले? तर म्हणे, 'दोन थोबाडीत मारल्या.' त्याला त्याचे फळ भोगावे लागेल. ते (फळ) परत येथे मिळतेच, कारण थोबाडीत मारल्या, परंतु थोबाडीत खाणारा आज नरम पडला (मागे हटला) पण त्याला जेव्हा संधी मिळेल तेव्हा तो वैर वसूल केल्याशिवाय राहणार नाही ना! यालाच लोक म्हणतात की बघा, कर्माचे फळ भोगलेच ना शेवटी! यालाच म्हणतात, 'इथल्या इथे फळ भोगले.' पण आपण त्याला सांगावे तुझे म्हणणे बरोबर आहे, याचे फळ भोगायचे, परंतु त्याने दोन थोबाडीत का मारल्या? कोणत्या आधारावर मारल्या? तो आधार (कारण) त्याला सापडत नाही. तो तर म्हणेल 'त्यानेच मारले.' पण हे तर त्याला उदयकर्म नाचवित असते. पूर्वी जे कर्म केले होते, ते आता नाचवते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ही जी थोबाडीत मारली ते कर्माचे फळ आहे, कर्म नाही, हे बरोबर आहे ना?

**दादाश्री :** होय, ते कर्मफळ आहे. उदयकर्म त्याच्याकडून असे करवीत असते म्हणून तो दोन थोबाडीत मारतो. मग तो मार खाणारा काय म्हणतो की 'भाऊ, अजून एक-दोन मार ना!' तेव्हा तो काय म्हणतो, 'मला काय अक्कल नाही? मूर्ख आहे का मी!' उलट तो रागावतो. त्याला मारले त्यामागे कारण आहे, दोघांचा हिशोब असतो आणि त्या हिशोबाबाहेर काहीच घडत नाही. अर्थात हे जग हिशोबी आहे, एकेक पैचा हिशोब आहे. म्हणजेच या जगात अजिबात घाबरण्यासारखे नाही, निवांतपणे झोपून जाण्यासारखे आहे.

पण तरी अगदीच निर्धास्त व्हायचे नाही की मला काहीच होणार नाही.

## कर्मफळ-लोकभाषेत, ज्ञानींच्या भाषेत

**प्रश्नकर्ता :** सर्व इथल्या इथे भोगायचे आहे असे म्हणतात, ते काय खोटे आहे का?

**दादाश्री :** भोगायचे इथल्या इथेच आहे पण ते या जगाच्या भाषेत. अलौकिक भाषेत याचा अर्थ काय होतो?

मागील जन्मात अहंकाराचे, मानाचे कर्म बांधलेले असेल, तर या जन्मात त्याच्या सर्व बिल्डिंग्स् बांधल्या जातात, त्यामुळे तो या जन्मात मानी बनतो. कशामुळे मानी बनतो? कर्माच्या हिशोबाने तो मानी बनतो. आता तो मानी झाला म्हणून त्याला लोक काय म्हणतात की, हा जो एवढा मान मिरवतो आहे ना, त्यामुळे कर्म बांधत आहे. लोक याला कर्म म्हणतात. परंतु भगवंताच्या भाषेत तर हे कर्माचे फळ आले आहे. फळ म्हणजे मान धरायचा नसेल तरीही धरावाच लागतो, मान उत्पन्न होतोच.

आणि जगातील लोक जे म्हणतात ना की हा क्रोध करतो, मान करतो, अहंकार करतो, तर त्याचे फळ इथल्या इथेच भोगावे लागते. मान केल्याचे फळ इथल्या इथे कसे येते की, त्याची अपकीर्ती पसरते, अपयश येते, ते इथेच भोगावे लागते. मान मिरवत असताना जर मनात असे वाटत असेल की, हे चुकीचे होत आहे, असे होऊ नये. मला मान विलय करायची गरज आहे, जर असे भाव येत असतील तर तो नवीन कर्म बांधतो. त्यामुळे मग पुढील जन्मात मान कमी होतो.

कर्माची थियरी अशी आहे. चुकीचे करत असताना जर आतील भाव बदलले गेले तर नवीन कर्मे त्यानुसार बांधली जातात. पण जर चुकीचे करून उलट आत खुश होत असेल की, 'असेच करण्यासारखे आहे' तर मग नवीन कर्म मजबूत होते, निकाचित होते. ते मग अवश्य भोगावेच लागते!

संपूर्ण सायन्सच समजून घेण्यासारखे आहे. वीतरागांचे विज्ञान खूप गुह्य आहे.

## ...की मग या जन्माचे पुढील जन्मात?

**प्रश्नकर्ता :** तर काय या जन्मात केलेल्या कर्मांची फळे पुढील जन्मात मिळू शकतात?

**दादाश्री :** हो, याच जन्मात मिळत नाही.

**प्रश्नकर्ता :** तर आता या जन्मात आम्ही जे भोगत आहोत ते मागील जन्माचे फळ आहे का?

**दादाश्री :** हो, ते मागील जन्माचे फळ आहे आणि त्याचबरोबर पुढील जन्मासाठी नवीन कर्मेही बांधली जात आहेत. म्हणून तुम्ही नवीन कर्मे चांगली करायला हवीत. हे तर बिघडले आहे पण पुढील बिघडू नये याकडे लक्ष असावे.

**प्रश्नकर्ता :** सध्या कलियुग चालू आहे. कलियुगाच्या प्रभावामुळे आता मनुष्य चांगली कर्मे तर करू शकत नाही.

**दादाश्री :** चांगल्या कर्मांची गरज नाही.

**प्रश्नकर्ता :** तर कशाची गरज आहे?

**दादाश्री :** आतील सद्भावनेची गरज आहे. जर प्रारब्ध चांगले असेल तर चांगली कर्मे होऊ शकतात, नाहीतर होऊ शकत नाहीत. परंतु जरी प्रारब्ध चांगले नसेल तरीही चांगली भावना तर होऊ शकते.

## वाईट कर्माचे फळ केव्हा?

**प्रश्नकर्ता :** चांगल्या किंवा वाईट कर्मांची फळे याच जन्मात किंवा पुढील जन्मात भोगावी लागतात, मग जीव मोक्षगती कशी प्राप्त करू शकतील?

**दादाश्री :** कर्मांची फळे नुकसान करत नाहीत. कर्माची बीजे

नुकसान करतात. मोक्षात जाण्यासाठी कर्मबीज टाकायचे बंद झाले की कर्मफळ त्यात अडसर निर्माण करू शकत नाही, पण कर्मबीजे अडसर निर्माण करतात. बीजे का अडसर निर्माण करतात? तर तू टाकली आहेत म्हणून तू त्यांचा स्वाद चाखून जा, त्यांचे फळ चाखून जा. चाखल्याशिवाय जाऊ शकत नाही. अर्थात ती (कर्मबीजे) अडवणारी आहेत, कर्मफळे अडवणारी नाहीत. फळ तर म्हणते की तू तुझ्या परीने खाऊन निघून जा.

**प्रश्नकर्ता :** पण आपण सांगितले होते की, एका टक्क्या इतके जरी कर्म केले असेल तरी ते भोगावेच लागते?

**दादाश्री :** हो, भोगावेच लागते, भोगल्याशिवाय चालतच नाही. कर्माचे फळ भोगत असतानाही मोक्ष होईल असाही मार्ग असतो. परंतु कर्म बांधत असताना मात्र मोक्ष होत नाही. कारण ते जर कर्म बांधत असतील तर त्याचे फळ खायला अजून राहावेच लागेल ना!

**प्रश्नकर्ता :** आपण जी चांगली-वाईट कर्मे करतो. ती याच जन्मात भोगायची असतात की पुढील जन्मात?

**दादाश्री :** ज्या कर्माला लोक पाहू शकतात की 'याने वाईट कर्म केले. याने चोरी केली, याने लबाडी केली, याने धोका दिला, ते सर्व इथेच भोगायचे आणि त्या कर्मांमुळेच आत राग-द्वेष उत्पन्न होतात, त्यांचे फळ पुढील जन्मात भोगायचे.

## प्रत्येक जन्म मागील जन्मांचे सार

**प्रश्नकर्ता :** आता ही जी कर्मे आहेत, ती अनंत जन्मांची आहेत का?

**दादाश्री :** प्रत्येक जन्म, अनंत जन्मांच्या सार रूपाने असतो. सर्व जन्मांचे एकत्र जमा होत नाही. कारण नियम असा आहे की काळ परिपक्व झाल्यावर फळ पिकलेच पाहिजे, नाहीतर कितीतरी कर्मे बाकी राहतील.

**प्रश्नकर्ता :** हे सर्व मागील जन्माशी जोडलेले आहे ना?

**दादाश्री :** हो, त्याचे असे आहे की एका जन्मात दोन कामे करू शकत नाही, कॉजेस आणि इफेक्ट दोन्ही एकाच वेळी करू शकत नाही. कारण कॉजेस आणि इफेक्ट या दोघांचा अवधी एकत्र होणे हे कसे शक्य आहे? अवधी पूर्ण झाल्यानंतर कॉजेस इफेक्टीव होतात. अवधी पूर्ण झाल्याशिवाय हे शक्य होत नाही. जसे की आंब्याचे झाड असते, तर त्याला मोहर आल्यानंतर एवढीशी कैरी येते. तिला पिकण्यास वेळ लागतो की नाही? आपण दुसऱ्या दिवशी असा नवस केला की ती कैरी लवकर पिकावी तर काय ती पिकेल? म्हणजे आपण जी कर्मे बांधत असतो त्यांना परिपक्व होण्यासाठी शंभर वर्षे हवीत. त्यानंतरच ती फळ देण्यासाठी सन्मुख होतात.

**प्रश्नकर्ता :** या जन्माची जी कर्मे आहेत ती मागच्या जन्माचीच असतात की त्या आधीच्या अनंत जन्मांची असतात?

**दादाश्री :** नाही, असे नसते या निसर्गाचे. निसर्ग तर फार चोख आहे. व्यापाऱ्यांना सुद्धा जमणार नाही, अशी सुंदर पद्धत आहे! आजपासून दहाव्या जन्मात जी कर्मे झाली असतील त्यांचा हिशोब काढून तो नफा-तोटा खेचून पुढे आणला जातो, नवव्या जन्मात. आता त्यातही सर्व कर्मे येत नाहीत, फक्त ताळेबंद हिशोब (सार) काढून कर्मे येतात. नवव्यामधून आठव्यात, आठव्यामधून सातव्यात. अशाप्रकारे आत जितक्या वर्षांचे आयुष्य असेल तितक्याच वर्षांची कर्मे असतात. पण ती मग तशाच रूपाने आत येतात, परंतु ती एका जन्माचीच म्हटली जातात. दोन जन्मांची एकत्र आहेत असे म्हणू शकत नाही.

कर्म परिपक्व होण्यासाठी वेळ लागतो. काही लोकांची तर पाचशे वर्षात, हजार-हजार वर्षात परिपक्व होतात. पण तरीसुद्धा वहीखात्यात ते नवीनच असतात.

**प्रश्नकर्ता :** कॅरी फोरवर्ड होतात का?

**दादाश्री :** हो, वहीखात्याची गोष्ट तुम्हाला समजली? जुन्या वहीखात्याची नवीन वहीखात्यात येतात. आणि ती व्यक्ती आता

नवीन वहीखात्यात येणार, काहीही बाकी न उरता. म्हणजेच ही कर्मे कॉजेस रूपाने बांधली जातात. ती इफेक्टिव केव्हा होतात? तर पन्नास-साठ-पंच्याहत्तर वर्षे निघून गेल्यानंतर ती फळ देण्यासाठी इफेक्टिव होतात.

## या सर्वांचा संचालक कोण?

**प्रश्नकर्ता :** तर मग हे सर्व कोण चालवतो?

**दादाश्री :** हे सर्व तर, कर्माचा नियम असा आहे की, तुम्ही जी कर्मे करता त्याचा परिणाम आपोआपच नैसर्गिकरित्या येतो.

**प्रश्नकर्ता :** ही कर्मांची फळे आम्हाला भोगावी लागतात. तर ते कोण ठरवतो? कोण भोगायला लावतो?

**दादाश्री :** ठरवण्याची गरजच नाही. कर्मे 'इटसेल्फ' (स्वतःच) करत राहतात. सर्व आपोआपच होत असते.

**प्रश्नकर्ता :** तर मग कर्माच्या नियमाला कोण चालवतो?

**दादाश्री :** 2H आणि O एकत्र झाल्यामुळे पाऊस पडतो, हा कर्माचा नियम.

**प्रश्नकर्ता :** परंतु कोणीतरी बनविला असेल ना, तो नियम?

**दादाश्री :** नियम कोणी बनवीत नाही. बनविला तर मग तो मालक ठरेल. कुणालाही बनविण्याची गरजच नाही. इटसेल्फ पझल (कोडे) झालेले आहे आणि ते विज्ञानाच्या नियमाने होत असते. त्याला आम्ही 'ओन्ली सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स'मुळे हे जग चालते असे म्हणतो. गुजरातीत त्याला म्हटले आहे की, 'व्यवस्थित शक्ती' जगाला चालवते.

## 'व्यवस्थित शक्ती' आणि कर्म

**प्रश्नकर्ता :** तुम्ही जी 'व्यवस्थित शक्ती' म्हणता ती कर्मानुसार आहे?

**दादाश्री :** जग काही कर्माने चालत नाही. जगाला 'व्यवस्थित शक्ती' चालवते. तुम्हाला येथे कोण घेऊन आले? कर्म? नाही. तुम्हाला 'व्यवस्थित शक्ती' येथे घेऊन आली आहे. कर्म तर तुमच्या आत पडलेलेच होते. मग ते तुम्हाला काल का नाही घेऊन आले आणि आजच का घेऊन आले? 'व्यवस्थित शक्ती' काळ एकत्र करते. भाव एकत्र करते. सर्वच संयोग एकत्र आले म्हणून तुम्ही येथे आलात. कर्म तर 'व्यवस्थित'चा एक अंश आहे. संयोग जुळतात तेव्हा म्हणतो, 'मी केले' आणि संयोग जुळत नाहीत तेव्हा?

## फळ मिळते ऑटोमेटिक

**प्रश्नकर्ता :** कर्माचे फळ जर कोणी दुसऱ्याने दिले तर मग ते कर्मच झाले ना?

**दादाश्री :** कर्माचे फळ दुसरा कोणी देतच नाही. कर्माचे फळ देणारा कोणी जन्माला आलाच नाही. फक्त एवढेच की जर इथे कोणी ढेकूण मारण्याचे औषध प्यायला तर तो मरणारच, त्यात मग फळ देण्यासाठी दुसऱ्या कोणाचीही गरज लागत नाही.

फळ देणारा कोणी असता तर खूप मोठे ऑफीस बनवावे लागले असते. हे तर सायंटिफिक पद्धतीने चालत असते. त्यासाठी कोणाची गरजच नाही! त्याचे कर्म जेव्हा परिपक्व होते तेव्हा फळ येऊन उभे राहतेच, आपोआपच. जसे या कच्च्या कैऱ्या स्वत:हूनच पिकतात ना! पिकतात की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, हो.

**दादाश्री :** आंब्याच्या झाडावर पिकत नाहीत का? त्या जशा झाडावर पिकतात ना, त्याच प्रकारे ही कर्मे परिपक्व होतात. जेव्हा त्यांची वेळ येते तेव्हा परिपक्व होऊन फळ देण्यास लायक बनतात.

**प्रश्नकर्ता :** मागच्या जन्मी आम्ही जे कर्म केले, त्याचे या जन्मात फळ आले, तर त्या सर्व कर्मांचा हिशोब कोण ठेवतो? त्याचे वहीखाते कोण ठेवतो?

**दादाश्री :** जेव्हा थंडी पडते तेव्हा पाईपच्या आत जे पाणी असते त्याचा बर्फ कोण बनवतो? तर थंड वातावरण झाले म्हणून. ओन्ली सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स! हे सर्व कर्म-बिर्म करतात, त्याचे फळ येते तेसुद्धा एविडन्स आहे. तुला भूक कशामुळे लागते? सर्व सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे. त्यामुळेच हे सर्व चालते!

## कर्मफळात 'क्रमाचा' आधार

**प्रश्नकर्ता :** कोणत्या क्रमानुसार कर्मांची फळे येतात? ज्या क्रमानुसार ती बांधली गेली असतील त्याच क्रमानुसार त्यांचे फळ येते का? म्हणजे प्रथम हे कर्म बांधले गेले, त्यानंतर हे कर्म बांधले गेले, नंतर हे कर्म बांधले गेले. पहिल्या नंबरावर हे कर्म बांधले गेले तर त्याचा डिस्चार्ज पण पहिल्या नंबरावरच येतो का? नंतर दुसऱ्या नंबरावर हे कर्म बांधले गेले, तर त्याचा डिस्चार्ज दुसऱ्या नंबरावरच येतो, असे आहे का?

**दादाश्री :** नाही, तसे नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग कसे आहे? हे जरा समजावून सांगा.

**दादाश्री :** नाही, तसे नाही. ते सर्व त्याच्या स्वभावानुसार सेट (मांडणी) होऊन जाते की, हे दिवसा भोगण्याचे कर्म, हे रात्री भोगण्याचे कर्म, असे हे सर्व सेट होऊन जाते. हे दुःखात भोगण्याचे कर्म, हे सुखात भोगण्याचे कर्म, असे सेट होते. अशी ही सर्व मांडणी होते.

**प्रश्नकर्ता :** ही मांडणी कोणत्या आधारावर होते?

**दादाश्री :** स्वभावाच्या आधारावर. आपण सर्व एकत्र जमतो, तर सर्वांचे स्वभाव जुळत असल्यामुळेच एकत्र जमतो, नाही तर जमणार नाही.

## केवलज्ञानातच हे दिसते

**प्रश्नकर्ता :** हे कर्म नवे आहे की जुने आहे हे कसे काय दिसेल?

**दादाश्री :** कर्म केले की नाही केले, हे कोणीच पाहू शकत नाही. ते तर फक्त भगवंत की ज्यांना केवलज्ञान आहे, तेच जाणू शकतात. या जगात जी कर्मे तुम्हाला दिसतात, त्यात एका राई इतकेही कर्म नवीन नाही. या कर्मांचे जर ज्ञाता-दृष्टा राहिलात तर नवीन कर्म बांधले जाणार नाही आणि जर तन्मयाकार झालात तर नवीन कर्मे बांधली जातील. आत्मज्ञानी झाल्यानंतरच कर्मे बांधली जात नाहीत. या जगात आत्मा दिसत नाही, कर्मेही दिसत नाहीत पण कर्मफळे दिसतात. जेव्हा कर्मफळ येते तेव्हा लोकांना त्यात गोडी वाटते म्हणून त्यात तन्मयाकार होतात, त्यामुळे भोगावे लागते.

## हे मेले आता कुठून आले?

**प्रश्नकर्ता :** पुष्कळदा असे घडते की, आम्ही अशुभ कर्म बांधत असतो पण त्यावेळी बाहेर तर शुभ कर्माचा उदय असतो.

**दादाश्री :** हो, असे घडते. आता तुमचा शुभ कर्माचा उदय आहे पण आत तुम्ही अशुभ कर्मे बांधू शकता.

तुम्ही बाहेरगावाहून इथे शहरात आलात आणि रात्री उशीर झाला असेल तर मनात विचार येतो की 'आता आपण कुठे झोपणार?' मग तुम्ही म्हणता की, 'इथे माझा एक मित्र राहतो, तिथे आपण जाऊया.' म्हणजे ते चार जण व पाचवे तुम्ही, साडे अकरा वाजता त्या मित्राच्या घरी जाऊन दरवाजा ठोठावता. तो विचारतो, 'कोण आहे?' तेव्हा तुम्ही सांगता 'मी आहे.' तेव्हा तो म्हणतो, 'उघडतो.' दरवाजा उघडल्यावर तो तुम्हाला काय म्हणेल? पाच जणांना बघतो, तुम्हाला एकट्याला बघत नाही, तर सोबत चार-पाच जणांना बघतो, तेव्हा तो तुम्हाला काय म्हणेल? 'परत जा' असे म्हणेल का?

'या, या तुमचे स्वागत आहे!' आपल्याकडे तर सर्व खानदानी माणसे, 'या, या, स्वागत आहे!' असे बोलून घरात घेतात.

**प्रश्नकर्ता :** तो असेही विचारेल की, 'केव्हा आलात आणि केव्हा परत जाल?'

**दादाश्री :** नाही, खानदानी माणसे असे विचारत नाहीत. ते तर 'या, या, स्वागत आहे' असे बोलून आत बसवतात. पण त्यांच्या मनात काय चाललेले असते? की 'आता मेले कुठून आले!' म्हणजे हे बांधले कर्म. तसे करण्याची गरज नाही. ते आले आहेत, त्यांचा हिशोब असेपर्यंत राहतील, नंतर निघून जातील. पण त्याने हा जो शहाणपणा केला की, 'आता मेले कुठून आले' त्यामुळे कर्म बांधले. आता जेव्हा हे कर्म बांधले तेव्हा मला विचारायला हवे होते की, 'माझ्याकडून असे घडत असते, तर मी काय करू?' तर मी सांगेन की, त्यावेळी कृष्ण भगवंताला मानत असाल, किंवा तुम्ही ज्यांना मानत असाल, त्यांचे नाव मनात स्मरून, 'हे भगवंता! माझी चूक झाली, अशी चूक पुन्हा करणार नाही', अशाप्रकारे माफी मागाल तर सर्व पुसले जाईल. बांधलेले कर्म लगेचच पुसले जाईल. जोपर्यंत पत्र पोस्टात टाकले जात नाही, तोपर्यंत ते पत्र (पत्रातील मजकूर) बदलू शकतो. पोस्टात पडले म्हणजे हा देह सुटला आणि कर्म बांधले गेले. म्हणून हा देह सुटण्यापूर्वी तुम्ही ते सर्व पुसून टाकले तर ते पुसले जाईल. आता त्याने एक कर्म तर बांधले ना?

आणि परत तो तुम्हाला काय विचारतो? 'अरे मित्रा, जरा थोडासा, थोडासा... ?' काय विचारतो 'जरा थोडासा'? म्हणजे चहा किंवा कॉफी असे काहीच स्पष्ट बोलत नाही, पण तुम्ही समजून जाता की, तो चहासाठी विचारत आहे. तो म्हणतो 'जरा थोडा थोडा...' तेव्हा तुम्ही म्हणता, 'आता चहा वगैरे राहू द्या ना! आता खिचडी-कढी असली तर चालेल!' तेव्हा मग स्वयंपाकघरात त्याची बायको चिडते. त्यामुळे कर्मे बांधली जातात. आता त्याक्षणी जो निसर्गाचा नियम आहे त्या नियमानुसारच तो आला आहे, म्हणून त्याच्यासाठी भाव बिघडवू नका. त्या नियमात राहून मग भले तुमच्याकडे जे काही असेल, खिचडी-कढी, जे काही असेल ते वाढा. पाहुणे असे म्हणत नाहीत की आम्हाला तुम्ही बासुंदी खायला द्या. खिचडी-कढी, भाजी, जे काही असेल ते वाढा. पण मग हा तर स्वतःची इज्जत जाऊ नये म्हणून खिचडी-कढी वाढत नाही तर शिरा वगैरे वाढतो. पण मनात मात्र शिव्या देतो. 'हे मेले आता कुठून आले!' तेच त्याचे (चार्ज) कर्म आहे. तेव्हा असे व्हायला नको.

## म्हणून भाव कधी बिघडवू नका

**प्रश्नकर्ता :** पुण्यकर्मे आणि पापकर्मे कशी बांधली जातात?

**दादाश्री :** दुसऱ्यांना सुख देण्याचा भाव केल्यामुळे पुण्य बांधले जाते आणि दु:ख देण्याचा भाव केल्यामुळे पाप बांधले जाते. भाव केल्यामुळेच कर्म बांधले जाते, क्रिया केल्याने नाही. क्रियेत तसे असेल किंवा नसेलही, पण आत जसे भाव असतील तसे कर्म बांधले जाते. म्हणूनच भाव बिघडवू नका.

कोणतेही कार्य स्वार्थ भावाने केले तर पापकर्म बांधले जाते आणि नि:स्वार्थ भावाने केल्याने पुण्यकर्म बांधले जाते. पण दोन्हीही कर्मेच आहेत ना! पुण्य कर्माचे जे फळ आहे ते म्हणजे सोन्याची बेडी आणि पाप कर्माचे फळ म्हणजे लोखंडाची बेडी. पण दोन्हीही बेड्याच आहेत ना?

## स्थूलकर्म : सूक्ष्मकर्म

एका शेठने पन्नास हजार रूपयांचे दान दिले. तेव्हा त्याच्या मित्राने शेठजींना विचारले, 'एवढे सारे पैसे देऊन टाकलेत?' तेव्हा शेठ म्हणाले, 'मी तर एक पैसाही देईन असा नाही. हे तर त्या मेयरच्या दडपणामुळे द्यावे लागले.' तर याचे फळ 'तिथे' काय मिळेल? पन्नास हजारांचे दान दिले ते स्थूलकर्म. त्याचे फळ त्याला इथल्या इथे मिळून जाते. ते म्हणजे लोक त्या शेठची 'वाह वाह' करतात, स्तुती करतात. आणि शेठने आत, सूक्ष्मकर्मात काय चार्ज केले? तर, 'एक पैसाही देईन असा मी नाही.' त्याचे फळ त्याला पुढील जन्मात मिळेल. पुढील जन्मात शेठ एका पैशाचेही दान देऊ शकणार नाही. आता इतकी सूक्ष्म गोष्ट कोणाला समजेल?

त्याच वेळी तिथे दुसरा कोणी गरीब माणूस राहत असेल, त्याच्याकडेही हेच लोक दान मागण्यासाठी गेले, तेव्हा तो गरीब माणूस काय म्हणाला की, 'आत्ता तर माझ्याजवळ पाचच रुपये आहेत ते

सगळेच तुम्ही घ्या, परंतु जर माझ्याजवळ पाच लाख रुपये असते तर ते सर्वच दिले असते.' असे तो मनापासून सांगतो. आता या गरीबाने जे पाचच रुपये दिले ते डिस्चार्जमध्ये कर्मफळ आले होते पण आत सूक्ष्मात काय चार्ज केले? पाच लाख रुपये देण्याचा भाव केला, म्हणून पुढील जन्मात जेव्हा ते कर्म डिस्चार्ज होईल तेव्हा तो पाच लाख देऊ शकेल.

एक माणूस नेहमी दान देत असेल, दिवसभर धर्म-भक्ती वगैरे करत असेल, मंदिरात पैसे देत असेल, धर्मकार्य करत असेल, त्याला जगातील लोक म्हणतील की, हा फार धार्मिक आहे. पण त्या माणसाच्या मनात काय विचार येत असतात की, कशाप्रकारे (पैसा) जमा करू व कशाप्रकारे उपभोग घेऊ! त्याच्या मनात मात्र बिनहक्काची लक्ष्मी हिसकावून घेण्याची खूप इच्छा होत असते. बिनहक्काचे विषय विकार भोगण्यासाठी सुद्धा तो तयार असतो!

म्हणून भगवंत त्याचा एकही पैसा जमा करीत नाहीत. त्याचे काय कारण? कारण हेच की, दान-धर्म-क्रिया ही सर्व स्थूलकर्मे आहेत. त्या स्थूलकर्मांचे फळ इथल्या इथेच मिळत असते. लोक तर या स्थूलकर्मांनाच पुढील जन्माचे कर्म मानतात. पण त्याचे फळ तर इथल्या इथेच मिळून जाते. आणि सूक्ष्मकर्म ते की जे आत बांधले जात आहे, त्याची तर लोकांना जाणीवच नसते. त्याचे फळ पुढील जन्मात मिळते.

आज एखाद्या माणसाने चोरी केली, चोरी केली हे स्थूलकर्म आहे. त्याचे फळ त्याला या जन्मातच मिळते. जसे की, त्याला अपयश मिळते, पोलीसवाला मारतो वगैरे, ते सर्व फळ त्याला इथल्या इथेच मिळते.

म्हणजे आज जी स्थूलकर्मे दिसतात, स्थूल आचार दिसतात ती 'तिथे' उपयोगी पडणार नाहीत 'तिथे' तर सूक्ष्मभाव काय आहे, सूक्ष्मकर्मे काय आहेत, बस एवढेच 'तिथे' उपयोगी पडते. मात्र आज हे संपूर्ण जग स्थूलकर्मावरच एडजस्ट झालेले आहे.

हे सर्व साधू-संन्यासी त्याग करतात, तप करतात, जप करतात, पण ही सर्व तर स्थूलकर्मे आहेत. त्यात सूक्ष्मकर्म कुठे आहे? जे दिसत

आहे त्यात पुढील जन्माची सूक्ष्मकर्मे नाहीत. आणि ते जे करत आहेत त्या स्थूल कर्मांचे यश त्यांना इथेच मिळून जाते.

## क्रियेने नाही, तर ध्यानानेच चार्जिंग

आचार्य महाराज प्रतिक्रमण करतात, सामायिक करतात, व्याख्यान देतात, प्रवचन करतात, पण ते तर त्यांचे आचरण आहे, स्थूलकर्म आहे. पण आत काय आहे ते पाहायचे. आत जे चार्ज होते, ते 'तिथे' कामी लागेल. आता ज्या आचरणाचे ते पालन करतात, ते डिस्चार्ज आहे. संपूर्ण बाह्याचार डिस्चार्ज स्वरूपच आहे. तिथे हे लोक म्हणतात की 'मी सामायिक केले, ध्यान केले, दान केले.' तर त्याचे यश तुला इथेच मिळेल. त्यात पुढील जन्माचे काय देणेघेणे? भगवंत असे कच्चे नाहीत की तुझा असा घोटाळा चालवून घेतील. बाहेर सामायिक करत असेल आणि आत तर कोण जाणे काय करत असेल.

एक शेठ सामायिक करण्यासाठी बसले होते. तेव्हा बाहेर कुणी दरवाजा ठोठावला. शेठाणीने जाऊन दरवाजा उघडला. तर एक माणूस आला होता, त्याने शेठाणीला विचारले, 'शेठ कुठे गेले आहेत?' तेव्हा शेठाणीने उत्तर दिले 'उकिरड्यावर.' आत बसलेल्या शेठने ते ऐकले व त्यांनी स्वतःच्या आत तपास केला तर खरोखर मनाने शेठजी उकिरड्यावरच गेलेले होते! त्यांच्या मनात तर वाईट विचारच चालले होते, ते सूक्ष्मकर्म आणि बाहेर सामायिक करत होते ते स्थूलकर्म. भगवंत असे घोटाळे चालवून घेत नाहीत. आत सामायिक असेल आणि बाहेर सामायिक नसेलही तरी ते 'तिथे' चालेल. पण हे बाहेरचे देखावे मात्र 'तिथे' चालणार नाहीत.

## आतील भाव बदला या प्रकारे

स्थूलकर्म म्हणजे जर तुला एकदम राग आला, तेव्हा तुला रागवायचे नसते तरीसुद्धा राग येतो. असे कधी घडते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, असे घडते.

**दादाश्री :** जो राग आला, त्याचे फळ इथल्या इथे ताबडतोब मिळते. लोक म्हणतात, 'जाऊ द्या ना त्याला, तो फार रागीटच आहे.' अरे, कोणी तर त्याला थोबाडीत मारतो सुद्धा. म्हणजे अपयश किंवा अशा दुसऱ्या कुठल्याप्रकारे त्याला इथल्या इथेच फळ मिळते. राग येणे हे स्थूल कर्म आहे, आणि राग आला त्यात आजचा तुझा भाव काय आहे की रागवलेच पाहिजे तर तो पुढच्या जन्माचा पुन्हा रागवायचा हिशोब आहे आणि जर तुझा आजचा भाव असा आहे की रागवायला नको. तुझ्या मनात निश्चित असेल की रागवायला नकोच, तरी पण रागवले जात असेल तर तुला पुढील जन्मासाठी बंधन राहिले नाही.

या स्थूल कर्मात तुला राग आला, तर त्याचा तुला या जन्मात मार खावा लागेल. पण तरी तुला बंधन होणार नाही. कारण सूक्ष्म कर्मात तुझा निश्चय आहे की रागवायला नकोच. आणि जर एखादा माणूस कोणावरही रागवत नसेल, परंतु मनात असे बोलत असेल की, 'ह्या लोकांवर रागावले तरच सरळ होतील, अशी ही माणसे आहेत.' त्यामुळे तो पुढच्या जन्मी पुन्हा रागीट बनतो! अर्थात बाहेर राग येतो ते स्थूल कर्म आहे आणि त्यावेळी आत जे भाव होतात ते सूक्ष्म कर्म आहे. हे जर समजले तर स्थूल कर्माने काहीही बंधन होणार नाही! म्हणून हे सायन्स मी नव्या पद्धतीने समोर ठेवले आहे. आतापर्यंत स्थूल कर्माने बंधन आहे अशी मान्यता जगातील लोकांच्या डोक्यात ठासून बसवली गेली आहे आणि म्हणून तर लोक सतत घाबरत राहतात.

## या ज्ञानाने घर-संसारासकट मोक्ष

जर घरात बायको असेल, लग्न केलेले असेल आणि मोक्षाला जायचे असेल, तर मनात वाटत राहते की मी तर लग्न केले आहे, तर आता मी मोक्षाला कसा जाऊ शकेन? अरे बाबा, बायको नडत नाही, तुझी सूक्ष्मकर्मे नडतात. ही तुझी स्थूलकर्मे जरा सुद्धा बाधक नाहीत. हे मी उघड करून दिले आहे आणि हे विज्ञान उघड केले नसते, तर आत नुसती भीती, भीती आणि भीतीच वाटत राहिली असती. आत सतत *अजंपा* (बेचैनी, अशांती) वाटत राहते. ते साधू म्हणतात की

'आम्ही मोक्षाला जाऊ.' अहो, तुम्ही मोक्षाला कसे जाणार? काय सोडायचे असते ते तर तुम्हाला माहितच नाही. तुम्ही तर स्थूल सोडले. डोळ्यांनी दिसते, कानांनी ऐकू येते ते सोडले आहे. त्याचे फळ तर या जन्मातच मिळेल. हे विज्ञान नवीनच प्रकारचे आहे, हे तर अक्रम विज्ञान आहे. ज्यामुळे या लोकांना सर्व प्रकारची फॅसिलिटी (सुविधा) मिळाली आहे. बायकोला सोडून पळून जाता येते का? अरे, बायकोला सोडून पळून जायचे आणि आपला मोक्ष होणार, हे शक्य आहे का? कोणाला दु:ख देऊन आपला मोक्ष होणार, हे कसे शक्य आहे?

म्हणून बायको-मुलांप्रती असलेली सर्वच कर्तव्ये पूर्ण करा आणि पत्नी जे जेवण वाढेल, ते निवांतपणे जेवा. हे सर्व स्थूल आहे, हे समजून घ्या. स्थूलच्या मागे तुमचा असा अभिप्राय नसावा की ज्यामुळे सूक्ष्मामध्ये चार्ज होईल. त्यासाठी मी तुम्हाला आज्ञारूपी पाच वाक्ये दिली आहेत. आतमध्ये असा अभिप्राय रहायला नको की हे करेक्ट आहे. मी जे करतो, जे उपभोगतो, ते करेक्ट आहे. असा आत अभिप्राय असायला नको. बस एवढाच तुमचा अभिप्राय बदलला की सर्वच बदलेल.

## अशाप्रकारे वळवा मुलांना

मुलांमध्ये वाईट गुण असतील तर आई-वडील त्यांना रागावतात, आणि सर्वांना सांगत फिरतात की 'माझा मुलगा तर असा आहे, नालायक आहे, चोर आहे.' अहो, तो असे करतो, हे सर्व विसरा आणि आता तुम्ही त्याचे भाव बदला ना! त्याचे आतील अभिप्राय बदला ना! मुलाचे भाव कसे बदलायचे हे आई-वडिलांना समजतच नाही. कारण ते सर्टिफाइड आई-वडील नाहीत आणि आई-वडील होऊन बसले आहेत! मुलाला चोरी करण्याची वाईट सवय लागली असेल तर आई-वडील त्याला सारखे रागावत राहतात. मारत राहतात. अशा प्रकारे आई-वडील नेहमी एक्सेस (गरजेपेक्षा जास्त) बोलतात. एक्सेस बोललेले हेल्प करत नाही. मग मुलगा काय करतो? तो मनात ठरवतो की 'त्यांना वाटेल ते बोलू दे', पण मी तर असेच करणार. म्हणजे आई-वडील त्या मुलाला आणखीन जास्त चोर बनवतात. द्वापार, त्रेता आणि सत्युगात

जी हत्यारे होती, त्याचा वापर आजच्या कलियुगातील लोक करू लागले. आजच्या काळात मुलाला वळवायची पद्धत वेगळी आहे. त्यासाठी त्याचे भाव बदलायचे आहेत. त्याच्यावर प्रेमाने हळुवार हात फिरवून त्याला सांगावे की, 'बेटा, भले तुझी आई ओरडली, ती ओरडेल, पण तू ज्याप्रकारे कोणाची चोरी केलीस तशी जर कुणी तुझ्या खिशातून चोरी केली तर तुला सुख वाटेल का?' त्यावेळी तुला कसे दुःख होईल? तसेच त्या समोरच्या व्यक्तीलाही दुःखच होत नसेल ना? याप्रमाणे संपूर्ण थियरी मुलाला समजवावी लागते. एकदा त्याच्या मनात पक्के ठसायला हवे की हे चुकीचे आहे. तुम्ही त्याला मारत राहता, त्यामुळे तर मुलगा उलट हट्टी बनतो. फक्त पद्धतच बदलायची आहे. संपूर्ण जगाला फक्त स्थूलकर्मच समजले आहे. सूक्ष्मकर्म समजलेच नाही. सूक्ष्म समजले असते तर ही दैना झाली नसती.

## चार्ज आणि डिस्चार्ज कर्म

**प्रश्नकर्ता :** स्थूलकर्मांचे आणि सूक्ष्मकर्मांचे कर्ता वेगवेगळे आहेत का?

**दादाश्री :** दोन्हीचे कर्ता वेगळे आहेत. ही जी स्थूलकर्मे आहेत, ती डिस्चार्ज कर्मे आहेत. या बॅटऱ्या असतात, त्यांना चार्ज केल्यानंतर त्या डिस्चार्ज होत राहतात ना? आपल्याला डिस्चार्ज करायचे नसेल तरीही डिस्चार्ज होतच राहतात ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** त्याचप्रमाणे ही जी स्थूलकर्मे आहेत ती डिस्चार्ज कर्मे आहेत आणि आत जी नवीन चार्ज होत आहेत ती सूक्ष्मकर्मे आहेत. ह्या जन्मात जी चार्ज होत आहेत ती पुढच्या जन्मी डिस्चार्ज होत राहतील आणि ह्या जन्मात मागच्या जन्माच्या बॅटऱ्या डिस्चार्ज होत राहतात, एक मनाची बॅटरी, एक वाणीची बॅटरी आणि एक देहाची बॅटरी. या तिन्ही बॅटऱ्या आता डिस्चार्ज होत आहेत आणि आत नवीन तीन बॅटऱ्या भरल्या जात आहेत. हे बोलतो आहे, ते तुला असे वाटत

असेल की, 'मी' च बोलत आहे. पण नाही, ही तर रेकॉर्ड बोलत आहे. ही तर वाणीची बॅटरी डिस्चार्ज होत आहे. मी बोलतच नाही आणि जगातील लोक काय म्हणतात की, 'मी कसे सांगितले, मी कसे बोललो!' हे सगळे कल्पित भाव आहेत, इगोइजम (अहंकार) आहे, फक्त हा इगोइजम गेला की मग काय उरले? हा इगोइजम, हीच अज्ञानता आहे आणि हीच भगवंताची माया आहे. कारण करतो कोणी दुसरा आणि स्वत:ला असे ॲडजस्टमेंट होते (वाटते) की 'मीच करत आहे.'

ही सूक्ष्मकर्मे जी आत चार्ज होतात, ती नंतर कॉम्प्युटरमध्ये जातात. एक व्यष्टी कॉम्प्युटर आहे आणि दुसरा समष्टी कॉम्प्युटर आहे. सूक्ष्मकर्मे प्रथम व्यष्टी कॉम्प्युटरमध्ये जातात आणि तिथून मग समष्टी कॉम्प्युटरमध्ये जातात. नंतर समष्टी काम करत राहते. रियली स्पीकिंग, म्हणजे खरोखर 'मी चंदुभाऊ आहे' असे बोलण्यानेच कर्मे बांधली जातात. 'मी कोण आहे', इतके जरी समजले तरी तेव्हापासूनच सर्व कर्मांतून सुटतो. अर्थात हे सरळ आणि सोपे विज्ञान ठेवले आहे, नाहीतर करोडो उपायांनी सुद्धा ॲब्सोल्यूट होता येणार नाही. आणि हा तर पूर्णपणे ॲब्सोल्यूट थियरम आहे.

## कर्म-कर्मफळ-कर्मफळ परिणाम

**प्रश्नकर्ता :** मागच्या जन्मी चार्ज झालेली जी कर्मे आहेत, ती या जन्मी डिस्चार्ज रूपाने येतात. तर या जन्माची जी कर्मे आहेत, ती याच जन्मी डिस्चार्ज रूपाने येतात की नाही?

**दादाश्री :** नाही.

**प्रश्नकर्ता :** तर केव्हा येतात?

**दादाश्री :** मागच्या जन्मातील जे कॉजेस आहेत ना, तो या जन्माचा इफेक्ट आहे. या जन्माचे कॉजेस पुढील जन्माचा इफेक्ट आहेत.

**प्रश्नकर्ता :** परंतु कित्येक कर्मे अशीही असतात ना की, जी इथल्याइथेच भोगावी लागतात. एकदा आपण असे सांगितले होते.

**दादाश्री :** हे तर जगातील लोकांना असे वाटते. जगातील लोकांना काय वाटते? 'हं... बघ, हॉटेलात खूप खात होता, त्यामुळे पोटात मुरड पडली.' हॉटेलात खात होता, म्हणजे कर्म बांधले, त्यामुळे पोटात मुरड पडली असे म्हणतात. तेव्हा 'ज्ञानी' काय सांगतात की तो हॉटेलात का खात होता? त्याला हॉटेलात खायचे कोणी शिकवले? हे कसे घडले? तर संयोग उभे झाले. पूर्वी जी योजना केली होती त्या योजनेचा आता परिणाम आला, म्हणून तो हॉटेलात गेला. हॉटेलात जाण्याचे सर्व संयोग एकत्र आल्यामुळे आता सुटायचे असेल तरी सुटू शकत नाही. त्याला वाटते अरे! हे असे का होत असेल?

तेव्हा येथील भ्रांतीवाल्यांना असे वाटते की, हे काम केले म्हणून असे झाले. भ्रांतीवाले लोक असेच समजतात की इथेच कर्म बांधतो आणि इथेच भोगतो. असे समजतात पण ते ह्याचा शोध घेत नाहीत की, त्याला तर हॉटेलात जायचे नाही तरी तो कसे जातो? त्याला जायचे नाही तरी पण कोणत्या नियमानुसार तो जातो, तो सर्व हिशोब आहे.

तेव्हा आम्ही अजून अधिक शिकवतो की विनाकारण ह्या मुलांना मारू नका, ती मुले पुन्हा तसे भाव करणार नाहीत असे तुम्ही करा. पुन्हा योजना अशी आखणार नाहीत असे काही करा. चोरी करणे वाईट आहे... हॉटेलात खाणे हे वाईट आहे, असे ज्ञान त्याला उत्पन्न होईल असे सर्व करा. जेणेकरून पुढच्या जन्मात पुन्हा असे होणार नाही. परंतु हे तर मुलांना मारतच राहतात आणि मुलांना सांगतात, 'बघ हं! तुला जायचे नाही', तेव्हा त्याचे मन विरोध करते की, 'त्यांना बोलू दे, पण मी तर जाणारच, बस.' उलट तो हट्टाला पेटतो आणि त्यामुळेच तर ही चुकीची कर्मे बांधली जातात ना! आई-वडीलच त्याला चुकीचे करायला भाग पाडतात.

**प्रश्नकर्ता :** पूर्वी भाव केले होते म्हणून तो हॉटेलात गेला, आता हॉटेलात गेला, मग तिथे खाल्ले आणि नंतर पोटात मुरड पडली, तर हे सर्व डिस्चार्ज आहे का?

**दादाश्री :** तो हॉटेलात गेला हे डिस्चार्ज आहे आणि पोटात मुरड पडली तेही डिस्चार्ज आहे. डिस्चार्ज स्वत:च्या ताब्यात राहत नाही, कंट्रोल राहत नाही. आऊट ऑफ कंट्रोल होते.

कर्माची थियरी एक्झॅक्ट कशाला म्हणतात हे जर नीट समजले, तर तो माणूस पुरूषार्थ धर्माला समजू शकेल. जगातील लोक ज्याला कर्म म्हणतात त्याला कर्माची थियरी कर्मफळ म्हणते. हॉटेलात खाण्याचा भाव होतो. मागील जन्मी बांधलेल्या कर्माच्या आधारावर तो खातो. तिथे त्याला कर्म म्हटले जाते. आणि त्या कर्माच्या आधारे या जन्मी वारंवार हॉटेलात खात राहतो. त्याला कर्मफळ आले असे म्हणतात, आणि ही पोटात मुरड पडली, त्याला जगातील लोक कर्मफळ आले असे मानतात. परंतु कर्माची थियरी काय म्हणते की ही जी पोटात मुरड पडली, तो कर्मफळाचा परिणाम आला.

वेदांताच्या भाषेत हॉटेलमध्ये खाण्यासाठी आकर्षित होतो ते पूर्वी बांधलेल्या संचित कर्माच्या आधारे आहे. आज हॉटेलात जाण्याची अजिबात इच्छा नाही तरीही हॉटेलात जाऊन खाऊन येतो ते प्रारब्ध कर्म, आणि त्याचा परत या जन्मातच परिणाम येतो आणि पोटात मुरड पडते हे क्रियमाण कर्म.

हॉटेलात खाताना मजा येते त्यावेळीही बीज टाकतो आणि पोटात मुरड पडते तेव्हा ते भोगताना सुद्धा परत बीज टाकतो. म्हणजे तो कर्मफळाच्या वेळी आणि कर्मफळ परिणामाच्या वेळी, दोन्ही वेळी बीज टाकतो.

## संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म

**प्रश्नकर्ता :** हे सर्व मागील जन्माच्या संचित कर्मावर आधारित आहे का?

**दादाश्री :** असे आहे की, संचित कर्म आणि असे इतर सर्व शब्द समजून घेण्याची आवश्यकता आहे. संचितकर्मे, हे कॉजेस आहेत

आणि प्रारब्धकर्मे हे त्या संचित कर्मांचा इफेक्ट आहे आणि इफेक्टचे फळ लगेचच मिळते, ते क्रियमाण कर्म. संचित कर्मांचे फळ पन्नास-साठ-शंभर वर्षानंतर जेव्हा त्याचा काळ परिपक्व होतो तेव्हा मिळते.

हे संचित कर्माचे फळ आहे. संचित कर्म फळ देते त्यावेळी त्याला संचित म्हटले जात नाही. फळ देतेवेळी त्याला प्रारब्ध कर्म म्हटले जाते. तीच संचित कर्मे जेव्हा फळ देण्यास तयार होतात, तेव्हा त्यांना प्रारब्ध कर्मे म्हटले जाते. संचित म्हणजे पेटीत ठेवलेली थप्पी. ती थप्पी जर बाहेर काढली, तर तो प्रारब्ध आहे. प्रारब्धाचा अर्थ काय की जे फळ देण्यास सन्मुख झाले आहे, ते प्रारब्ध. आणि जी फळ देण्यास सन्मुख झाली नाहीत, अजून बऱ्याच काळानंतर फळ देतील, तोपर्यंत ती सर्व संचित आहेत. सर्व संचित कर्मे पडून राहिलेली असतात. हळूहळू कालांतराने जशीजशी ती परिपक्व होत जातात, तशीतशी ती फळ देतात.

आणि क्रियमाण तर डोळ्यांनी दिसतात, पाच इंद्रियांनी अनुभवता येतात ती सर्व क्रियमाण कर्मे. म्हणजे या तीन प्रकारे कर्मे ओळखली जातात. लोक म्हणतात बघा ना, याने दोन थोबाडीत मारल्या. थोबाडीत मारणाऱ्याला पाहतात, थोबाडीत खाणाऱ्याला पाहतात, ते क्रियमाण कर्म आहे. आता क्रियमाण कर्म म्हणजे काय? तर जे फळ देण्यासाठी सन्मुख झाले, म्हणजे हे फळ आहे. त्या व्यक्तीला असे फळ मिळाले की दोन थोबाडीत मारल्या गेल्या आणि मार खाणाऱ्याला असे फळ मिळाले की त्याने दोन थोबाडीत खाल्ल्या. आता या क्रियमाणाचेही परत फळ येते. दोन थोबाडीत मारल्या म्हणून तो मनात खूणगाठ बांधतो की जेव्हा माझ्या तावडीत सापडेल तेव्हा मी बघून घेईन. आणि नंतर तो त्याचा बदला घेतो. म्हणजे परत अशी नवीन बीजे पडतच जातात. आत नवीन बीजे टाकतच जातो. बाकी, संचित तर फक्त असेच पडून राहिलेला, स्टॉकमध्ये ठेवलेला माल आहे. पुरूषार्थ ही गोष्ट वेगळी आहे. क्रियमाण तर प्रारब्धाचा रिजल्ट आहे, प्रारब्धाचे फळ आहे.

**प्रश्नकर्ता :** या पुरुषार्थाला तुम्ही कर्मयोग म्हणता का?

**दादाश्री :** कर्मयोग समजून घेतला पाहिजे. जो कर्मयोग भगवंतांनी लिहिलेला आहे आणि लोक ज्याला कर्मयोग म्हणतात, या दोन्हींमध्ये आकाश-पाताळ एवढा फरक आहे.

पुरूषार्थ म्हणजे कर्मयोग आहे, पण कसा कर्मयोग? ऑन पेपर. योजना करणे, त्याला कर्मयोग म्हटले जाते. हा जो कर्मयोग झाला, त्याचा मग हिशोब बांधला गेला, त्याच्या फळाला संचित म्हटले जाते आणि जे संचित आहे तेसुद्धा योजनेतच आहे पण जेव्हा फळ देण्यास सन्मुख होते तेव्हा प्रारब्ध म्हटले जाते. आणि जेव्हा प्रारब्ध फळ देते तेव्हा क्रियमाण म्हटले जाते. जेव्हा पुण्य असते तेव्हा क्रियमाण चांगली होतात, आणि जेव्हा पाप असते तेव्हा क्रियमाण वाईट होतात.

## अजाणतेपणी केलेल्या कर्माचे फळ मिळते का?

**प्रश्नकर्ता :** जाणूनबुजून केलेल्या गुन्ह्यांचा दोष किती लागतो? आणि अजाणतेपणी केलेल्या चुकांचा दोष किती लागतो? अजाणतेपणी केलेल्या चुकांची तर माफी मिळते ना?

**दादाश्री :** असा कोणी वेडा नाही की जो असे माफ करून टाकील. अजाणतेपणी तुमच्याकडून एखादी व्यक्ती मारली गेली तर कोणी असा वेडा नाही की तुम्हाला माफ करेल. अजाणतेपणी विस्तवावर हात पडला तर काय होईल?

**प्रश्नकर्ता :** हात भाजेल.

**दादाश्री :** ताबडतोब फळ. अजाणतेपणी करा किंवा जाणूनबुजून करा.

**प्रश्नकर्ता :** अजाणतेपणी केलेल्या दोषांना अशा तऱ्हेने भोगावे लागते, तर जाणूनबुजून केल्यानंतर किती भोगावे लागेल?

**दादाश्री :** हो, तर आता तेच मी तुम्हाला समजावतो की अजाणतेपणी केलेली कर्मे कशाप्रकारे भोगावी लागतात? एका माणसाने

खूप पुण्यकर्म केले असेल. राजा बनण्याचे पुण्य कर्म केले असेल पण ते अजाणतेपणी केले होते, समजपूर्वक केलेले नव्हते. लोकांचे पाहून-पाहून त्याने पण असे कर्म केले. म्हणून तो समजल्याशिवाय राजा बनेल असे कर्म बांधतो. आता तो पाच वर्षाच्या वयात राजगादीवर बसतो, त्याचे वडील वारले म्हणून. आणि वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत, म्हणजे सहा वर्षांपर्यंत त्याला राज्य करायचे होते, म्हणून वयाच्या ११ व्या वर्षी तो गादीवरून उतरतो. आणि दुसरा एखादा माणूस जो वयाच्या २८ व्या वर्षी राजा बनतो आणि वयाच्या ३४ व्या वर्षी त्याचे राज्य सुटते. तर त्यांच्यापैकी कुणी अधिक सुख उपभोगले? दोघांनीही सहा वर्ष राज्य केले.

**प्रश्नकर्ता :** जो वयाच्या २८ व्या वर्षी आला आणि ३४व्या वर्षी उतरला, त्याने.

**दादाश्री :** त्याने जाणतेपणी पुण्य बांधले होते, म्हणून जाणतेपणी भोगले. आणि त्या मुलाने अजाणतेपणी पुण्य बांधले होते म्हणून अजाणतेपणी भोगले. अर्थात अजाणतेपणी पाप बांधले गेले तर ते अजाणतेपणी भोगले जाते आणि अजाणतेपणी पुण्य केले तर अजाणतेपणी भोगले जाते. त्यात मजा येत नाही. हे समजले का तुम्हाला?

अजाणतेपणी केलेल्या पापांबद्दल मी तुम्हाला समजावतो. या बाजूने दोन झुरळे जात होती. मोठी-मोठी झुरळे आणि या बाजूने दोन मित्र जात होते. तेव्हा त्यातील एका मित्राचा पाय त्या झुरळावर पडला आणि ते झुरळ चिरडले गेले आणि दुसऱ्या मित्राने झुरळाला पाहताच त्याला ठेचून-ठेचून मारले. दोघांनी कोणते काम केले?

**प्रश्नकर्ता :** झुरळांना मारले.

**दादाश्री :** निसर्गाच्या नियमाप्रमाणे दोघे खुनी मानले जातात. त्या झुरळांच्या कुटुंबियांनी तक्रार केली की आमच्या दोघींच्या पतींना ह्या मुलांनी मारून टाकले. दोघांचा गुन्हा सारखाच आहे. दोघेही गुन्हेगार, खुनी म्हणूनच पकडले गेले. खून करण्याची पद्धत वेगवेगळी आहे.

पण आता फळ देतेवेळी दोघांना याचे काय फळ मिळते? तर त्या दोघांना सजा झाली दोन थप्पड आणि चार शिव्या, अशी सजा झाली. आता ज्याच्याकडून हे सर्व अजाणतेपणी घडले होते तो माणूस पुढील जन्मात मजूर बनला होता आणि त्याला कोणीतरी दोन थोबाडीत मारल्या व चार शिव्या दिल्या. तर त्याने थोडे पुढे जाऊन ते झटकून टाकले आणि तो दुसरा माणूस पुढील जन्मात गावाचा सरपंच बनला होता, खूप मोठा, अत्यंत चांगला माणूस. त्यालाही कोणीतरी दोन थोबाडीत मारल्या व चार शिव्या दिल्या, ज्यामुळे तो कितीतरी दिवसांपर्यंत झोपू शकला नाही. किती दिवस भोगले! कारण ह्याने तर जाणूनबुजून मारले होते, आणि त्या मजुराने अजाणतेपणी मारले होते. म्हणूनच तुम्ही जे पण कराल ते नीट समजून करा. तुम्ही जे करता त्याची जबाबदारी तुमची स्वतःचीच आहे. यू आर होल ॲन्ड सोल रिस्पॉन्सिबल. गॉड इज नॉट रिस्पॉन्सिबल ॲट ऑल. (तुम्हीच संपूर्णपणे जबाबदार आहात, भगवंत यत्किंचितही जबाबदार नाही.)

## प्रारब्ध भोगल्यानंतरच सुटका

**प्रश्नकर्ता :** मुख्य म्हणजे आपलीच कर्मे नडतात ना?

**दादाश्री :** मग दुसरे कोण? दुसरा कोणी करणारा नाही. बाहेरचे कोणी करत नाही. तुमचीच कर्मे तुम्हाला त्रास देतात. शहाणी बायको करून आणली आणि नंतर ती वेडी झाली. तर काय कोणी दुसऱ्यांनी वेडी केली? पतीच्याच कर्माच्या उदयाने ती वेडी होते. म्हणून आपण मनात असे समजून जायचे की माझेच भोग आहेत, माझेच हिशोब आहेत आणि मला सर्वांचा हिशोब चुकता करायचा आहे. फसलो रे बाबा फसलो!

स्वतः भोगल्याशिवाय सुटका नाही. प्रारब्ध तर आम्हाला सुद्धा भोगावे लागतेच, सर्वांनाच, महावीर भगवंतसुद्धा भोगत होते. महावीर भगवंतांना तर देवलोक त्रास द्यायचे. तेही भोगत होते. देवलोक मोठेमोठे ढेकूण टाकत होते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे त्यांना प्रारब्ध भोगावे लागले ना?

**दादाश्री :** गत्यंतरच नाही ना! ते स्वत: समजायचे की जरी हे देवलोक करत असले तरीही प्रारब्ध तर माझेच आहे.

## कोणत्या कर्माने देहाला दु:ख?

**प्रश्नकर्ता :** कोणत्या कर्माच्या आधारावर शरीराचे रोग होतात?

**दादाश्री :** लुळा-पांगळा होतो ना! हो, तर हे सर्व काय आहे? हे कशाचे फळ आहे? आपण जर कानाचा दुरुपयोग केला तर कानाचे नुकसान होते. डोळ्यांचा दुरुपयोग केला तर डोळे जातात. नाकाचा दुरुपयोग केला तर नाक जाते. जिभेचा दुरुपयोग केला तर जीभ खराब होते. मेंदूचा दुरुपयोग केला तर मेंदू खराब होतो. पायाचा दुरुपयोग केला तर पाय तुटतो, हाताचा दुरुपयोग केला तर हात तुटतो. अर्थात ज्याचा दुरुपयोग केला जातो त्याचे फळ येथे भोगावे लागते.

## निर्दोष मुलांनी का भोगायचे?

**प्रश्नकर्ता :** कित्येकदा असे पाहण्यात येते की, लहान मुले जन्मत: अपंग असतात. पांगळे असतात. कितीतरी लहान मुले कुतुबमिनार आणि हिमालय दर्शनाच्या दुर्घटनेत मरतात. तर या छोट्या-छोट्या मुलांनी असे काय पाप केले असेल, की त्यांच्यासोबत असे घडले?

**दादाश्री :** पाप केलेच होते, त्याचा हिशोब चुकता झाला. म्हणून दीड वर्षाचा झाल्याबरोबर आई-वडिलांसोबतचा सर्व हिशोब पूर्ण झाला, म्हणून निघून गेला. हिशोब चुकता केलाच पाहिजे. हिशोब चुकते करण्यासाठीच तर येतात.

**प्रश्नकर्ता :** आई-वडिलांनी केलेल्या दुष्कृत्याचे फळ देण्यासाठी ते मूल आले होते का?

**दादाश्री :** आई-वडिलांसोबत जो हिशोब नियोजित आहे, जेवढे दु:ख द्यायचे असेल तेवढे दु:ख देऊन जातो आणि सुख द्यायचे असेल

तर सुख देऊन जातो. जर एक-दोन वर्षाचा होऊन मृत्यू पावला, तर तो थोडेसेच दु:ख देऊन जातो. आणि बावीस वर्षाचा लग्न करून मृत्यू पावला तर जास्त दु:ख देतो. असे घडते की नाही?

**प्रश्नकर्ता :** असे तर घडते, बरोबर आहे.

**दादाश्री :** म्हणजे हे दु:ख देण्यासाठी असते आणि कित्येक असे असतात की मोठे झाल्यावर सुख देतात. शेवटपर्यंत, संपूर्ण आयुष्य सुख देतात. सुख आणि दु:ख देण्यासाठीच सर्वांचे एकमेकांशी संबंध जोडले गेले आहेत. हे रिलेटिव्ह संबंध आहेत.

## आजच्या कुकर्मांचे फळ या जन्मातच?

**प्रश्नकर्ता :** हे जे कर्माचे फळ येते, उदाहरणार्थ आपण एखाद्याच्या विवाहात विघ्न आणले. तर मग पुन्हा असेच फळ आपल्याला पुढील जन्मी मिळते का? तीच व्यक्ती आपल्या विवाहात विघ्न निर्माण करते? कर्माचे फळ असे असते का? त्याच प्रकारे आणि तेवढ्याच डिग्रीचे?

**दादाश्री :** नाही, याच जन्मात मिळते. विवाहात विघ्न आणता, हे तर प्रत्यक्षासारखेच म्हटले जाईल आणि प्रत्यक्षाचे फळ इथेच मिळते.

**प्रश्नकर्ता :** आपण एखाद्याच्या विवाहात विघ्न आणले, पण त्या अगोदरच आपला विवाह झालेला असेल तर त्याचे फळ आपल्याला कसे काय मिळेल?

**दादाश्री :** नाही, त्याच प्रकारचे फळ मिळेल, असे नाही. तुम्ही त्याचे मन दुखावले, तसेच तुमचे मन दुखावण्याचा मार्ग मिळेल. कोणाला मुलीच नसतील तर त्याला फळ कसे मिळेल? लोकांच्या मुलींच्या विवाहात अडचणी आणतो आणि स्वत:ला मुली नसतील तरी याच जन्मातच कर्माचे फळ मिळते. याच जन्मात फळ मिळाल्याशिवाय राहत नाही. त्याचे असे आहे की, परोक्ष कर्माचे फळ पुढील जन्मात मिळते आणि प्रत्यक्ष कर्माचे फळ याच जन्मात मिळते.

**प्रश्नकर्ता :** परोक्ष शब्दाचा अर्थ काय?

**दादाश्री :** परोक्ष म्हणजे ज्याची आपल्याला जाणीव होत नाही असे कर्म.

**प्रश्नकर्ता :** जर मी एखाद्या माणसाचे दहा लाख रुपयांचे नुकसान करण्याचा भाव केला असेल तर माझेही असेच नुकसान होईल का?

**दादाश्री :** नाही, नुकसान नाही. ते तर दुसऱ्या रूपात तुम्हाला तेवढेच दुःख होईल. जेवढे दुःख तुम्ही त्याला दिले तेवढेच दुःख तुम्हाला मिळेल. मग मुलगा पैसे खर्च करून तुम्हाला दुःखी करेल किंवा अशा कोणत्याही प्रकारे तेवढेच दुःख तुम्हालाही होईल. म्हणजे तो हिशोब नाही, बाहेरचा हिशोब नाही. येथे हे सर्व भिकारी बोलतात ना, रस्त्यात एक भिकारी बोलत होता, 'हे जे आम्ही भीक मागत आहोत, ते तर आम्ही जे तुम्हाला दिलेले तेच तुम्ही आम्हाला परत करत आहात.' अगदी उघडपणे तो बोलतो, 'तुम्ही जे देता ते आम्ही दिलेलेच देत आहात आणि नाहीतर आम्ही तुम्हाला देऊ.' असे बोलतात. दोन्हीपैकी एक तर होईल! पण नाही, असे नाही. तुम्ही कोणाला सुख दिले असेल तर तुम्हालाही सुख मिळेल आणि तुम्ही कोणाला दुखावले असेल तर तुम्हालाही दुःख मिळेल, बस. शेवटी ह्या सर्व कर्मांचा राग-द्वेषात समावेश होत असतो. राग-द्वेषाचे फळ मिळते. रागाचे फळ सुख आणि द्वेषाचे फळ दुःख मिळेल.

**प्रश्नकर्ता :** हे जे आपण सांगितले की रागाचे फळ सुख आणि द्वेषाचे फळ दुःख, तर ही परोक्ष फळाची गोष्ट आहे की प्रत्यक्ष फळाची?

**दादाश्री :** निव्वळ प्रत्यक्ष. असे आहे की, रागाने पुण्य बांधले जाते आणि पुण्याने लक्ष्मी प्राप्त झाली. लक्ष्मी तर प्राप्त झाली पण ती खर्च करताना दुःख देऊन जाते. म्हणजे हे सगळे सुख जे तुम्ही उपभोगता, ते लोन वर घेतलेले सुख आहे. तुम्ही जर परत पेमेंट करणार असाल तरच हे सुख घ्या. हो, तरच या सुखाचा स्वाद घ्या, नाहीतर स्वाद घेऊ नका. तुम्हाला जर भरपाई करण्याची, पेमेंट करण्याची शक्ती

नसेल तर तुम्ही स्वाद घेण्याचे बंद करा. खरे तर, ही सर्व लोन वर घेतलेली सुखे आहेत. कोणत्याही प्रकारचे सुख हे लोनवर घेतलेले सुख आहे.

पुण्याचे फळ सुख, पण सुख सुद्धा लोनवरचे आणि पापाचे फळ दुःख, दुःख सुद्धा लोनवरचे. म्हणजे हे सर्व लोनवरील आहे. तुम्हाला जर सौदा करायचा नसेल तर नका करू. म्हणून तर पाप आणि पुण्य 'हेय' (त्याग करण्यायोग्य) मानले आहे.

**प्रश्नकर्ता :** पूर्वी जे दिले होते ते आता परत घेतले, म्हणजे हिशोब चुकता झाला. मग त्याला लोनवर घेतलेले असे तर म्हटले जाणार नाही ना?

**दादाश्री :** आता जे सुख उपभोगत आहात, ते सर्व परत आलेले नाहीत, तरीही उपभोगत आहात, तर याचे पेमेंट करावे लागेल. पेमेंट कशाप्रकारे करावे लागेल? तुम्ही छान आंबा खाल्ला, तर त्या दिवशी तुम्ही खुश झालात आणि सुख उत्पन्न झाले. दिवस आनंदात गेला. पण दुसऱ्या वेळी आंबा खराब निघेल, तर तेव्हा तेवढेच दुःख होईल. परंतु जर यात सुख घेतले नाही, तर ते दुःख येणार नाही.

**प्रश्नकर्ता :** जर यात मूर्च्छा नसेल तर?

**दादाश्री :** तर मग आंबा खाण्यात हरकत नाही.

## सासूशी सुमेळ साधा

**प्रश्नकर्ता :** सासूसोबत माझा खूप संघर्ष होत असतो. त्यातून कसे सुटायचे?

**दादाश्री :** प्रत्येक कर्माची मुक्ती व्हायला हवी. सासू त्रास देत असेल तेव्हा प्रत्येक वेळी कर्मापासून मुक्ती मिळाली पाहिजे. तर त्यासाठी आपण काय केले पाहिजे? सासूला निर्दोष पाहिले पाहिजे, की यात सासूचा काय दोष? माझ्या कर्माच्या उदयामुळे त्या मला भेटल्या आहेत. त्या बिचाऱ्या तर निमित्त आहेत. तर त्या कर्माची मुक्ती

होईल, आणि जर सासूचे दोष पाहिलेत तर कर्मे वाढतील, त्यात मग कोण काय करू शकेल? समोरच्याचे दोष पाहिल्याने कर्मे बांधली जातात आणि स्वत:चे दोष पाहिल्याने कर्मे सुटतात.

आपली कर्मे बांधली जाणार नाहीत अशा प्रकारे आपण वागावे, या जगापासून दूर राहावे. कर्मे बांधली गेली होती म्हणून तर हे सर्व भेटले आहेत. आपल्या घरात एकत्र कोण जमले आहेत? ज्यांच्याशी कर्मांचा हिशोब बांधला गेला आहे तेच सर्व आता एकत्र जमलेले आहेत, आणि मग ते आपल्याला बांधून मारतात सुद्धा! आपण जरी ठरवले असेल की मला त्यांच्याशी बोलायचे नाही, तरीही समोरची व्यक्ती तोंडात बोटे घालून आपल्याला बोलायला भाग पाडते. अरे, बोटे घालून कशाला बोलायला लावतोस? यालाच म्हणतात वैर! हे सर्व मागील जन्माचे वैर! असे कुठे पाहिले आहेस का?

**प्रश्नकर्ता :** सगळीकडे हेच तर पाहायला मिळते!

**दादाश्री :** म्हणूनच मी सांगितले ना की, तिथून बाजूला व्हा आणि माझ्याजवळ या. हे जे मी प्राप्त केले आहे ते मी तुम्हाला देईन, तुमचे (मोक्षाचे) काम होऊन जाईल, आणि सुटका होईल. नाहीतर सुटका होणे शक्य नाही.

आम्ही कोणाचे दोष काढत नाही, पण नोंद घेतो की बघा, हे जग काय आहे? मी या जगाला सर्वप्रकारे पाहिले आहे, चांगल्या प्रकारे पाहिले आहे. कोणी दोषी दिसते ही आपलीच चूक आहे. कधी ना कधी तर निर्दोष पाहावेच लागेल ना? आपल्या हिशोबामुळेच आहे हे सर्व. इतकेच जरी समजलात, तरी खूप उपयोगी पडेल.

जिथे आपले गाढ ऋणानुबंध असतील, तिथे आपल्याला गाढ कर्मांचा उदय येतो, आणि ते आपले ऋणानुबंध सोडवण्यासाठी येतो. सर्व आपलाच हिशोब आहे. कोणी शिवी दिली तर काय तो अव्यवहार आहे? नाही, व्यवहार आहे. 'ज्ञानी' तर कोणी शिवी दिली तर खुश होतात की, 'बंधनातून मुक्त' झालो, याउलट अज्ञानी धक्का मारतो

(भांडतो) आणि नवीन कर्मे बांधतो. समोरची व्यक्ती शिव्या देते, तो आपल्याच कर्माचा उदय आहे, समोरचा तर फक्त निमित्त आहे. अशी जागृती राहिली तर नवीन कर्म बांधले जाणार नाही. प्रत्येक कर्म त्याच्या निर्जरेचे निमित्त घेऊनच आलेले असते. कोणा-कोणाच्या निमित्ताने *निर्जरा* होईल हे ठरलेले असते. उदयकर्मात राग-द्वेष न करणे यालाच धर्म म्हणतात.

## स्वतःच निर्माण केले अंतराय?

**प्रश्नकर्ता :** समजा मी सत्संगाला येत असताना एखादा माणूस अडचण उभी करतो. तर ती अडचण माझ्या कर्मामुळे आहे का?

**दादाश्री :** हो, तुमची चूक नसेल तर कोणी तुमचे नाव सुद्धा घेणार नाही. तुमच्याच चुकांचा हा परिणाम आहे. स्वतःच बांधलेली अंतराय कर्मे आहेत. केलेल्या कर्मांचा हिशोब भोगायचा आहे.

**प्रश्नकर्ता :** ती चूक मी मागच्या जन्मी केली होती का?

**दादाश्री :** हो, मागच्या जन्मात.

**प्रश्नकर्ता :** सध्या तर त्यांच्यासोबत माझे वर्तन चांगले आहे. तरीही ते म्हणतात की माझे वर्तन वाईट आहे, तर हे मागील जन्माचे आहे का?

**दादाश्री :** मागील जन्माची कर्मे म्हणजे काय? तर ते योजना रूपी केलेली असतात. मनाच्या विचाराने कर्मे केलेली असतात, ते आता रूपकामध्ये येतात आणि आपल्याला ते कार्य करावे लागते. करायचे नसेल तरीही करावेच लागते. त्याशिवाय सुटकाच होत नाही. असे जे कार्य आपण करत असतो ते मागील योजनेच्या आधारावर करत असतो, आणि मग त्याचे फळही भोगावे लागते.

## पती-पत्नीचा संघर्ष

ढेकूण चावतात, ते तर बिचारे खूप चांगले आहेत पण हा नवरा

बायकोला चावतो, (दु:ख देतो) बायको नवऱ्याला चावते, हे अतिशय दु:खदायी असते. चावतात की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, चावतात.

**दादाश्री :** तर हे चावायचे बंद करायचे आहे. ढेकूण चावतात, ते तर चावून निघून जातात. बिचारे आत तृप्त झाले की निघून जातात. पण पत्नी तर नेहमीच चावत असते. एक जण तर मला सांगत होता, माझी पत्नी तर मला सर्पिणीसारखी चावते! अरे, मग लग्न कशाला केलेस त्या सर्पिणीशी? ती सर्पिण तर मग हा साप नाही का? अशीच काय सर्पिण येते? साप असेल तरच सर्पिण येईल ना!

**प्रश्नकर्ता :** त्याच्या कर्मात लिहिलेले असेल म्हणून त्याला भोगावेच लागते, म्हणून तर ती चावते, त्यात पत्नीची चूक नाही!

**दादाश्री :** बस, म्हणजे हे सर्व कर्मांचे भोग आहेत. म्हणून तर अशी पत्नी मिळते, असा पती मिळतो, अशी सासू मिळते. नाहीतर या जगात किती चांगल्या चांगल्या सासवा असतात. चांगले पती असतात! पत्नी किती छान असते, आणि आपल्यालाच असे वाकडे का भेटलेत?

हा तर पत्नीसोबत भांडत राहतो. अरे, तुझ्या कर्माचा दोष आहे. लोक निमित्ताला चावायला धावतात. पत्नी तर निमित्त आहे. निमित्ताला कशासाठी चावतोस? निमित्ताचा चावा घेतल्यामुळे कोणाचे भले झाले आहे का कधी? वाईट गतीत जातात मग. हे तर आम्ही सांगत नाही की या लोकांची कोणती गती होणार आहे, म्हणून त्यांना भीती वाटत नाही. आम्ही जर त्यांना सांगितले की, चार पाय आणि वरून शेपूट मिळेल तर ते लगेच सरळ होतील.

**प्रश्नकर्ता :** पती-पत्नी दोघेही भांडत असतील, तर याच्यात कोणाचे कर्म वाईट समजावे?

**दादाश्री :** दोघांपैकी जो कंटाळतो त्याचे.

**प्रश्नकर्ता :** यात तर कोणी कंटाळतच नाही, ते तर भांडतच राहतात.

**दादाश्री :** तर मग दोघांचे सारखेच. समज नसल्यामुळे असे होत असते.

**प्रश्नकर्ता :** आणि जर ही समज आली तर मग काही दुःखच नाही ना!

**दादाश्री :** हे जर समजले तर काही दुःखच नाही. हे तर असे आहे की जर एका मुलाने दगड मारला, तर त्याला मारायला धावतो, त्याच्यावर खूप रागावतो. रागावतो की नाही? आणि जर डोंगरावरून दगड डोक्यावर पडला आणि रक्त निघाले तर? तर कोणावर रागवेल?

**प्रश्नकर्ता :** कोणावरही नाही.

**दादाश्री :** तसेच हेही आहे. मारणारा नेहमी निमित्तच असतो, पण हे समजत नसल्यामुळे हा रागावतो! तो निमित्त आहे असे जर त्याला समजले तर दुःखच नाही!

## सुख देऊन सुख घ्या

जसे आपण बाभळीचे झाड लावतो आणि त्या झाडापासून आंब्याची अपेक्षा ठेवली तर ते अयोग्य नाही का? जसे पेरतो, तसे फळ मिळते. आपण जसे कर्म केले आहे, तसे फळ आपल्याला भोगायचे आहे. कोणाला शिवी दिली असेल तर त्या दिवसापासून त्याच्या लक्षातच असते की, केव्हा मला हा परत भेटेल आणि केव्हा मी त्याला शिव्या परत करू. लोक बदला घेतात, म्हणून असे कर्म करू नये की ज्यामुळे लोक दुःखी होतील. तुम्हाला जर सुख हवे असेल तर सुख द्या.

कोणी आपल्याला दोन शिव्या दिल्या तर काय करायला हवे? तर जमा करून टाकाव्या. पूर्वी आपण दिल्या आहेत त्याच तो परत करून गेला. तुम्हाला जर आवडत असेल तर अजून दोन-पाच शिव्या द्या आणि जर आवडत नसेल तर देऊ नका, नाही तर तो जेव्हा परत करेल तेव्हा सहन होणार नाही. म्हणून तो जे काही देईल ते जमा करून घ्यावे.

या जगात अन्याय होत नाही. अगदी, एक क्षणभरदेखील न्यायाबाहेर हे जग गेले नाही. म्हणून तुम्ही जर पद्धतशीर राहाल तर तुमचे कोणी नाव सुद्धा घेणार नाही. हो, कोणी दोन शिव्या देण्यासाठी आले, तर त्या घ्या. आणि घेऊन जमा करून टाका आणि सांगा की हा हिशोब पूर्ण झाला.

## क्लेश, हे उदयकर्म नाही

जाणले, असे कोणाला म्हटले जाईल, तर ज्याच्या घरात मतभेद होत नसतील, मनभेद होत नसतील, क्लेश-कलह होत नसतील त्याला. इथे तर महिन्यात एक दिवस तरी घरात भांडण होत असेल की नाही? मग याला जीवन कसे म्हणायचे? यापेक्षा तर आदिवासी चांगल्याप्रकारे जीवन जगतात.

**प्रश्नकर्ता :** पण उदयकर्मात असेल, तर क्लेश-कलह होणारच ना?

**दादाश्री :** नाही, क्लेश उदयकर्मांच्या आधीन नाहीत, तर अज्ञानामुळे होत असतात. क्लेश झाल्याने नवी कर्मबीजे पडतात. उदयकर्मे क्लेशवाली नसतात. अज्ञानतेमुळे त्याला हे समजत नाही की तिथे कसे वागावे, म्हणून क्लेश होतात.

आत्ता जर मला कोणी अशी बातमी दिली की माझा एक खास मित्र मरण पावला आहे, तर लगेचच ज्ञानाने माझे पृथक्करण होऊन जाते की हे काय घडले, म्हणून मग मला क्लेश होण्याचे काही कारणच राहत नाही ना! हे तर अज्ञान गोंधळात घालते की माझा मित्र मरून गेला, त्यामुळेच क्लेश होतात!

क्लेश म्हणजे अज्ञानता. अज्ञानतेमुळे क्लेश निर्माण होतात. अज्ञानता गेली तर क्लेश बंद होतात.

हे सर्व काय आहे, ते जाणून घ्यायला हवे. साधारणपणे आपल्या घरात जर मुलाने माठ फोडला तर कोणी क्लेश करत नाही परंतु जर

काचेचे छोटेसे भांडे फोडून टाकले तर? नवरा काय म्हणतो बायकोला की, तू या मुलाला सांभाळत नाहीस. अरे मूर्खा, मग माठासाठी का नाही बोललास? तेव्हा म्हणतो, माठ तर डिव्हॅल्यू (स्वस्त) होता. त्याची किंमतच नव्हती. किंमत नसेल तर आपण क्लेश करत नाही आणि किंमत असेल तिथे क्लेश करत असतो ना! दोन्हीही वस्तू उदयकर्मांच्या आधीनच फुटत असतात ना! पण बघा ना, आपण माठासाठी क्लेश करत नाही!

एका माणसाचे दोन हजार रूपये हरवले, तर त्याला मानसिक चिंता-उपाधी होते. दुसऱ्या एखाद्या माणसाचे हरवले तर तो म्हणेल, 'कर्माचा उदय असेल म्हणून असे झाले', म्हणजे अशी समज असेल तर समाधान वाटेल. नाही तर क्लेश निर्माण होईल. पूर्वजन्माच्या कर्मात क्लेश नसतो. क्लेश तर आजच्या अज्ञानतेचे फळ आहे.

कित्येक माणसांचे दोन हजार गेले तरी त्यांना काही फरक पडत नाही. असे घडते की नाही? कोणतेही दु:ख उदयकर्माच्या आधीन नसते. सर्व दु:खे आपल्या अज्ञानतेमुळेच आहेत.

कित्येक माणसांनी विमा उतरवलेला नसतो, तरी पण त्यांचे गोदाम जळून जाते तेव्हा ते शांत राहू शकतात, आतून पण शांत राहू शकतात, बाहेर आणि आत दोन्ही प्रकारे शांत, आणि कित्येक माणसे तर आतही दु:ख आणि बाहेरही दु:ख दाखवतात. ही सर्व अज्ञानता आहे, असमंजसपणा आहे. गोदाम तर जळणारच होते, त्यात काही नवीन नाहीच. मग तू जरी डोके फोडून मेलास, तरी त्यात काही बदल होणार नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे कोणत्याही गोष्टीच्या परिणामाला चांगल्या तऱ्हेने स्वीकारले पाहिजे?

**दादाश्री :** हो, पॉजिटिव्ह (सकारात्मक) घ्यावे, पण ज्ञान असेल तरच पॉजिटिव्ह घेईल. नाहीतर बुद्धी नेहमी नेगेटिव्हच बघते. संपूर्ण जग दु:खी आहे. मासे तडफडतात तसे तडफडत असतात. याला जीवन

कसे म्हणायचे? समजून घेण्याची आवश्यकता आहे, जीवन जगण्याची कला जाणून घेण्याची गरज आहे. सर्वांचाच मोक्ष होत नाही पण जीवन जगण्याची कला, ती तर माहीत असली पाहिजे ना!

## अमंगल पत्र, पोस्टमनचा काय गुन्हा?

या जगात सर्व दु:खे नासमजुतीमुळेच आहेत! स्वतः निर्माण केलेले आहे हे सर्व, स्वत:ला दिसत नसल्यामुळे! एखाद्याला भाजते तेव्हा जर त्याला विचारले की, भाऊ तुम्हाला कसे भाजले? तर सांगतो, 'चुकून भाजलो, मी काय मुद्दाम भाजून घेईन?' म्हणजे हे सर्व दु:ख आपल्या चुकांचाच परिणाम आहे. चूक संपली की मग झाले.

**प्रश्नकर्ता :** कर्मे चिकट (गाढ) असतात, म्हणून आपल्याला दु:ख भोगावे लागते?

**दादाश्री :** आपणच केलेली कर्मे आहेत, म्हणून आपलीच चूक आहे. इतर कोणाचीही चूक नाही या जगात. इतर सर्व तर निमित्त मात्र आहेत. दु:ख तुमचेच आहे आणि ते समोरच्या निमित्ताच्या हातून दिले जाते. वडील वारल्याचे पत्र पोस्टमन आणून देतो, त्यात पोस्टमनचा काय दोष?

## पूर्वजन्माचे ऋणानुबंधी

**प्रश्नकर्ता :** आपले जे नातेवाईक असतात, किंवा पत्नी असेल, मुले असतील, म्हणजे आज जे आपले नातेवाईक-ऋणानुबंधी आहेत त्यांच्याबरोबर आपला पूर्वजन्माचा काही संबंध असतो म्हणून एकत्र येतात का?

**दादाश्री :** खरे आहे. ऋणानुबंधाशिवाय तर काहीच नाही ना! सर्व हिशोब आहेत. एक तर पूर्वी आपण त्यांना दु:ख दिले आहे किंवा त्यांनी आपल्याला दु:ख दिले आहे. उपकार केले असतील तर आज त्याचे फळ गोड येईल. दु:ख दिले असेल, त्याचे फळ कडू येईल.

**प्रश्नकर्ता :** समजा आता, मला एखादी व्यक्ती त्रास देत असेल

आणि मला दु:ख होत असेल, तर हे जे मला दु:ख होत आहे ते तर माझ्याच कर्माचे फळ आहे. पण नेमकी तीच व्यक्ती मला त्रास देते, याचा अर्थ त्याने मागच्या जन्मात माझ्याबरोबर असा काही हिशोब बांधला असेल, म्हणून तोच मला त्रास देतो, असे काही आहे का?

**दादाश्री :** हो, आहे ना, हा सर्व हिशोबच आहे. जेवढा हिशोब असेल तेवढया वेळा दु:ख देईल. दोनचा हिशोब असेल तर दोन वेळा दु:ख देईल, तीनचा हिशोब असेल तर तीन वेळा देईल. ही मिरची दु:ख नाही का देत?

**प्रश्नकर्ता :** हो, देते ना.

**दादाश्री :** तोंडाची आग-आग होते, नाही का? म्हणजे असे आहे हे सर्व. तो दु:ख देत नाही, पुद्‌गल दु:ख देत आहे आणि आपण समजतो की तो दु:ख देत आहे. हा तर गुन्हाच आहे. पुद्‌गल दु:ख देतो. मिरची दु:ख देते, तेव्हा मग कुठे टाकून देता तिला?

जर कधी मिरचीने दु:ख दिले तर तेव्हा आपण समजून घ्यायचे की भाऊ, यात दोष दु:खी होणाऱ्याचा आहे. मिरची तर स्वत:च्या स्वभावातच आहे.

**प्रश्नकर्ता :** आम्ही पण कोणाला त्रास दिला आणि त्याला दु:ख झाले, तर काय करावे?

**दादाश्री :** आपल्याला प्रतिक्रमण करायला हवे. कपडे तर स्वच्छ ठेवावे लागतील ना! मळवायचे कशाला!

सर्वात उत्तम वर्तन, म्हणजे कोणालाही किंचितमात्र दु:ख होणार नाही, असे वागावे. म्हणून आता दु:ख होत असेल त्याचे आपण प्रतिक्रमण केले तर अंतिम दशा येईल.

## कोणी कोणाचे दु:ख घेऊ शकतो का?

**प्रश्नकर्ता :** एक महान संत दोन वर्षांपूर्वी एका हॉस्पिटलमध्ये

खूप वेदना भोगत होते. तेव्हा मी त्यांना प्रश्न विचारला की तुम्हाला असे का होत आहे? तर ते म्हणाले की मी खूप लोकांची दु:खे घेतली आहेत. म्हणून मला असे होत आहे. तर दादाजी असे कोणी करू शकतो का?

**दादाश्री :** कोणी कोणाचे दु:ख घेऊ शकत नाही. हे तर बहाणे बनवतात, संतांच्या रूपात पूजनीय बनून! स्वत:च्या कॉजेसचेच हे परिणाम आहेत. हे तर बहाणे बनवतात, स्वत:ची अब्रू राखण्यासाठी. मोठे आलेत दु:ख घेणारे! शौचाला जाण्याची शक्ती नाही, ते कसे काय कोणाचे दु:ख घेणार? कोणी कोणाचे दु:ख घेऊच कसे शकतो?

**प्रश्नकर्ता :** मीसुद्धा मानत नाही. दु:ख घेतले जाऊ शकत नाही.

**दादाश्री :** नाही, नाही! हे तर लोकांना मूर्ख बनवतात. कोणी घेऊच शकत नाही. म्हणजे हे सर्व तर बहाणे बनवतात! आणि मग पुजले जातात! मी तर सरळ तोंडावरच सांगून टाकतो की तुम्ही तुमचेच दु:ख भोगत आहात. मग उगाच कशासाठी असे बोलता? मोठे आले दु:ख घेणारे!

**प्रश्नकर्ता :** दु:ख देऊ तर शकतो ना?

**दादाश्री :** तो दु:ख घेऊ शकत नाही आणि जो कोणी आपल्याला दु:ख देऊ शकतो, तो तर आपला इफेक्ट आहे. देऊ शकतो तोही इफेक्ट आहे आणि घेऊ शकतो तोही इफेक्ट आहे. इफेक्ट म्हणजे 'इट हॅपन्स', म्हणजे कोणी कर्ता नाही.

## भयंकर रोग, पाप कर्मांमुळे

**प्रश्नकर्ता :** कुठलाही रोग झाल्यामुळे मृत्यू होतो, तेव्हा लोक असे म्हणतात की पूर्वजन्माचे कोणते तरी पाप नडले आहे. तर ही खरी गोष्ट आहे का?

**दादाश्री :** हो, पापामुळे रोग होतात आणि पाप नसेल तर रोग होत नाहीत. तू एखाद्या रोग्याला पाहिले आहे का?

**प्रश्नकर्ता :** माझी आई आता दोन महिन्यांपूर्वीच कॅन्सरने मरण पावली.

**दादाश्री :** हे सर्व तर पापकर्माच्या उदयामुळे घडते. पापकर्माचा उदय असेल तेव्हा कॅन्सर होतो. हे सर्व हार्ट ॲटॅक वगैरे पापकर्मांमुळे होत असते. नुसती पापेच बांधली आहेत. या काळाच्या जीवांचा धंदाच हा, दिवसभर पापकर्मेच करत राहतात. भानच नाही म्हणून. जर भान राहिले असते तर असे केले नसते!

**प्रश्नकर्ता :** आईने तर आयुष्यभर भक्ती केली होती, तरी तिला कॅन्सर का झाला?

**दादाश्री :** भक्ती केली, त्याचे फळ तर नंतर मिळेल. पुढील जन्मात मिळेल. हे मागील जन्माचे फळ आत्ता मिळाले. आणि आता तुम्ही चांगले गहू पेरत आहात, म्हणून पुढील जन्मात तुम्हाला चांगले गहू मिळतील.

**प्रश्नकर्ता :** कर्मामुळे रोग होतात, तर मग ते औषधाने कसे बरे होतात?

**दादाश्री :** हो. त्या रोगात पापच केले होते, पण ते पाप समज नसल्यामुळे केले होते, म्हणून औषधाने मदत मिळते, व आराम मिळतो. समजपूर्वक केले असेल तर त्यावर औषध वगैरे काही मिळत नाही. औषध मिळतच नाही. अज्ञानतेमुळे करणारीही माणसे आहेत, बिचारी! अज्ञानतेमुळे केलेली पापे सोडत नाहीत आणि समजपूर्वक करणाऱ्यालाही सोडत नाहीत. परंतु अज्ञानतेमुळे करणाऱ्याला थोडी तरी मदत मिळते आणि समजपूर्वक करणाऱ्याला अजिबात मदत मिळत नाही.

## हे आहेत दुसऱ्यांना त्रास देण्याचे परिणाम

**प्रश्नकर्ता :** शरीराचे सुख-दु:ख आपण भोगत असतो, आजार असेल किंवा असे काहीही होत असेल, तर ते पूर्वीच्या कोणत्या प्रकारच्या कर्मांचे परिणाम असतात?

**दादाश्री :** यात तर असे आहे, कित्येक लोक समज नसल्यामुळे मांजराला मारून टाकतात. कुत्र्याला मारून टाकतात, खूप दु:ख देतात, त्रास देतात. तर ते जेव्हा दु:ख देतात तेव्हा त्यांना भान नसते की याची जबाबदारी काय येईल? लहानपणी मांजरीच्या पिल्लांना मारून टाकतात. कुत्र्यांच्या पिल्लांना मारून टाकतात आणि दुसरे असे की डॉक्टर बेडकांना कापतात, त्याची प्रतिस्पंदने त्यांच्या शरीरावर पडतात. तुम्ही जे करता त्याचीच प्रतिस्पंदने पडतील, ही सर्व प्रतिस्पंदनेच आहेत.

**प्रश्नकर्ता :** अर्थात दुसऱ्यांच्या शरीराला त्रास दिल्यामुळे प्रतिस्पंदने उमटतात?

**दादाश्री :** हो. तेच आहे. कोणत्याही जीवाला किंचितमात्र दु:ख देणे, हे शेवटी तुमच्याच शरीरावर येईल.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे त्याने जेव्हा हे सर्व केले असेल, जीवांना चिरले असेल, तेव्हा तर तो अज्ञान दशेतच असेल ना! त्यावेळी तर त्याला असा वैरभाव नसेलच, तरीही त्याला भोगावे लागेल?

**दादाश्री :** चुकून, अज्ञान दशेत आगीत हात पडला तरी आग फळ देतेच. म्हणजे कोणीच सोडत नाही. अज्ञान की सज्ञान, जाणतेपणी किंवा अजाणतेपणी, भोगण्याची पद्धत वेगळी असते, पण सोडत तर नाहीच! ही सर्व माणसे, जी दु:खे भोगत आहेत तो सर्व त्यांचा स्वत:चाच हिशोब आहे. म्हणूनच भगवंतांनी सांगितले की मन-वचन कायेने अहिंसेचे पालन कर. जर तुला सुखी व्हायचे असेल तर कोणत्याही जीवाला किंचितमात्र दु:ख होणार नाही, असे कर.

**प्रश्नकर्ता :** मग ज्ञान घेतलेला कोणी महात्मा असेल तर त्याने डॉक्टर बनू नये?

**दादाश्री :** बनावे की बनू नये, ही वेगळी गोष्ट आहे. ते मग त्याच्या प्रकृतीनुसार होतच राहील. पण मनात मात्र असा भाव असायला हवा. म्हणजे मग तो डॉक्टरच्या लाईनीत जाऊच शकणार नाही. कोणाला

किंचितमात्र दु:ख होऊ नये अशी ज्याची भावना आहे, तो बेडकाला का मारेल?

**प्रश्नकर्ता :** परंतु डॉक्टरकी शिकून हजारो लोकांचे रोग बरे करतो त्यामुळे त्यांचा फायदा पण होतो ना?

**दादाश्री :** तो जगाचा व्यवहार आहे. त्याला फायदा म्हणत नाही.

## मंदबुद्धी असलेल्यांना कर्मबंधन कशाप्रकारे?

**प्रश्नकर्ता :** जो चांगला माणूस असेल, त्याला वेगवेगळ्या प्रकारचे विचार येतात, एका मिनिटात तर कितीतरी विचार करून टाकतो. कर्म बांधून घेतो. परंतु मंदबुद्धी असलेल्याला तर काही समजच नसते, म्हणून त्याला असे काही होतच नाही, तो तर निर्दोष असतो ना!

**दादाश्री :** समजदार समजदारीची कर्मे बांधतात आणि समज नसलेले समज नसलेली कर्मे बांधतात. परंतु समज नसलेल्यांची कर्मे खूप जाड असतात आणि समजूतदार तर विवेकपूर्ण कर्मे बांधतात. समज नसलेल्यांची कर्मे जंगलीसारखी असतात, जनावरासारखी, कारण त्याला समजच नसते, भानच नसते, तो तर कोणाला पाहिल्याबरोबर दगड मारण्यास तयार होतो.

**प्रश्नकर्ता :** आपण अशा माणसांसाठी दयाभाव ठेवायला नको का?

**दादाश्री :** ठेवलाच पाहिजे. ज्याला समज नसते, त्याच्याप्रती दयाभाव ठेवला पाहिजे. त्याला काहीतरी मदत केली पाहिजे. मंदबुद्धीमुळे तो बिचारा असे करत असतो, त्यात त्याचा काय दोष? त्याने जरी दगड मारला, तरी आपण त्याच्याशी वैर ठेवत नाही. त्याच्यावर करुणा ठेवली पाहिजे!

## गरीब-श्रीमंत कोणत्या कर्माने?

जे घडत असते, त्यालाच न्याय मानले तर कल्याण होऊन जाईल.

**प्रश्नकर्ता :** तर दादा, तुम्हाला असे नाही का वाटत की, दोन माणसे असतील, त्यातील एक माणूस असे पाहतो की, हा माणूस इतका वाईट आहे, तरी पण इतक्या चांगल्या स्थितीत आहे आणि मी इतका धार्मिक आहे तरी असा दु:खी आहे. तर त्यामुळे त्याचे मन धर्मापासून परावृत होणार नाही का?

**दादाश्री :** असे आहे ना, तो जसा दु:खी आहे तसे सर्वच धार्मिक माणसे दु:खी नसतात. शेकडा पाच टक्के सुखीही असतात.

आज जी दु:खे आली आहेत, तो आपल्याच कर्मांचा परिणाम आहे. आज जो सुखी आहे, आज त्याच्याजवळ पैसे आहेत आणि तो सुख उपभोगत आहे, हा त्याच्या कर्मांचा परिणाम आहे. आणि आता जो खराब कर्म करत आहे त्याचा परिणाम नंतर येईल, तेव्हा तो भोगेल. आत्ता आपण जे चांगले करत आहोत, त्याचा परिणाम जेव्हा आपल्याला येईल तेव्हा आपण भोगू.

**प्रश्नकर्ता :** दादा, ही तुमची गोष्ट खरी आहे. पण जर व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर, एक माणूस झोपडपट्टीत राहत असेल, उपाशी असेल, तहानलेला असेल आणि समोर राजवाड्यात एक माणूस राहत असेल. झोपडीवाला पाहतो की, 'माझी दशा अशी का आहे? मी तर इतका प्रामाणिक आहे. नोकरी करतो. तरी माझ्या मुलांना खायला मिळत नाही आणि हा माणूस तर इतके वाईट काम करतो, तरीही तो राजवाड्यात राहतो.' तर त्याला राग नाही का येणार? तो मग स्थिरता कशी ठेवू शकेल?

**दादाश्री :** आता जो दु:ख भोगत आहे, ते पूर्वी जी परीक्षा दिली होती, त्याचा परिणाम आलेला आहे आणि त्या राजमहालात राहणाऱ्याने सुद्धा परीक्षा दिलेली, त्याचा हा परिणाम आलेला आहे. तो पास झाला आहे आणि आता पुन्हा त्याची नापास होण्याची लक्षणे उत्पन्न होत आहेत. आणि ह्या गरीबाची पास होण्याची लक्षणे उत्पन्न होत आहेत.

**प्रश्नकर्ता :** पण जोपर्यंत त्या गरीब माणसाची मानसिक स्थिती परिपक्व झाली नसेल तोपर्यंत त्याला हे कसे समजेल?

**दादाश्री :** त्याला हे मान्य होतच नाही. म्हणून तर तो यात उलट जास्त पाप बांधतो. त्याने हे समजलेच पाहिजे की हे माझ्याच कर्माचे फळ आहे.

## करतो चांगले आणि फळ वाईट

**प्रश्नकर्ता :** आम्ही चांगले करतो पण त्याचे फळ चांगले मिळत नाही. याचा अर्थ असा निघतो की पूर्वजन्मात काही वाईट कर्म केले असेल, म्हणून ते त्याला कॅन्सल करून टाकते.

**दादाश्री :** हो, कॅन्सल करून टाकते. आपण ज्वारी तर पेरली आणि ती छान उगवलीही परंतु जर पूर्वजन्माचे आपले वाईट कर्म उदयास आले तर शेवटचा पाऊस पडतच नाही, म्हणून पीक सुकून जाते, आणि जर पुण्याचा जोर असेल तर ज्वारी चांगली तयार होऊन जाते, नाही तर हातात आलेले पण हिसकावून घेतले जाते. म्हणून चांगले कर्म करा किंवा मग मुक्ती शोधा. दोन्हीपैकी एक मार्ग निवडा! या जगातून सुटण्याचा मार्ग शोधा, किंवा नेहमी चांगले कर्म करत राहा. पण माणसाला नेहमीसाठी चांगली कर्मे करता येत नाहीत, उलट मार्गावर चालू लागतो. त्याला कुसंग मिळतच राहतो.

**प्रश्नकर्ता :** शुभ कर्म आणि अशुभ कर्म ओळखण्याचे थर्मामीटर कोणते?

**दादाश्री :** शुभ कर्म येते तेव्हा आपल्याला गोडी वाटते, शांती वाटते, वातावरण शांत वाटते आणि अशुभ कर्म येते तेव्हा कटुता उत्पन्न होते, मन बेचैन होते. अयोग्य कर्म तापवते आणि योग्य कर्म हृदयास आनंद देते.

## मृत्युनंतर सोबत काय जाते?

**प्रश्नकर्ता :** ही जी शुभ आणि अशुभ कर्मे आहेत, त्यांचे जे

परिणाम आहेत, ते दुसऱ्या कोणत्याही योनीत गेले, तरी त्यांना भोगावे लागतातच ना?

**दादाश्री :** तेथे भोगावेच लागते. जेव्हा मृत्यू होतो तेव्हा मूळ शुद्धात्मा जातो. त्यासोबत आयुष्यभर जी शुभाशुभ कर्मे केली ती योजना रूपाने, ज्याला 'कारण शरीर' म्हणजे कॉजल बॉडी म्हटले जाते ते, आणि सूक्ष्म बॉडी, म्हणजे इलेक्ट्रिकल बॉडी, हे सर्व सोबत जाते. दुसरे काहीच जात नाही.

**प्रश्नकर्ता :** मनुष्य जन्म मिळतो, तो पुन्हा पुन्हा मिळत असतो की ठराविक काळापुरता मनुष्यात येऊन त्याला पुन्हा दुसऱ्या योनीत जावे लागते?

**दादाश्री :** इथून सर्व योनीत जायचे. आता जवळपास सत्तर टक्के माणसे चार पायात (जनावर गतीत) जाणार आहेत. इथून सत्तर टक्के! आणि लोकसंख्या झपाट्याने कमी होईल.

म्हणजे मनुष्यातून जनावरही होऊ शकतो, देवही होऊ शकतो, नर्कगतीही मिळू शकते आणि पुन्हा मनुष्यही बनू शकतो. जशी कर्मे केली असतील त्याप्रमाणे जन्म मिळतो. सध्या लोक पाशवतेसमान कर्मे करतात का?

**प्रश्नकर्ता :** सध्या तर पुष्कळ लोक पाशवी कर्मेच करत आहेत ना!

**दादाश्री :** तर तिथले तिकीट मिळाले, रिझर्वेशन झाले. जर भेसळ करत असेल, बिनहक्काचे खात असेल, बिनहक्काचे उपभोगत असेल, खोटे बोलत असेल, चोऱ्या करत असेल, तर आता या सर्वांची निंदा करण्यात काय अर्थ आहे? त्यांना त्यांचे तिकीट मिळाले आहे!

## चार गतीत भटकंती

**प्रश्नकर्ता :** मनुष्य नीच योनीत जाऊ शकतो का?

**दादाश्री :** मनुष्यातून तर तो देवयोनीत सुद्धा जाऊ शकतो, सर्वात मोठा देव बनू शकतो, जगात टॉपमोस्ट. आणि नीच योनी म्हणजे कशी नीच योनी? घृणास्पद योनीत देखील जातो. ज्याचे नाव ऐकताच घृणा उत्पन्न होते.

मनुष्य, मनुष्य जन्मातच कर्म बांधू शकतो. इतर कोणत्याही योनीत कर्म बांधत नाही. इतर सर्व योनीत तो कर्म भोगतो आणि या मनुष्य जन्मात कर्म बांधतही असतो आणि भोगतही असतो, दोन्ही गोष्टी होतात. मागील कर्म भोगत जातो आणि नवे कर्म बांधत असतो. म्हणजे इथून चार गतीत भटकायचे, इथूनच जावे लागते. या गायी-म्हशी, ही सर्व जनावरे, देवी-देवता, त्यांना फक्त त्यांची कर्मे भोगायचीच असतात, त्यांना कर्म करण्याचा अधिकार नाही.

**प्रश्नकर्ता :** परंतु अधिकांश मनुष्यांची कर्मे तर चांगली नसतातच ना?

**दादाश्री :** हा तर कलियुग आहे, दूषमकाळ आहे. म्हणून बहुतेक कर्मे खराबच होत असतात.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे येथे नवीन कर्मे बांधली जाणारच ना?

**दादाश्री :** रात्रंदिवस बांधली जात आहेत. जुनी भोगत जातो आणि नवीन बांधत जातो.

**प्रश्नकर्ता :** तर आता याच्यापेक्षा दुसरी एखादी चांगली योनी आहे का?

**दादाश्री :** कुठेच नाही. एवढी एकच चांगली योनी आहे. दुसरे जन्म तर दोन प्रकारचे आहेत. इथे जर कर्ज झाले असेल, म्हणजे वाईट कर्मे बांधली गेली असतील, त्याला कर्ज म्हटले जाते, तेव्हा मग जनावरात जावे लागते, डेबिट भोगण्यासाठी. डेबिट जास्त झाले असेल तर नर्कगतीत जायचे, मग तिथे कर्ज फेडून, म्हणजेच डेबिट भोगून परत यायचे. इथे चांगली कर्मे केली असतील तर मोठे, उच्च जातीचे

मनुष्य बनतात, तिथे संपूर्ण आयुष्य सुख असते. ते भोगून पुन्हा होता तसाच्या तसाच, आणि नाही तर देवगतीत जातो, क्रेडिटचे सुख भोगण्यासाठी. पण क्रेडिट पूर्ण संपले, एक लाख रूपये संपले, खर्च झाले की मग परत इथे!

**प्रश्नकर्ता :** इतर सर्व जन्मांपेक्षा मनुष्य जन्माचे आयुष्य जास्त आहे ना?

**दादाश्री :** नाही, असे काही नाही. या देवी-देवतांचे लाखो वर्षांचे आयुष्य असते.

**प्रश्नकर्ता :** पण देवी-देवता होण्यासाठी तर जेव्हा ही सर्व कर्मे पूर्ण होतील तेव्हा नंबर लागेल ना?

**दादाश्री :** नाही, असे काही नाही. जर कोणी सुपरह्युमन (महामानव) असेल तर तो देवच होतो. स्वतःचे सुख स्वतः भोगत नाही आणि दुसऱ्याला देऊन टाकतो, त्याला सुपरह्युमन म्हणतात. तो देवगतीत जातो!

**प्रश्नकर्ता :** स्वतःलाच सुख नसेल तर तो दुसऱ्यांना सुख कसे देऊ शकेल?

**दादाश्री :** म्हणून तर देऊ शकत नाही ना! पण एखादा असा माणूस असेल करोडोत एखादा माणूस, जो स्वतःचे सुख दुसऱ्यांना देऊन टाकत असेल तो देवगतीत जातो. पूर्वी तर असे पुष्कळ लोक होते. शेकडा दोन-दोन, तीन-तीन टक्के, पाच-पाच टक्के होते. आता कदाचित करोडोत दोन-चार निघतील. आता तर कोणाला दुःख दिले नाही तरी त्याला चांगला म्हटला जाईल. दुसऱ्यांना कोणत्याही प्रकारचे दुःख दिले नाही तर पुन्हा मनुष्यात येऊ शकेल. मनुष्यात अशा चांगल्या ठिकाणी की जिथे बंगला तयार असेल, गाड्या तयार असतील, तिथे जन्म होईल आणि पाशवी कर्मे केली, भेसळ केली, लबाडी केली, चोऱ्या केल्या तर जनावरात जावे लागेल.

**प्रश्नकर्ता :** तर याचा नियम काय आहे?

**दादाश्री :** अधोगतीत जाणारा पकडला जात नाही आणि जो ऊर्ध्वगतीत जाणार आहे, अशा मनुष्याची कर्मे अशी हलकी असतात, की ती त्याला लगेचच पोलिसवाल्यांकडून पकडवून देतात. त्यामुळे त्याचे पुढे वाममार्गाला जाण्याचे थांबते आणि त्याचे भाव बदलतात. निसर्ग कोणाला मदत करतो? की जो जड आहे, त्याला जड होऊ देतो आणि जो हलका आहे, त्याला हलके होऊ देतो. हलके कर्मवाला ऊर्ध्वगतीत जातो, जड कर्मवाला अधोगतीत जातो. असा निसर्गाचा नियमच आहे. आता जर एखादी व्यक्ती की ज्याने कधीही चोरी केली नसेल, त्याने जरी एकदाच चोरी केली, तरी तो लगेचच पकडला जातो आणि सराईत चोर पकडला जात नाही. कारण त्याची कर्मे जास्त जड आहेत, म्हणजे त्यातही पूर्ण मार्क्स पाहिजेत ना! माइनस मार्क्ससुद्धा पूर्ण हवेत ना! तरच जग चालेल ना?

## मनुष्य जन्मातच बांधली जातात कर्मे

**प्रश्नकर्ता :** म्हणूनच मी विचारतो की मनुष्य जन्माशिवाय दुसरा एखादा असा जन्म आहे का ज्यात कमी कर्मे बांधली जातात?

**दादाश्री :** दुसऱ्या ठिकाणी कर्मे बांधली जातच नाहीत. दुसऱ्या कुठल्याही योनीत कर्मे बांधली जात नाहीत, फक्त इथेच बांधली जातात, आणि जिथे कर्मे बांधली जात नाहीत, तेथील लोक काय म्हणतात? की इथे या जेलमध्ये कशाला आलो? कर्मे बांधली जातात अशी जागा, याला तर मुक्तता म्हटली जाते. आणि इतर जागांना तर जेल म्हटले जाते.

**प्रश्नकर्ता :** मनुष्य जन्मातच कर्मे बांधली जातात. चांगली कर्मे पण इथेच बांधली जातात ना?

**दादाश्री :** चांगली कर्मे पण इथेच बांधली जातात आणि वाईट कर्मे पण इथेच बांधली जातात.

ही माणसे कर्मे बांधतात, त्यात जर लोकांना नुकसान करणारे,

लोकांना दु:ख देणारी कर्मे असतील तर ते जनावर गतीत आणि नर्कगतीत जातात. लोकांना सुख देणारी कर्मे असतील तर ते मनुष्यात येतात किंवा देवगतीत जातात. ते जसे कर्म करतात त्यानुसार त्यांची गती होत असते. आणि गती झाली म्हणजे ते भोगून झाल्यानंतर पुन्हा इथेच यावे लागते.

कर्मे बांधण्याचा अधिकार फक्त माणसालाच आहे इतर कोणालाही नाही आणि ज्याला बांधण्याचा अधिकार आहे त्याला चारही गतीत भटकावे लागते आणि जर कर्म केले नाही, अजिबात कर्म केले नाही तर मोक्षाला जाऊ शकतो. मनुष्यातूनच मोक्षाला जाता येते. दुसऱ्या कोणत्याही योनीतून मोक्षाला जाता येत नाही. कर्म करत नाही असे कोणी पाहिले आहे का तुम्ही ?

**प्रश्नकर्ता :** नाही, असे पाहिले नाही.

**दादाश्री :** तुम्ही पाहिले आहेत का कर्म न करणारे ? यांनी तर पाहिले आहेत आणि तुम्ही नाही पाहिलेत ?!

ही जी जनावरे वगैरे सर्व आहेत, ते खातात, पितात, मारामारी करतात, लढतात, तरीही त्यांना कर्मे बांधली जात नाहीत. त्याचप्रमाणे माणसांना देखील कर्म बांधले जाणार नाही अशी स्थिती शक्य आहे. परंतु जर 'स्वत:' कर्माचा कर्ता बनला नाही तर, तो फक्त कर्म भोगून घेतो, एवढेच! म्हणजे ज्यांनी येथे, आमच्याकडे येऊन 'सेल्फ रियलाइज'चे ज्ञान (आत्मज्ञान) प्राप्त करून घेतले आहे त्यांचे कर्माचे कर्तेपण सुटून जाते, करायचेच सुटून जाते, नंतर फक्त भोगायचेच राहते. जोपर्यंत अहंकार असेल तोपर्यंत कर्माचा कर्ता.

## आठ जन्मांपर्यंतची पुंजी सोबत

**प्रश्नकर्ता :** ज्या-ज्या योनीत कर्मे बांधली जात नाहीत, फक्त पूर्व कर्मे भोगावीच लागतात, तर त्या जीवाचा पुढील जन्म कसा असू शकेल ?

**दादाश्री :** हे सर्व असे आहे की, माणूस इथून गेला, आणि त्याला गाईचा जन्म मिळाला, तर तो गाईचा जन्म भोगेल. तो पूर्ण झाला, त्यानंतर बकरीचा जन्म मिळेल. बकरीचाच जन्म मिळेल असे नाही, ज्या योनीत त्याचा हिशोब असेल त्यानुसार जन्म मिळेल. डिझाइन असेल त्याप्रमाणे जन्म मिळेल. नंतर गाढवाचा जन्म मिळेल. म्हणजे शंभर-दोनशे वर्ष असे भटकत राहतो. नंतर जेव्हा सर्व डेबिट भोगून संपेल तेव्हा पुन्हा इथे मनुष्य जन्मात येतो. इतर सर्व योनीत जेव्हा एका जन्मानंतर दुसरा जन्म होतो, तो कर्म केल्यामुळे होत नाही पण कर्म भोगले गेले त्यामुळे होतो. हे एक स्तर गेले आणि दुसरे स्तर आले, दुसरे स्तर गेले आणि तिसरे स्तर आले. अशा प्रकारे जेव्हा सर्व स्तर भोगले जातात तेव्हा आठ जन्म पूर्ण होतात आणि मग परत इथे मनुष्य जन्मात येतो. जास्तीत जास्त आठ जन्म इतर गतीत भटकून पुन्हा मनुष्यात येऊनच जातो. असा कर्माचा नियमच आहे!

मनुष्य जन्माच्या लायकीचे कर्म त्याच्याजवळ शिल्लक राहतेच. जिथे जाईल तिथे, देवगतीत गेला तरीही. म्हणजे शिल्लक असल्यामुळे तो परत येतो. तर अशा प्रकारे ही शिल्लक तशीच ठेवून दुसरी सर्व कर्मे भोगली जातात.

**प्रश्नकर्ता :** मनुष्यात येतो, त्यानंतर त्याचे जीवन कशाप्रकारे चालते? त्याचे जसे भाव असतील त्यानुसारच चालते ना? त्याच्या कोणत्या कर्माच्या आधारावर त्याचे जीवन चालते?

**दादाश्री :** त्याच्याजवळ मनुष्य जन्माचे कर्म तर शिल्लक आहेच. ही पुंजी तर आपल्याजवळ आहेच, पण देणे (कर्ज) झाले असेल तर ते भोगून झाल्यानंतर पुन्हा इथे या, असे म्हणतात. क्रेडिट झाले असेल तर क्रेडिट भोगल्यानंतर पुन्हा इथे या. ही पुंजी तर आहेच आपल्याजवळ. ही पुंजी संपेल अशी नाही. पुंजी केव्हा संपेल? तर जेव्हा कर्तापद सुटेल तेव्हा संपेल. तेव्हा मग मोक्षाला जाईल. अन्यथा कर्तापद सुटतच नाही ना! अहंकार नष्ट झाल्यावर सुटते. जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत कर्मे भोगून पुन्हा तो इथल्या इथेच येतो.

**प्रश्नकर्ता :** दुसऱ्या सर्व योनींमधून पुन्हा मनुष्यात येतो, तर जेव्हा येतो तेव्हा कुठे जन्म घेतो? कोळ्याच्या घरी की राजाच्या घरी?

**दादाश्री :** इथे मनुष्य योनीत स्वत:चे जे सामान तयार करून ठेवून गेला होता ते, आणि दुसरे हे जे कर्ज केले आहे, ते कर्ज फेडून परत तिथल्या तिथेच येतो आणि त्या सामानापासूनच पुन्हा सुरू करतो. म्हणजे जसे आपण बाजारात जातो आणि तेथील सर्व कामे उरकून पुन्हा घरीच परततो. त्याचप्रमाणे हे घर आहे. पुन्हा इथल्या इथेच यायचे. इथे हे घर आहे. जेव्हा अहंकार समूळ नष्ट होईल, तेव्हा मग इथेही राहायचे नाही. मोक्षाला निघून जायचे, बस. इतर जन्मात अहंकार वापरला जात नाही. जिथे फक्त भोगायचे आहे तिथे अहंकार वापरला जात नाही. म्हणून कर्मे बांधली जात नाहीत. या रेड्याला, गाईला, कुणालाच अहंकार नसतो. असे दिसते खरे की हा घोडा अहंकारी आहे पण तो डिस्चार्ज अहंकार आहे, खरा अहंकार नाही. खरा अहंकार असेल तर कर्मे बांधली जातात. म्हणजेच अहंकारामुळे पुन्हा इथे (मनुष्य योनीत) येत असतो. अहंकार संपला की सरळ मोक्षाला जातो.

## रिटर्न तिकीट घेतले आहे, जनावरांमधून

**प्रश्नकर्ता :** आपण सांगितले की कर्माचे फळ मिळते, तर मग ही जी जनावरे आहेत ती पुन्हा मनुष्यात येऊ शकतात का?

**दादाश्री :** तीच येतात. तीच आता आली आहेत, त्यांचीच संख्या वाढली आहे आणि तेच तर ही सर्व भेसळ करीत आहेत.

**प्रश्नकर्ता :** त्या जनावरांनी असे कोणते सत्कर्म केले की ते मनुष्य बनले?

**दादाश्री :** त्यांना सत्कर्म करावे लागत नाही. मी तुम्हाला समजावतो. एक माणूस कर्जदार झाला म्हणून कर्जबाजारी म्हटला जातो. लोक त्याला कर्जबाजारी म्हणतात; पण नंतर त्याने ते कर्ज फेडून टाकले तर त्याला कर्जबाजारी म्हणतील का?

**प्रश्नकर्ता :** नाही, मग म्हणत नाहीत.

**दादाश्री :** त्याचप्रमाणे इथून प्राण्यांमध्ये जातात ते कर्ज फेडण्यासाठीच जातात. कर्ज फेडून पुन्हा इथे येतात आणि जर देवगतीत गेले तर क्रेडिट (पुण्य) भोगून परत इथेच येतात.

## असे आमंत्रित करतात अधोगतीला

**प्रश्नकर्ता :** मनुष्याला जनावरांचाच जन्म मिळेल, हे कसे कळेल?

**दादाश्री :** त्यांची सर्व लक्षणेच सांगत असतात. आता त्याला जे विचार येतात ना, ते पाशवतेचेच विचार येतात. कसे विचार येतात? तर कोणाचे उपभोगून घेऊ, कोणाचे खाऊन टाकू, कोणाचे असे करू? मृत्यूच्या वेळी फोटोसुद्धा जनावराचाच निघतो.

**प्रश्नकर्ता :** आंब्याची कोय पेरल्यावर आंबाच होतो, त्याचप्रमाणे मनुष्य मरतो तेव्हा मनुष्यातून पुन्हा मनुष्यच बनतो का?

**दादाश्री :** हो, मनुष्यातून पुन्हा मनुष्य, म्हणजे प्रसूतिगृहामध्ये स्त्रीच्या पोटी कुत्रा जन्माला येत नाही. समजले ना! परंतु मनुष्यगतीत ज्याचे विचार सज्जनतेचे असतील, म्हणजे मानवतेचे गुण असतील तर पुन्हा मनुष्यात येतो. आणि स्वतःच्या हक्काचे जे असेल तेसुद्धा दुसऱ्यांना उपभोगण्यासाठी देऊन टाकतो तो देवगतीत जातो, तो सुपरह्युमन म्हटला जातो. स्वतःची स्त्री भोगण्यास हरकत नाही, ते हक्काचे म्हटले जाते, पण बिनहक्काचे भोगू नये. हे असे जे भोगण्याचे विचार आहेत तीच त्याची मनुष्यातून पुढील जन्मी जनावरात जाण्याची निशाणी आहे. तो व्हिसा आहे. आपण त्याचा व्हिसा पाहून घेतला की लगेच कळते.

**प्रश्नकर्ता :** कर्माचा सिद्धांत असा आहे की, मनुष्याला त्याची कर्मे मनुष्य योनीतच भोगावी लागतात?

**दादाश्री :** नाही. कर्मे तर इथल्या इथेच भोगावी लागतात. पण जे विचार केलेले असतात की कोणाचे उपभोगू, कोणाचे पळवून घेऊ, आणि कोणाचे हिसकावून घेऊ? असे जर संकल्प-विकल्प केले

असतील, तर ते त्याला तिथे घेऊन जातात. इथे केलेली कर्मे तर तो इथल्या इथेच भोगून घेतो. पाशवी कर्म केले असेल ते तर इथल्या इथेच भोगून घेतो. त्याला हरकत नाही. डोळ्यांना दिसतील अशी पाशवी कर्मे केली असतील, तर ती इथल्या इथेच भोगावी लागतात. ती कशाप्रकारे भोगायची? तर लोक त्याची निंदा करतात, लोक धिक्कारतात. परंतु जर पाशवी विचार केले, वाईट संकल्प-विकल्प केले, की असे करायला हवे, तसे करायला हवे, असे उपभोगले पाहिजे, अशा ज्या योजना केल्या, त्या योजनाच त्याला जनावर गतीत घेऊन जातात. योजना करतात ना आत? नाही का? त्या योजना जनावर गतीत घेऊन जातात.

## यात भोगणारा कोण?

**प्रश्नकर्ता :** चांगले कर्म केले तर पुण्य बांधले जाते आणि वाईट कर्म केले तर पाप. हे पाप-पुण्य कोण भोगतो शरीर की आत्मा?

**दादाश्री :** जो हे पाप-पुण्य करतो तोच भोगतो. कोण भोगतो? अहंकारच करतो आणि अहंकारच भोगतो. शरीर भोगत नाही आणि आत्मा पण भोगत नाही. अहंकार भोगत असतो. शरीरासोबतचा अहंकार असेल तर शरीरासोबतच भोगतो. शरीराशिवायचा अहंकार असेल तर शरीराशिवाय भोगतो. फक्त मानसिक रूपानेच भोगतो.

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर स्वर्ग किंवा नरक, असे काही आहे का?

**दादाश्री :** मृत्युनंतर स्वर्ग आणि नरक दोन्हीही आहेत.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे खराब कर्मे केली असतील तर नरकात कोण जातो? आत्मा जातो का?

**दादाश्री :** अरे, आत्मा आणि शरीर, दोन्ही सोबतच असतात ना!

**प्रश्नकर्ता :** मृत्यू होतो तेव्हा शरीर तर इथेच सुटून गेलेले असते ना?

**दादाश्री :** मग तिथे नवीन शरीर बनते. नरकात वेगळ्या प्रकारचे शरीर बनते, तिथे पाऱ्यासारखे शरीर असते.

**प्रश्नकर्ता :** तिथे शरीर भोगत असते की आत्मा भोगत असतो?

**दादाश्री :** अहंकार भोगत असतो. ज्याने नरकगतीची कृत्ये केली होती तोच भोगतो.

## हिटलरने कशी कर्मे बांधली?

हिटलरने लोकांना मारले, त्याचे त्याला फळ का मिळाले नाही? त्याने ज्यांना मारले, ते सर्व त्याला कसे भेटले? त्याला ते प्लेन कुठून मिळाले? हे सर्व त्याला कसे भेटले? भेटले म्हणून मारले. म्हणजे ते कर्मफळ होते त्या बिचाऱ्यांचे? त्याचेही फळ नरकगती येईल. शास्त्रकारांनी पुढे सांगितले आहे की, इथे जे मरून गेले आणि जगात निंदनीय झाले ते नरकगतीत किंवा जनावरगतीत जातील. आणि जर जगात प्रशंसनीय झाले, व त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली तर ते देवगतीत किंवा फार तर मनुष्यात जातील! म्हणजे याचेही फळ तर येतेच. म्हणजे हे लोकांच्या तराजूने पाहून घ्यावे.

## सत्ताधीशांचा हिशोब प्रजेसोबत

**प्रश्नकर्ता :** एका देशाचे ते सत्ताधीश आहेत, किंवा मग तिथले धर्मगुरु म्हणा, तर संपूर्ण सत्ता आज त्यांच्याच हातात आहे. आज ते त्या देशाचे प्रमुख म्हटले जातात. आता लाखो लोक मरत आहेत. जगातील सर्व देशांनी त्यांना विनंती केली की तुम्ही यावर उपाय करा. पण ते उपाय करण्यास तयार नाहीत आणि लाखो लोकांचा संहार होतच आहे. तर हे कसे कर्म आहे? त्यांच्याशी लाखो माणसांचा काय ऋणानुबंध आहे?

**दादाश्री :** ती माणसे तर स्वत:ची कर्मे भोगत आहेत. कर्मे बांधत नाहीत, तर भोगत आहेत.

**प्रश्नकर्ता :** आणि तो जो मारत आहे, त्याचे काय?

**दादाश्री :** तो तर कर्म बांधत आहे. तो नरकगतीत जाईल.

**प्रश्नकर्ता :** हे सर्व मरत आहेत, त्याला निमित्त तर हा मारणाराच बनत आहे ना? मग ते कोणत्या कारणामुळे?

**दादाश्री :** निमित्त बनत आहे आणि म्हणूनच तो नरकात जाईल.

**प्रश्नकर्ता :** नरकात जाईल हे बरोबर आहे. पण हे घडले कसे? कोणत्या हिशोबाने घडले?

**दादाश्री :** हा लोकांचाच हिशोब, त्याच्याबरोबरचा हिशोब नाही, लोकांनी गुन्हे केले होते म्हणूनच त्यांना असे निमित्त मिळाले.

लोकांनी गुन्हे केले होते त्यामुळे त्यांना असे कोणते तरी निमित्त मिळाले आणि ते मारले गेले. या सर्वांचे कर्म व्यक्तिगत नाही. व्यक्तिगत कर्म केव्हा म्हटले जाईल? तर तुम्ही काहीही बोलत नसाल तरीही तुम्हाला बघून मला आतून संताप होत असेल तर ते व्यक्तिगत आहे. दूर राहून केलेले काम व्यक्तिगत म्हटले जात नाही.

## याला सामूहिक कर्मोदय म्हणतात

**प्रश्नकर्ता :** या जगात जे भूकंप होतात आणि ज्वालामुखी फुटतात, या मागे कोणती शक्ती काम करत असते?

**दादाश्री :** ती सर्व 'व्यवस्थित शक्ती...' व्यवस्थित शक्ती सर्व काही करते. एविडन्स मिळायला हवेत. सर्व एविडन्स एकत्रित झाले, किंवा मग त्यात जर थोडेसे काही कच्चे राहिले असेल तर ते एकत्रित झाले की लगेच फुटतात अगदी जोरात.

**प्रश्नकर्ता :** हे वादळ, तुफान वगैरे 'व्यवस्थित शक्ती'च पाठवते का?

**दादाश्री :** मग दुसरे कोण पाठवणार? हे वादळ तर संपूर्ण मुंबईत आलेले असते, पण काही लोक विचारतात 'वादळ आले की नाही?' 'अरे, असे का विचारता?' तेव्हा ते म्हणतात, 'आम्ही तर

अजून पाहिलेच नाही, वादळ आमच्या इथे आलेच नाही.' म्हणजे हे असे असते सर्व. वादळ मुंबईत सर्वांनाच स्पर्शत नाही. कोणाला अमुक प्रकारे स्पर्श करेल, कोणाचे तर संपूर्ण घरच उडवून टाकेल असे जोरदार एकदम, आणि कोणाच्या सतरंज्या पडलेल्या असतील, त्यांना काहीसुद्धा होत नाही. सर्व काही पद्धतीशीरपणे होत असते. वादळ आले म्हणून काही भीती बाळगण्याची गरज नाही. सर्व 'व्यवस्थित शक्ती' पाठवत असते.

**प्रश्नकर्ता :** हे भूकंप होत असतात, सायक्लोन (वादळ) येते, लढाया होतात, तर हे सर्व हानी-वृद्धीच्या कारणामुळे नाही का?

**दादाश्री :** नाही, हे सर्व कर्माच्या उदयाच्या कारणाने आहे. सर्व जण उदय कर्मे भोगत आहेत. मनुष्यांची वृद्धी होत असेल तरीही भूकंप होत राहतील. जर हानी-वृद्धीच्या आधीन असेल तर तसे होणार नाही ना?

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ज्याला भोगायचे आहे त्याचा उदय म्हणायचा का?

**दादाश्री :** मनुष्यांचा, प्राण्यांचा सर्वांचाच उदय. हो, सामूहिक उदय येतो. बघा ना, हिरोशिमा आणि नागासाकीचा उदय आला होता ना!

**प्रश्नकर्ता :** ज्याप्रमाणे कुणी एक व्यक्ती पाप करते त्याचप्रमाणे लोक सामूहिक पाप करतात, तर त्याचा बदला सामूहिकरित्या मिळतो का? म्हणजे एक माणूस एकटाच चोरी करायला गेला आणि दहा माणसे मिळून दरोडा टाकायला गेले, तर त्याचा दंड सामूहिकरित्या मिळत असेल का?

**दादाश्री :** हो. फळ संपूर्ण मिळेल, पण दहाही लोकांना कमी-जास्त प्रमाणात मिळेल. त्यांचे कसे भाव आहेत त्या आधारावर. त्यातील एखादी व्यक्ती तर असे म्हणत असेल की 'माझ्या काकांच्या ऐवजी नाईलाजाने मला जावे लागले,' असाही भाव असतो. म्हणजे भाव जितका स्ट्रॉंग (मजबूत) आहे, त्यानुसार सर्व हिशोब फेडायचे. अगदी करेक्ट. धर्मकाट्यासारखे.

**प्रश्नकर्ता :** पण हे जे नैसर्गिक कोप होत असतात, जसे की एखाद्या ठिकाणी विमान कोसळले आणि इतके जण मारले गेले, तसेच एखाद्या ठिकाणी ज्वालामुखी फुटला आणि दोन हजार लोक मृत्यू पावले. तर काय ते त्या सर्वांनी सोबत केलेल्या सामूहिक कर्मांचा परिणाम असेल का?

**दादाश्री :** तो त्या सर्वांचा हिशोब आहे. तेवढेच हिशोबवाले त्यात पकडले जातात, दुसरा कोणी पकडला जात नाही. एखादा आज इथून मुंबईला गेला असेल आणि दुसऱ्या दिवशी इथे भूकंप होतो, आणि काही मुंबईवाले तिथून इथे आलेले असतात, आणि ते मुंबईवाले इथे मृत्यू पावतात. म्हणजे हा सर्व हिशोब आहे.

**प्रश्नकर्ता :** आता इतके सारे लोक जिथे-तिथे मरत आहेत, दोनशे-पाचशे अशा संख्येत. यापूर्वी कधी इतके सारे समूहात मरत असल्याचे पाहण्यात आले नव्हते, तर काय समूहात इतकी सारी पापे होत असतील?

**दादाश्री :** पूर्वी असे समूह नव्हतेच ना! आता जर लाल झेंडेवाले निघाले तर किती असतील? पांढरे झेंडेवाले किती असतील? हल्ली समूह आहेत म्हणून समूहांचे काम. पूर्वी समूह नव्हतेच ना!

**प्रश्नकर्ता :** हं... म्हणजे नैसर्गिक कोप हा समूहाचाच परिणाम आहे ना! दुष्काळ पडणे, एखाद्या ठिकाणी प्रचंड पूर येणे, एखाद्या ठिकाणी भूकंप होऊन लाखो लोक मृत्युमुखी पडणे.

**दादाश्री :** हा सर्व ह्या लोकांचाच परिणाम.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ज्यावेळी शिक्षा मिळायची असेल, तेव्हा वाटेल तिथून ओढला जाऊन इथे येतोच.

**दादाश्री :** निसर्गच त्याला तिथे घेऊन येतो आणि शिजवून टाकतो, शेकून टाकतो. त्याला त्या विमानात आणून विमान पाडतो.

**प्रश्नकर्ता :** हो दादा, अशी उदाहरणे पाहायला मिळतात की

जो जाणार असेल, तो काही कारणामुळे जात नाही आणि जो कधीही जात नसेल तो त्याचे तिकीट घेऊन विमानात जाऊन बसतो. नंतर विमान खाली कोसळते.

**दादाश्री :** हिशोब आहे सर्व, पद्धतशीर न्याय. अगदी धर्मकाट्याप्रमाणे. कारण त्याचा कोणी मालक नाही, जर मालक असेल तर अन्याय होईल.

**प्रश्नकर्ता :** एअर इंडियाचे विमान कोसळले, तर ते सर्वांचे निमित्त होते का? हे 'व्यवस्थित' होते का ?

**दादाश्री :** हिशोबच. हिशोबाशिवाय तर काहीच घडत नाही.

## पाप-पुण्याचे होत नाही प्लस-माइनस

**प्रश्नकर्ता :** पापकर्म आणि पुण्यकर्मांचे प्लस-माइनस (वजा-बेरीज) होऊन नेट रिझल्ट येतो का भोगताना?

**दादाश्री :** नाही, प्लस-माइनस होत नाही. पण त्याचे भोगणे कमी करू शकतो. प्लस-माइनसचा नियम तर जेव्हापासून हे जग आहे तेव्हापासून कधी नव्हताच. नाहीतर अक्कलवाल्या लोकांनीच याचा फायदा करून घेतला असता, प्लस-माइनस करून. कारण शंभर पुण्ये केली आणि दहा पापे केली, तर त्यातून दहा कमी करून माझी नव्वद पुण्ये उरली ती जमा करून घ्या, असे ते म्हणतील. मग अक्कलवाल्यांची तर चैनच होईल. पण हे तर असे सांगतात, की ही पुण्ये पण भोग आणि नंतर दहा पापे पण भोग.

**प्रश्नकर्ता :** दादा, आमच्याकडून जर अहंकाराशिवाय कोणतेही सत्कर्म झाले किंवा एखाद्या संस्थेला, हॉस्पिटलला पैसे दिले तर आपल्या (वाईट) कर्मानुसार जे आपल्याला भोगावे लागणार आहे ते कमी होते, ही गोष्ट खरी आहे का?

**दादाश्री :** नाही, कमी होत नाही. कमी-जास्त होत नाही. पण त्यामुळे दुसरी कर्मे बांधली जातात. दुसरी पुण्याची कर्मे बांधली जातात.

पण आपण एखाद्याला ठोसा मारून आलो (दु:ख दिले) तर त्याचे फळ तर भोगावेच लागते, नाही तर हे सर्व व्यापारी लोक पाप माइनस (कमी) करून फक्त नफाच ठेवतील. पण हे असे नाही. नियम खूप सुंदर आहे. एक ठोसा मारला असेल, तर त्याचे फळ मिळेल. शंभर पुण्यातून दोन पापे कमी होणार नाहीत. दोन पापेही राहतील आणि शंभर पुण्येही राहतील. दोन्हीही वेगवेगळी भोगायची.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे जे शुभ कर्म करतो आणि अशुभ कर्म करतो, या दोन्हींचे फळ वेगवेगळे मिळते?

**दादाश्री :** अशुभाचे फळ अशुभच मिळते. शुभाचे फळ शुभच मिळते. कमी-जास्त होतच नाही. भगवंताकडे नियम कसा आहे? की तुम्ही आज शुभ कर्म केले, म्हणजे शंभर रूपये दान दिले, तर ते शंभर रूपये जमा करतील आणि एखाद्याला शिवी देऊन पाच रुपयाची उधारी केली, तर तुमच्या खात्यात उधारी लिहितील, पंच्याण्णव जमा करणार नाही. ते पाच उधार पण ठेवतात आणि शंभर जमा पण करतात. खूप पक्के आहेत. नाही तर या व्यापारी लोकांच्या वाट्याला कधीच दु:ख येणार नाही. जर असे असते तर जमा-उधार करून त्यांचे जमाच राहिले असते आणि मग तर कोणीही मोक्षाला गेलाच नसता. इथे दिवसभर पुण्यच पुण्य असणार. मग मोक्षाला कोण जाईल? हा नियमच असा आहे की, शंभर जमाही करतो आणि पाच उधारही करतो. बेरीज-वजाबाकी करीत नाही. म्हणून माणसाने जे जमा केले असेल ते देखील भोगावे लागते, पण मग ते पुण्यसुद्धा आवडत नाही. खूप पुण्य जमा केले असेल, दहा दिवस, पंधरा दिवस लग्न समारंभ वगैरे चालू असतात त्यावेळी खाण्या-पिण्याची चंगळ होते, परंतु शेवटी तेही आवडत नाही, त्याचाही कंटाळा येतो. खूप पुण्यातही कंटाळा येतो. खूप पापातही कंटाळा येतो. पंधरा दिवसांपर्यंत सेंट आणि अत्तरे चोपडत असतील, लग्नात खूप चांगले जेवण खाऊ घालत असतील, तरीही खिचडी खाण्यासाठी घरी पळून जातो. कारण हे खरे सुख नाही. हे कल्पित सुख आहे. खऱ्या सुखाचा कधीही अभाव होत नाही. आत्म्याचे जे खरे सुख आहे, त्याचा अभाव कधीच होत नाही. हे तर कल्पित सुख आहे.

## कर्मबंधनातून मुक्तीचा मार्ग...

**प्रश्नकर्ता :** पुनर्जन्मात कर्मबंधनातून सुटण्याचा मार्ग कोणता? साधारणपणे आम्हाला हे माहीत आहे की, आम्ही मागील जन्मी चांगली आणि वाईट दोन्ही कर्मे केलेलीच आहेत, तर यापासून सुटण्याचा मार्ग कोणता?

**दादाश्री :** जर एखादा तुला त्रास देत असेल, तर तुला आता समजून घ्यायचे की, मागील जन्मात मी त्याच्याशी वाईट कर्मे केलेली आहेत, त्याचेच हे फळ देत आहे. तेव्हा आता तुला शांती आणि समतेत राहून त्या गोष्टीचा शेवट करायचा. तू तर शांत राहू शकत नाहीस आणि परत नवीन बीजे टाकतोस. पूर्वजन्मीचे बंधन सोडण्याचा हा एकच मार्ग आहे, शांती आणि समता. त्याच्यासाठी वाईट विचारसुद्धा यायला नको आणि माझाच हिशोब मी भोगत आहे असे वाटायला हवे. तो जे करत आहे, ते माझ्या पापाच्या आधारावरच करत आहे, मी माझेच पाप भोगत आहे, असे वाटले पाहिजे, तरच सुटका होईल. आणि खरोखर तर तुमच्याच कर्माच्या उदयामुळे तो तुम्हाला दु:ख देत आहे. तो तर निमित्तच आहे. संपूर्ण जग निमित्त आहे, दु:ख देणारा, रस्त्यातून आपले शंभर डॉलर पळवणारा हे सर्वच निमित्त आहेत. तुमचाच हिशोब आहे. तुम्हालाच हे पहिल्या नंबरचे बक्षीस कसे मिळाले? यांना का मिळत नाही? शंभर डॉलर पळवून नेले, याला तर बक्षीसच म्हणायचे. नाही का?

## कर्म भोगण्यात, प्रार्थनेचे महत्त्व

**प्रश्नकर्ता :** दादा, मला असे विचारायचे आहे की जे प्रारब्ध बनून तयार झाले आहे, की कोणी आजारी पडणार आहे किंवा कोणाचे काही नुकसान होणार आहे, तर काय ते प्रार्थनेने बदलू शकते?

**दादाश्री :** असे आहे की, प्रारब्धाचे प्रकार असतात. एक प्रकार असा आहे की तो प्रार्थना केल्याने संपतो. दुसरा प्रकार असा आहे

की तुम्ही साधारण पुरुषार्थ केला की तो संपतो. आणि तिसरा प्रकार असा आहे की तुम्ही कितीही पुरुषार्थ केला तरी भोगल्याशिवाय सुटकाच होत नाही. खूप गाढ असतो. जसे एखादा माणूस आपल्या कपड्यावर थुंकला आणि तो धुवायला गेलो तर तो डाग जर साधा असेल तर पाणी टाकल्यावर धुतला जाईल. परंतु तो डाग फार घट्ट असेल तर?

**प्रश्नकर्ता :** निघणार नाही.

**दादाश्री :** तशीच ही कर्मे देखील गाढ असतात. त्यांना निकाचित कर्म म्हटले आहे.

**प्रश्नकर्ता :** पण कर्म जरी खूपच गाढ असेल तरी प्रार्थनेने काहीच फरक पडत नाही?

**दादाश्री :** काहीच फरक पडत नाही. पण प्रार्थनेमुळे त्यावेळी सुख वाटते.

**प्रश्नकर्ता :** भोगण्यासाठी शक्ती मिळते?

**दादाश्री :** नाही, हे जे तुम्हाला दुःख आले आहे ना, तर प्रार्थनेमुळे त्या दुःखात सुखाचा भाग वाटतो. पण तेव्हा प्रार्थना करणे कठीण आहे. जेव्हा संयोग खराब असतात आणि मन दूषित असते त्यावेळी प्रार्थना करणे कठीण आहे. तेव्हा जर प्रार्थना करता आली तर अति उत्तम म्हटले जाईल. त्यावेळी दादा भगवानांसारख्यांचे स्मरण करून प्रार्थना करवून घेतली की जे स्वतः शरीरात राहत नाहीत, शरीराचे मालक होत नाहीत, त्यांचे स्मरण करून प्रार्थना करवून घेतली तर ते शक्य होईल. नाहीतर होणार नाही.

**प्रश्नकर्ता :** नाही तर त्या संयोगात प्रार्थना आठवतच नाही का?

**दादाश्री :** आठवतच नाही. आठवणच राहत नाही, भानच हरपून जाते.

## देवी-देवतांच्या नवसाचे बंधन

**प्रश्नकर्ता :** कोणत्याही देवी-देवतांजवळ नवस केल्याने कर्मबंधन होते का?

**दादाश्री :** नवस केल्याने कर्मबंधन अवश्य होते. नवस म्हणजे काय की आपण त्यांची मेहरबानी मागितली. म्हणून ते मेहरबानी करतात सुद्धा, आणि म्हणून तुम्ही त्यांना त्याच्या बदल्यात काहीतरी देता, त्यामुळेच कर्मे बांधली जातात.

**प्रश्नकर्ता :** संत पुरुषांच्या सहवासाने कर्मबंधने सुटतात?

**दादाश्री :** कर्मबंधने कमी होतात आणि पुण्यकर्मे बांधली जातात पण ती त्याचे नुकसान करत नाहीत. पापचे बंधन होत नाही.

## जागृती कर्मबंधनासमोर...

**प्रश्नकर्ता :** कर्म बांधले जाणार नाही, यासाठी उपाय कोणता?

**दादाश्री :** तेच सांगितले ना, लगेच भगवंताला असे सांगावे की अरेरे! मी असे-असे खराब विचार केले. आता हे जे पाहुणे आले आहेत ते तर त्यांचा हिशोब असेल तोपर्यंत राहतील. पण 'हे आता मेले कुठून आले!' असे मला वाटले म्हणून मी हिशोब बांधला, त्याची मी क्षमा मागतो, पुन्हा असे करणार नाही.

**प्रश्नकर्ता :** एखादी व्यक्ती कुणाचा खून करेल आणि नंतर पश्चात्ताप करून भगवंताला असे सांगेल, तर त्याने कर्म कसे काय सुटेल?

**दादाश्री :** हो, सुटेल. खून करून खुश झाला तर खराब कर्मे बांधली जातात आणि खून करून असा पश्चात्ताप केल्याने कर्मे हलकी होतात!

**प्रश्नकर्ता :** काहीही केले तरी पण कर्म तर बांधलेच गेले ना?

**दादाश्री :** बांधले जाऊन सुटतही आहे. खून झाला ना, ते कर्म सुटले आहे. पण त्यावेळी कर्म केव्हा बांधले जाते? तर तेव्हा जर त्याला असे वाटत असेल की, खून करायलाच हवा. तर मात्र पुन्हा नवीन कर्म बांधले जाते. हे कर्म पूर्ण सुटले किंवा सुटतेवेळी जर पश्चात्ताप केला तर सुटता येईल. त्याला मारले, हेच खूप मोठे नुकसान आहे. मारले, त्यामुळे अपकीर्ती होईल, शरीरात विविध प्रकारचे रोग उत्पन्न होतील, ते भोगावे लागतील. इथल्या इथेच भोगायचे. नवीन चिकट कर्म बांधले जाणार नाही. हे कर्मफळ आहे, ते भोगायचे. मारले ते कर्माच्या उदयानेच मारले आणि मारले म्हणून कर्मफळ भोगावे लागेल. परंतु हृदयापासून पश्चात्ताप केला तर नवीन कर्मे सैल (मंद) होऊन जातील. मारल्याने नवीन कर्म केव्हा बांधले जाते? तर मारायलाच पाहिजे, हे बांधले नवीन कर्म. राजीखुशीने मारले तर चिकट कर्म बांधले जाते आणि पश्चात्तापपूर्वक केले तर कर्म सैल होऊन जाते. उल्हासपूर्वक बांधलेली पापकर्मे पश्चात्तापाने नष्ट होतात.

एका गरीब माणसाला त्याची पत्नी आणि मुले त्रास देत असतील की तुम्ही आम्हाला मांसाहार खाऊ घालत नाही. तेव्हा तो म्हणतो, 'पैसे नाहीत, कुठून खाऊ घालू?' तर बायको म्हणते, 'हरीण मारून आणा.' मग त्याने चूपचाप जाऊन हरीण मारून आणले आणि खाऊ घातले. आता याचा त्याला दोष लागला. आणि तसेच एक राजाचा मुलगा होता, तो शिकार करायला गेला, आणि त्याने हरणाची शिकार केली पण तो शिकार करून खुश झाला. आता हरीण तर त्या दोघांनीही मारले. याने स्वतःच्या मौज-मजेसाठी मारले आणि त्या गरीब माणसाने खाण्यासाठी मारले. तर जो खात आहे, त्याला त्याचे फळ म्हणून तो मनुष्यातून प्राणी होतो, तो गरीब माणूस! आणि राजकुमार मौजमजेसाठी मारतो, तो खात नाही, समोरच्याला मारून टाकतो. स्वतःच्या कुठल्याही फायद्याशिवाय, स्वतःला कुठल्याही प्रकारे फायदा होत नाही आणि नाहक शिकार करून मारून टाकतो. म्हणून त्याचे फळ त्याला नरकगती येते. म्हणजे कर्म एकाच प्रकारचे पण भाव वेगवेगळे. गरीब माणसाला तर त्याची मुले हैराण करीत होती म्हणून बिचाऱ्याने हरणाला मारले

आणि हा राजकुमार तर स्वतःच्या छंद म्हणून जीवांना मारतो. शिकार करण्याचा छंद असतो ना! नंतर हरीण तिथल्या तिथे पडून राहते, त्याची त्याला पर्वाच नसते आणि म्हणतो कसा? बघा, कसा अचूक निशाणा लावला आणि त्याला ठार केले. हे वाहतुकीचे नियम जर आपण समजलो नाही तर वाहतुकीत समोरासमोर मारूनच टाकतील ना! पण ते तर सर्वांनाच समजते! आणि 'हे' समजेल असे नाही. म्हणूनच आमच्यासारखे शिकवणारे पाहिजेत.

## फाशीच्या शिक्षेचे न्यायाधीशाला काय बंधन?

एक न्यायाधीश मला म्हणत होता की, 'साहेब, तुम्ही मला ज्ञान तर दिले, पण आता मी कोर्टात 'देहदंडाची' (फाशीची) शिक्षा द्यावी की नाही?' तेव्हा मी त्याला सांगितले, 'मग आता फाशीची शिक्षा नाही दिली तर काय करणार?!' त्यावर तो म्हणाला, 'पण फाशीची शिक्षा दिली तर मला दोष लागेल.'

मग मी त्यांना पद्धत शिकवली की, तुम्ही असे म्हणायचे की, 'हे प्रभू, माझ्या वाट्याला असे काम कुठून आले?' आणि त्याबद्दल मनापासून प्रतिक्रमण करा. आणि दुसरे, सरकारी कायद्याप्रमाणे काम करत राहा.

**प्रश्नकर्ता :** समजा आम्ही कोणाला दुःख दिले आणि नंतर प्रतिक्रमण करून घेतले, पण त्याला जबरदस्त आघात-ठेच पोहोचली असेल तर त्यामुळे आम्हाला कर्मबंधन होणार नाही का?

**दादाश्री :** तुम्ही त्याच्या नावाचे प्रतिक्रमण करत राहायचे, त्याला जेवढया प्रमाणात दुःख झाले असेल तेवढया प्रमाणात प्रतिक्रमणे करावी लागतात. आपण तर प्रतिक्रमण करतच राहायचे, दुसरी जबाबदारी आपली नाही.

कोणत्याही कार्याचा पश्चात्ताप कराल, तर त्या कर्माचे फळ रुपयातून बारा आण्यांपर्यंत (75 टक्के) नष्ट होऊनच जाते. मग

जळालेली दोरी असते ना, त्याच्यासारखे फळ मिळते. ती जळालेली दोरी पुढील जन्मी अशी हळूच फुंकर मारली, की उडून जाते. कोणतीही क्रिया अशीच व्यर्थ तर जातच नाही. प्रतिक्रमण केल्याने ती दोरी जळून जाते, पण (पीळाची) डिझाईन मात्र तशीच राहते. मग पुढील जन्मी काय करावे लागते? जराशी फुंकर मारली, झटकली की ती उडून जाते.

## जप-तप केल्याने कर्मे बांधली जातात की संपतात?

**प्रश्नकर्ता :** जप-तप केल्याने कर्मे बांधली जातात की संपतात?

**दादाश्री :** त्यामुळे तर कर्मे बांधलीच जातात ना! प्रत्येक बाबतीत कर्मेच बांधली जातात. रात्री झोपलात तरी कर्मे बांधली जातात, आणि जप-तप करतात त्यात तर मोठी कर्मे बांधली जातात. पण ती पुण्याची बांधली जातात. त्यामुळे पुढील जन्मी भौतिक सुखे मिळतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग कर्म संपवण्यात धर्माची शक्ती किती?

**दादाश्री :** 'विज्ञान' धर्म-अधर्म दोन्हीही कर्म संपवून देते. विज्ञान असेल तर सांसारिक बांधलेल्या कर्मांना त्वरित नष्ट करून देते. विज्ञानाने कर्मांचा नाश होतो. धर्माने पुण्यकर्मे बांधली जातात आणि अधर्माने पापकर्मे बांधली जातात आणि आत्मज्ञानाने कर्मे नष्ट होतात, भस्मसात होतात.

**प्रश्नकर्ता :** जर धर्म आणि अधर्म, दोन्हींना संपवत असेल तर त्याला धर्म कसे म्हणता येईल?

**दादाश्री :** धर्मामुळे पुण्याची कर्मे बांधली जातात आणि अधर्मामुळे पापकर्मे बांधली जातात. आता कोणी थोबाडीत मारली तर काय होईल? कोणी तुमच्या थोबाडीत मारली तर तुम्ही काय करता? त्याला दोन थोबाडीत मारता ना! डबल करून देता. नुकसान न होऊ देता डबल देता. तुमच्या पापाचा उदय झाला म्हणूनच त्याला तुमच्या थोबाडीत मारण्याची इच्छा झाली. तुमच्या कर्माचा उदय तुम्हाला दुसऱ्याकडून थोबाडीत मारून घेतो, मारणारा तर निमित्त बनला. आता जर कोणी

एक थोबाडीत मारली, तर आपण म्हणायचे की आपला हिशोब संपला, मी जमा करून घेतो, आणि जमा करून घ्यावे. पूर्वी दिलेले, तेच तो परत करून गेला. तर ते जमा करून घ्यावे, नवीन उधारी करू नये. आवडत असेल तर उधारी करा. आवडते का? नाही? तर मग नवीन उधारी करू नये.

आपल्या पुण्याचा उदयकर्म असेल तर समोरची व्यक्ती चांगले बोलते आणि पापाचा उदयकर्म असेल तर समोरची व्यक्ती शिव्या देते. त्यात कोणाचा दोष? म्हणून आपण म्हणावे, उदयकर्म माझेच आहे आणि समोरचा तर निमित्तच आहे. असे केल्याने आपल्या दोषांची *निर्जरा* (आत्मप्रदेशातून कर्माचे वेगळे होणे) होईल आणि नवीन कर्म बांधले जाणार नाही.

## कर्म-अकर्म दशेची स्थिती

**प्रश्नकर्ता :** कोणतेही वाईट काम केल्याने कर्म तर बांधलेच जाते असे मी मानतो.

**दादाश्री :** मग चांगल्या कर्माचे बंधन नसते का?

**प्रश्नकर्ता :** चांगले आणि वाईट, दोन्हींपासून कर्मे बांधली जातात ना!

**दादाश्री :** अरे! आत्ता सुद्धा तुम्ही कर्म बांधत आहात! आता तुम्ही खूप मोठे पुण्याचे कर्म बांधत आहात! पण कर्म बांधलेच जाणार नाही असा दिवस कधी येतच नाही ना? याचे काय कारण असेल?

**प्रश्नकर्ता :** कोणती तरी प्रवृत्ती तर करतच असतो ना, चांगली किंवा वाईट?

**दादाश्री :** हो, पण कर्म बांधले जाणार नाही, असा काही मार्ग नसेल का? महावीर भगवंत कशाप्रकारे कर्म न बांधता सुटले असतील? हा देह आहे तर कर्म तर होतच राहणार! शौचाला जावे लागते, सर्व काही करावे लागत नाही का?

**प्रश्नकर्ता :** हो, पण जी कर्मे बांधली असतील, त्यांची फळे तर भोगावीच लागतील ना!

**दादाश्री :** कर्म बांधले की मग पुढचा जन्म झाल्याशिवाय राहतच नाही. कर्म बांधले म्हणजे पुढील जन्मात जावेच लागते! परंतु या जन्मात महावीरांना पुढील जन्मात जावे लागले नव्हते, म्हणूनच काहीतरी मार्ग तर असेलच ना, कर्म केले तरीही कर्म बांधले जाणार नाही असा मार्ग?

**प्रश्नकर्ता :** असेल.

**दादाश्री :** तुम्हाला अशी इच्छा होते का की, कर्म बांधले जाऊ नये? कर्म केले तरी कर्म बांधले जात नाही असे विज्ञान असते. असे विज्ञान जाणले तर मुक्त व्हाल.

## अहो, अज्ञानता बाधक आहे, कर्म नव्हे...

**प्रश्नकर्ता :** आपल्या कर्माच्या फलस्वरुपच हा जन्म मिळतो ना?

**दादाश्री :** हो, आयुष्यभर कर्मांची फळे भोगायची आहेत! आणि जर राग-द्वेष केले तर त्याच्यापासून नवीन कर्मे बांधली जातात. राग-द्वेष केले नाही तर काहीच नाही.

कर्माची अडचण नाही, कर्म तर हे शरीर आहे म्हणून होतीलच, पण राग-द्वेष करतो त्याची अडचण आहे. वीतराग काय म्हणतात की वीतराग व्हा.

या जगात जरी कोणतेही काम करत असाल, त्या कामाला महत्त्व नाही, पण त्यामागे राग-द्वेष झाले तरच पुढील जन्माचा हिशोब बांधला जातो. राग-द्वेष होत नसतील तर तुम्ही जबाबदार नाहीत.

संपूर्ण देह, जन्मापासून मरेपर्यंत अनिवार्य आहे. यातून जे राग-द्वेष होतात, तेवढाच हिशोब बांधला जातो.

म्हणून वीतराग काय म्हणतात की वीतराग होऊन मोक्षाला जा.

आम्हाला कोणी शिवी दिली तर आम्ही जाणतो की तो अंबालाल

पटेलला शिव्या देत आहे, पुद्‌गलला शिव्या देत आहे. आत्म्याला तर तो जाणू शकत नाही, ओळखू शकत नाही, म्हणून 'आम्ही' स्वीकारत नाही. 'आम्हाला' स्पर्शतच नाही, आम्ही वीतराग राहतो. आम्हाला त्याच्यावर राग-द्वेष होत नाही. त्यामुळे एक अवतारी किंवा दोन अवतारी होऊन सर्व संपुष्टात येईल.

वीतराग एवढेच सांगू इच्छितात की 'कर्म बाधक होत नाहीत, तुझी अज्ञानता बाधक आहे!' अज्ञानता कशाची? 'मी कोण आहे' याची. देह आहे तोपर्यंत कर्मे तर होतच राहतील, पण अज्ञान गेले तर कर्म बांधणे बंद होईल!

## कर्माची निर्जरा केव्हा होते?

**प्रश्नकर्ता :** कर्म बांधणे केव्हा थांबते?

**दादाश्री :** 'मी शुद्धात्मा आहे' याचा अनुभव असायला हवा. म्हणजे तू शुद्धात्मा झाल्यानंतर कर्मबंधन थांबेल, मग कर्माची *निर्जरा* होत राहील, आणि कर्म बांधणे थांबेल!

कर्मबंधन होणार नाही, यासाठी मार्ग कोणता? तर स्वभाव भावात येणे हा. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' स्वतःच्या स्वरूपाचे भान करवून देतात, त्यानंतर कर्मे बांधली जात नाहीत. मग नवीन कर्मे चार्ज होत नाहीत. जुनी कर्मे डिस्चार्ज होत राहतात आणि सर्वच कर्मे समाप्त झाल्यावर शेवटी मोक्ष होतो!

ही कर्माची गोष्ट, तुम्हाला समजली का! कर्ता झाल्यामुळे कर्मे बांधली जातात. जेव्हा कर्तापण सुटते तेव्हा नवीन कर्मे बांधली जात नाहीत. म्हणजेच आज तुम्ही कर्म बांधत आहात, पण जेव्हा मी तुमचे कर्तापण सोडवून देईन तेव्हा तुम्हाला कर्मबंधन होणार नाही आणि जी जुनी कर्मे आहेत ती भोगून घ्यायची. म्हणजे जुना हिशोब चुकता होईल आणि नवीन 'कॉज' निर्माण होणार नाही. फक्त 'इफेक्ट'च राहील. नंतर इफेक्ट पण पूर्णपणे भोगून झाल्यावर संपूर्ण मोक्ष होईल!

– **जय सच्चिदानंद**

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तके

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं, ग्रंथ)
10. भावना सुधारे जन्मोजन्म
11. कर्माचे विज्ञान
12. पाप-पुण्य
13. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
14. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
15. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
16. मानव धर्म
17. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
18. सेवा-परोपकार
19. दान
20. त्रिमंत्र
21. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
22. चमत्कार
23. सत्य-असत्याचे रहस्य
24. वाणी, व्यवहारात (सं)
25. पैशांचा व्यवहार (सं)
26. क्लेश रहित जीवन
27. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
28. प्रेम
29. गुरू-शिष्य
30. अहिंसा
31. आप्तवाणी - 1 ते 6
36. आत्मसाक्षात्कार
37. जगत् कर्ता कोण ?
38. कर्माचा सिद्धांत

## हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1 से 3)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

★ **दादा भगवान फाउन्डेशनद्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेतसुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वेबसाइट www.dadabhagwan.org वरसुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता.**

★ **प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित होत आहे.**

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार

**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन** : +91 79 3500 2100, +91 9328661166/77
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलूर** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830093230 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पूणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 759-92-DADA (3232)

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 402179706

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 91457800

**www.dadabhagwan.org**



## कर्ताभावाने कर्मबंधन!

कर्मे कशी बांधली जातात ?

'मी करीत आहे' हा कर्ताभाव आहे. करतो कोणी दुसरा आणि आरोपण करतो की मी केले. या कर्ताभावामुळे कर्मे बांधली जातात.

तर आता 'कर्ता कोण आहे' हे जाणून घ्यावे लागेल, त्यानंतर मग कर्मे बांधली जाणार नाहीत आणि मुक्ती मिळेल.

- दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-93-86289-84-1
Printed in India
Price ₹40